रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक २४४ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६

किंमत ४ ₹


## सुनेत्रा पवारांनी स्वीकारला पदभार

**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा अजित पवार यांनी मंगळवारी राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून मंत्रालयात अधिकृतपणे आपला पदभार स्वीकारला. प्रारंभी त्यांनी मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील दालनात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहिली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ विभागांचा पदभार स्वीकारला.

## २३ फेब्रुवारीपासून अर्थसंकल्पीय अधिवेशन

**मुंबई** : विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारी ते २५ मार्चदरम्यान होणार आहे. अधिवेशनात ६ मार्चला राज्याचा अर्थसंकल्प सादर करण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्याचा अर्थसंकल्प मांडणार आहेत. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या कामकाज सल्लागार समितीच्यांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आदी उपस्थित होते.

# अजितदादांचा अपघात की घात?

### विमान दुर्घटनेवर रोहित पवारांचा गंभीर प्रश्न | कंपन्या, पायलट आणि प्रक्रियेवर संशय

| मुंबई | प्रतिनिधी |

**दिवंगत नेते अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेबाबत आमदार रोहित पवार यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत अनेक धक्कादायक मुद्दे मांडले. ही दुर्घटना साधा अपघात नसून, त्यामागे घातपाताची शक्यता नाकारता येत नाही, असा संशय व्यक्त करत त्यांनी विमान कंपनी, पायलट, देखभाल प्रणाली आणि संपूर्ण प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या प्रकरणाची तज्ज्ञांकडून सखोल चौकशी व्हावी, अशी त्यांनी सरकारकडे मागणी केली.**

रोहित पवार यांनी मंगळवार, दि. १० फेब्रुवारी रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत अजित पवार यांच्या २७ जानेवारीच्या प्रवास वेळापत्रकापासून ते विमानाच्या तांत्रिक बाबींपर्यंत अनेक मुद्द्यांवर सविस्तर भाष्य केले. अपघाताच्या आदल्या दिवशी अजित पवार हे मुंबईहून गाडीने पुण्याकडे जाणार होते. ताफ्याची तयारीही झाली होती. मात्र, एका महत्त्वाच्या नेत्याच्या उशिरा झालेल्या भेटीमुळे वेळापत्रक ढासळले आणि अखेर त्यांना विमानाने जावे लागले, असा दावा त्यांनी केला. पान २ वर



### २७ जानेवारीचा घटनाक्रम

रोहित पवार यांनी सांगितले की, २७ जानेवारीला कॅबिनेट बैठकीनंतर दादांनी काही अधिकारी, पक्षातील नेते आणि कर्मचाऱ्यांसोबत चर्चा करण्याचे ठरवले होते. त्यानंतर ते गाडीने मुंबईला जाणार होते. ताफाही तयार होता आणि एका मोठ्या नेत्याची भेट ठरली होती. मात्र, त्या नेत्याला उशीर झाल्यामुळे चर्चा उशिरापर्यंत सुरू राहिली. त्यामुळे संध्याकाळी सुमारे ५.३० वाजता गाडीने जाण्याचा कार्यक्रम रद्द झाला. पर्याय नसल्याने विमान बुक करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि संध्याकाळी ७.१३ वाजता विमान बुक झाले.

### ईमेलमधील वैमानिकांची नावे बदलल्याचा दावा

रोहित पवार यांनी एका ईमेलचा उल्लेख करत सांगितले की, त्यात कॅप्टन साहिल आणि कॅप्टन यश अशी दोन नावे वैमानिक म्हणून सुचवली होती. मात्र, दुसऱ्या दिवशी वैमानिकाचे नाव बदलण्यात आल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला. या सर्व घटनांचा उल्लेख करत रोहित पवार यांनी संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. ''सत्य समोर येईपर्यंत आम्ही शांत बसणार नाही,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

### विमान उड्डाणाबाबत दादांची भूमिका

रोहित पवार म्हणाले की, दादा नेहमी वैमानिकाच्या निर्णयाला प्राधान्य देत असत. उड्डाणापूर्वी ते नेहमी ''उडायचे का नाही'' याबाबत पायलटचा सल्ला घेत असत. दोन-अडीच वर्षांपूर्वी लोणावळ्यात धुके वाढल्यामुळे हेलिकॉप्टर उड्डाण धोकादायक असल्याचे पायलटने सांगितले होते. त्यावेळी दादांनी उड्डाण रद्द करून गाडीने मुंबईला परतण्याचा निर्णय घेतला होता.

## वेधक

### एकनाथ खडसेंना कोर्टाकडून दिलासा

**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आणि पूर्वाश्रमीचे भाजप नेते एकनाथ खडसे यांना मुंबई उच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. भोसरी जमीन खरेदी घोटाळ्याप्रकरणी एकनाथ खडसेंना मुंबई उच्च न्यायालयाने हा दिलासा दिला असून, सत्र न्यायालयात सुरू असलेल्या आरोप निश्चितीच्या प्रक्रियेवर न्यायालयाकडून स्थगिती देण्यात आली. त्यामुळे, याप्रकरणी खडसे कुटुंबियांविरोधातील १३ तारखेला होणारी आरोप निश्चिती टळली आहे. पुण्यातील भोसरी जमीन घोटाळाप्रकरणी न्यायालयात सुरू असलेल्या कायदेशीर प्रक्रियेवर मुंबई उच्च न्यायालयाकडून २४ फेब्रुवारीपर्यंत स्थगिती देण्यात आली. न्यायालयाच्या द्विसदस्यीय खंडपीठासमोर तातडीने प्रकरण मेंशन करुन घेण्याचे निर्देश न्या. अश्विन भोबे यांनी दिले आहेत.

### यूपीआय सर्व्हर डाऊन

**नवी दिल्ली** : डिजिटल व्यवहारांचा कणा असलेल्या युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस अर्थात यूपीआय सेवेला मंगळवारी सायंकाळी मोठा फटका बसला आहे. देशभरातील अनेक युजर्सनी पेमेंट करताना व्यवहार अपयशी होत असल्याच्या तक्रारी केल्या आहेत. ऐन गर्दीच्या वेळी सेवा विस्कळीत झाल्याने दुकानदारांपासून ते ग्राहकांपर्यंत सर्वांचीच मोठी तारांबळ उडाली.. डाऊनडिटेक्टरवर तक्रारींचा पाऊसआउटेज-ट्रॅकिंग प्लॅटफॉर्म डाऊनडिटेक्टरनुसार, मंगळवारी संध्याकाळी ७ वाजेच्या सुमारास यूपीआय सेवेबाबतच्या तक्रारींमध्ये मोठी वाढ झाली. संध्याकाळी ७ वाजेपर्यंत सुमारे ५७७ युजर्सनी सेवा विस्कळीत झाल्याचे अहवाल दिले होते. यामध्ये एकट्या गुगल पेसंदर्भात १४१ तक्रारींची नोंद होती.

### त्रिभाषा धोरणावर सरकारला अहवाल

**मुंबई** : राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण राबविण्यासंदर्भात डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समितीने आपला सविस्तर अहवाल राज्य सरकारला सादर केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे वर्षा निवासस्थानी समितीचे अध्यक्ष डॉ. जाधव यांनी हा अहवाल सुपूर्द केला. माहिती तंत्रज्ञानात मोठे बदल झाले असून, कृत्रिम बुद्धिमत्तेसह (एआय) आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान महत्त्वाचे ठरत आहे. त्यामुळे पहिलीपासूनच या विषयाची गरज लक्षात घेऊन त्यासंदर्भात एक पूरक अहवालही सादर करण्यात आला आहे. हा अहवालही मंत्रिमंडळापुढे येणार असून जूनपासून तो स्वीकारावा, अशी भूमिका समितीने मांडली आहे.

### 'एआय' मजकुरावर वॉटरमार्क बंधनकारक

**नवी दिल्ली** : डिजिटल विश्वातील पारदर्शकता वाढवण्यासाठी केंद्र सरकारने मंगळवारी (दि. १०) मोठा निर्णय घेतला. आता यापुढे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सना त्यांच्या प्लॅटफॉर्मवरील एआय-निर्मित मजकुरावर स्पष्टपणे लेबल किंवा वॉटरमार्क लावणे अनिवार्य असेल. तसेच सोशल मीडिया प्लॅटफॉर्मना कोणत्याही प्रकारचा आक्षेपार्ह मजकूर तक्रार प्राप्त झाल्यापासून केवळ तीन तासांच्या आत हटवणे बंधनकारक असल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. केंद्र सरकारने माहिती तंत्रज्ञान नियम, २०२१ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी नियम बनवले असून, माहिती तंत्रज्ञान सुधारणा नियम, २०२६ २० फेब्रुवारी २०२६ पासून लागू होणार आहेत.

# देशभरातील कामगार आज संपावर

- प्रलंबित मागण्यांसाठी पाच कोटी कामगारांचा एल्गार
- जिल्हाधिकारी कार्यालयासह सर्व तहसील कार्यालयांवर धरणे

| पाली | प्रतिनिधी |

देशभरातील तब्बल पाच कोटी कामगार-कर्मचारी १२ फेब्रुवारी रोजी संपावर जाणार असून, त्याला रायगड जिल्ह्यातून जोरदार प्रतिसाद मिळणार आहे. सरकारी कर्मचारी, शिक्षक, तसेच संघटित-असंघटित कामगार संयुक्त कृती समितीच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालय (अलिबाग) आणि सर्व तहसील कार्यालयांसमोर धरणे-निदर्शने करून सरकारचे लक्ष वेधले जाणार आहे.

देशातील केंद्रीय कर्मचारी संघटना, ११ प्रमुख कामगार संघटना आणि अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघ यांच्या आवाहनानुसार हा देशव्यापी संप पुकारण्यात आला आहे. महाराष्ट्रातील सुमारे १७ लाख कर्मचारी-शिक्षक आणि मोठ्या संख्येने कामगार या आंदोलनात सहभागी होणार आहेत. रायगड जिल्ह्यात अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयासह सर्व तालुक्यांतील तहसील कार्यालयांबाहेर धरणे आंदोलन होणार आहे.

चार कामगार संहितांचा रद्दबातल निर्णय, पीएफआरडीए कायदा रद्द करणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा नियमित करणे, आठवा वेतन आयोग तात्काळ लागू करणे, रिक्त पदे भरणे, सर्व कर्मचाऱ्यांना कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करणे, पान २ वर

# चौलमध्ये शिंदे गटाची गुंडगिरी

### आठ जणांविरोधात गुन्हा दाखल| शिंदे गटातील आरोपी मोकाट | पोलिसांच्या भूमिकेबाबत नाराजी

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यालयासमोर मुद्दामपणे फटाके लावण्याचा प्रयत्न शिंदे गटातील कार्यकर्त्यांनी केला. त्यांना रोखले असता, शिंदे गटातील कार्यकर्त्यांनी त्या ठिकाणी राडा केला. लाकडी दांडग्याने मारहाण करण्याबरोबरच धक्काबुक्की केली. शिंदे गटातील गुंडगिरी सोमवारी रात्री तुलाडदेवीजवळ घडली. याप्रकरणी आठ जणांविरोधात रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, हल्लेखोरांना अद्याप अटक केली नसल्याने रेवदंडा पोलिसांच्या कार्यक्षमतेवर संशय व्यक्त केला जात आहे.

शिवसेना उबाठा पक्षातील जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांच्या तक्रारीनुसार, रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचा निकाल सोमवारी (दि.९) दुपारी जाहीर झाला. या निवडणुकीत शिंदे गटाचे सचिन राऊळ हे उमेदवार निवडून आले. पराभव झाल्याने सुरेंद्र म्हात्रे व त्यांचे कार्यकर्ते असे काही मंडळी तुलाडदेवी येथील उबाठा पक्षाच्या कार्यालयात आकडेवारीबाबत आढावा घेण्यासाठी संध्याकाळी चर्चा करीत होते. त्यावेळी शिंदे गटातील नितीन राऊत, अमित राऊत यांनी जिल्हा परिषद निवडणुकीतील विजयी उमेदवार सचिन राऊळ यांची विजयी मिरवणूक मुद्दामपणे उबाठा पक्षाच्या कार्यालयासमोर काढली. त्या ठिकाणी फटाके लावण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी संस्कार यांच्या तक्रारीमुळे पोलिसांनी त्यांना फटाके न लावण्यास सांगितले. याचा राग धरून शिंदे गटातील अंकित गुरव, अमोल घरत, सिद्धेश शेणवईकर, निखील राऊत, महेंद्र घरत, अमित राऊत, विद्धेश माळी, प्रतिक माळी यांनी बेकायदेशीर जमाव करून उबाठा पक्षाच्या कार्यालयात घुसले. अजित मिसाळ यांना लाकडी दांडक्याने मारहाण केली. अंकित गुरव याने त्याच्या हातातील कोणत्यातरी साहित्याने मारहाण केली. त्यामध्ये संस्कार याला दुखापत झाली. प्रतिक गुरव याने चौलच्या माजी सरपंच रुपाली म्हात्रे यांचा हात धरून ओढला. चौल परिसरात रात्री आठ वाजण्याच्या सुमारास हा राडा झाला. या राड्यामध्ये अनेकजण जखमी झाले. त्यामुळे या परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिंदे गटाची गुंडगिरी या घटनेतून समोर आली आहे. याप्रकरणी आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही गटाविरोधात परस्पर गुन्हे दाखल करण्यात आले. पान २ वर

# जे.एम. म्हात्रेंवर ईडीची कारवाई

| नवी मुंबई | प्रतिनिधी |



रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात वहाल येथील सरकारी वनजमिनीच्या कथित गैरव्यवहार प्रकरणात प्रवर्तन संचालनालयाने (ईडी) मोठी कारवाई केली आहे. नवी मुंबईत एका सरकारी जमिनीच्या प्रकरणात ईडीने कारवाई करत थेट भाजप नेत्याची कोट्यवधींची संपत्ती जप्त केली आहे. रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात वहाल इथली जमीन एकेकाळी सरकारी कागदपत्रांमध्ये वनविभागाच्या नावावर होती. पण, या जमिनी अनधिकृतरित्या आपल्या नावे करून कोट्यवधींचा घोटाळा केला गेला. याप्रकरणी ईडीने मोठी कारवाई केली आहे. मनी लॉंड्रिंगप्रकरणी आता चौकशी केली जात आहे.

ईडीच्या मुंबई विभागीय ऑफिसने मनी लॉंड्रिंगप्रकरणी प्रोव्हिजनल अटॅचमेंट ऑर्डर जारी केली आहे. या आदेशांतर्गत उरण, उलवे आणि नवी मुंबईतील तीन स्थावर मालमत्ता जप्त केल्या. या संपत्तीचे मूल्य जवळपास १७.७४ कोटी रुपये इतके आहे. भाजप नेते जे.एम. म्हात्रे आणि त्यांच्या पत्नीच्या या मालमत्ता आहेत. ईडीचा दावा आहे की, पान २ वर

### यापूर्वीची कारवाई

१२ जानेवारी २०२६ रोजीही ईडीने प्राविजनल अटॅचमेंट ऑर्डर जारी करत सुमारे ७.१० कोटी रुपये किमतीच्या पाच अचल मालमत्ता जप्त केल्या होत्या. एकूण ६९.४७ कोटींची मालमत्ता जप्त आतापर्यंतच्या कारवाईत सुमारे ६९.४७ कोटी रुपये किमतीच्या मालमत्ता, बँक ठेवी आणि गुंतवणुकी जप्त, सीज किंवा गोठवण्यात आल्या आहेत. ईडीची चौकशी अद्याप सुरू असून, पुढे आणखी माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

### ४२.४ कोटींचा मोबदला

एनएचएआयकडून मिळालेला सुमारे ४२.४ कोटी रुपयांचा मोबदला हा कथितरित्या बेकायदेशीररित्या मिळवला असल्याचा ईडीचा दावा आहे. या रकमेतून इतर अचल मालमत्ता खरेदी, कर्जफेड, व्यावसायिक खर्च तसेच जेएमएमआयपीएल आणि जेएमएम होम्स या कंपन्यांमध्ये गुंतवणूक केल्याचे तपासात समोर आले आहे.

# बारावीच्या परीक्षेला सुरुवात



### जिल्हा प्रशासन सज्ज; १८ मार्चपर्यंत परीक्षा

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे बारावीची परीक्षा मंगळवार (दि.१०) फेब्रुवारीपासून सुरू झाली असून, जिल्ह्यात परीक्षेचे वातावरण निर्माण झाले आहे. पहिल्याच दिवशी ३३ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी इंग्रजी विषयाचा पेपर दिला. परीक्षा पारदर्शक व कॉपीमुक्त व्हाव्यात यासाठी जिल्हा प्रशासनाने कडक उपाययोजना केल्या आहेत.

मंगळवारपासून सुरू झालेल्या बारावीच्या परीक्षांमध्ये पान २ वर

## शालेय बसला मोठा अपघात

| रत्नागिरी | प्रतिनिधी |

बीड जिल्ह्यातील धारूर येथील शालेय विद्यार्थ्यांची सहल घेऊन जाणाऱ्या बसला फुणगूस येथील मुख्य रस्त्यावर भोसलेवाडी परिसरात मंगळवारी सकाळी सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास अपघात झाला. मात्र, सुदैवाने या अपघातात मोठी जीवितहानी टळली असून, केवळ एक-दोन विद्यार्थ्यांना किरकोळ दुखापत झाली आहे. चाटे पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, धारूर येथील ही सहल होती. या बसमध्ये इयत्ता चौथी ते आठवीतील ३५ विद्यार्थी, ३ शिक्षक व २ मावशा असे एकूण ४१ प्रवासी होते. बस चालक कृष्णा शिरीषराव चाटे हे बस चालवत होते.

# खंडणी मागणे पडले महागात

### मयुरेश गंभीरसह तिघेजण पोलिसांच्या जाळ्यात

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

पिस्तूलचा धाक दाखवून एका हॉटेल व्यावसायिकाकडून ५० हजार रुपये हिसकावून घेणे आणि लाखो रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी सराईत गुन्हेगार मयुरेश गंभीरसह तिघांना पोयनाड पोलिसांनी अटक केली. त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी न्यायालयाने सुनावली आहे. मयुरेश गंभीरला खंडणी मागणे महागात पडले आहे.

फिर्यादी चावला यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, करण चावला हे हॉटेल व्यावसायिक आहेत. अलिबाग तालुक्यातील नागझरी येथे ईलाईट हॉटेल अॅन्ड रिसॉर्ट आहे. त्या हॉटेलच्या ठिकाणी नवीन बंगल्याचे काम सुरु आहे. मयुरेश गंभीरसह तिघेजण बुधवारी (दि.४) दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास चावला यांच्या हॉटेलमध्ये आले. मी गँगस्टर असून, येथील सर्व हॉटेल व्यावसायिक दर महिन्याला पान २ वर

### ठार मारण्याची धमकी

मी गँगस्टर असून, येथील सर्व हॉटेल व्यावसायिक दर महिन्याला मला पॅकेट पैसे देतात. हॉटेलजवळ सुरु असलेल्या बंगल्यांपैकी एक बंगला माझ्या पत्नीच्या नावे कर आणि मला २५ लाख रुपये देत, अशी धमकी दिली. मयुरेशच्या पत्नीने सोन्याच्या दागिन्यांची मागणी केली. तसेच लवेशने रिसॉर्टमधील कामाचा ठेका मला द्या, असे हिंदीमध्ये सांगून त्यानंतर हॉटेलमधील रुममध्ये नेऊन पिस्तुलाचा धाक दाखवून जीवे ठार मारण्याची धमकी दिली.

## पोलीस निरीक्षकाची कॉलर पकडली

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

पोलीस निरीक्षकाची कॉलर पकडून शिवीगाळ करणाऱ्या कसळखंड येथील स्वप्नील गायकरला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेत त्याच्यावर गुन्हा दाखल केला.

पनवेल पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या मतदानाची मोजणी पनवेल शहरातील व्हीके हायस्कूल केंद्रावर सुरू होती. यावेळी भाजपच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात या ठिकाणी गर्दी केली होती. भाजपच्या उमेदवारांचा विजय होत असल्याने मोठ्या प्रमाणात गुलाल उधळण सुरू होती. यावेळी अनेकांनी फलक फडकवले. यावेळी कशी जिरवली पुन्हा भेटू २०३१ च्या निवडणुकीत हा आक्षेपार्ह फलक पान २ वर

### शासनाकडून सव्वा दोन कोटींची प्रतीक्षा | जिल्ह्यात दोन हजार ४५६ शाळा नादुरुस्त

# निधीअभावी शाळांची दुरुस्ती रखडली

प्रमोद जाधव

| रायगड |

रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांच्या किरकोळ दुरुस्तीसाठी आवश्यक असलेला संयुक्त शाळा अनुदानाचा निधी अपुरा पडत असून, शासनाकडून सव्वा दोन कोटी रुपयांची प्रतीक्षा लागून राहिली आहे. निधीअभावी दोन हजार ४५६ शाळांमधील दुरुस्तीची कामे रखडली असून, शिक्षण विभागाला त्यासाठी धावाधाव करावी लागत आहे.




जिल्हा परिषद शाळांमध्ये किरकोळ दुरुस्ती, स्वच्छता, शालेय साहित्य, स्टेशनरी तसेच देखभाल दुरुस्ती यांसाठी शासनाकडून जिल्हा परिषदेमार्फत संयुक्त शाळा अनुदान दिले जाते. मात्र, यंदा अपुऱ्या निधीमुळे शाळांमधील आवश्यक कामे प्रलंबित राहिल्याचे चित्र आहे. जिल्ह्यातील एकूण दोन हजार ४५६ शाळांच्या दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद शिक्षण विभागाने शासनाकडे साडेचार कोटी रुपयांची मागणी केली होती. त्यापैकी शासनाने फक्त सव्वा दोन कोटी रुपयांचा निधी वितरित केला आहे. उर्वरित सव्वा दोन कोटी रुपयांचा निधी अद्याप मिळालेला नाही. त्यामुळे उपलब्ध निधीचे वाटप करताना जिल्हा परिषदेला तारेवरची कसरत करावी लागत आहे.

शाळांच्या पटसंख्येनुसार १० हजार ते ७५ हजार रुपयांपर्यंत अनुदान दिले जाते. जिल्ह्यात १ ते ३० पटसंख्या असलेल्या १ हजार ६८४ शाळा, ३१ ते १०० पटसंख्या असलेल्या ७६३ शाळा, १०१ ते २५० पटसंख्या असलेल्या पान २ वर

> शाळेतील किरकोळ दुरुस्ती, डागडुजी, रंगरंगोटी, लाईट बिल आणि इतर खर्चासाठी संयुक्त शाळा अनुदान शासनाकडून दिले जाते. हे अनुदान पटसंख्येनुसार दिले जाते. तीसपर्यंत पटसंख्या असलेल्या शाळांना दहा हजार रुपये, तर ३१ पेक्षा जास्त पटसंख्या असलेल्या शाळांना २५ हजार रुपये दिले जातात. मात्र, या निधीत शाळांमधील आवश्यक डागडुजी व इतर खर्च करणे शक्य होत नाही. त्यामुळे हा निधी वाढवून देणे अत्यंत गरजेचे आहे.
>
> – प्रमोद भोपी, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, तालुका शाखा अलिबाग

# लोकसभा अध्यक्षांविरोधात अविश्वास प्रस्ताव



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

संसदेत सरकार आणि विरोधक यांच्यातील संघर्ष वाढला आहे. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरुद्ध विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. आता विरोधकांनी बिर्ला यांच्याविरुद्ध लोकसभा महासचिवांकडे अविश्वास प्रस्ताव सादर केला आहे. दरम्यान, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अविश्वास प्रस्तावावर स्वाक्षरी केलेली नाही. संसदीय लोकशाहीच्या प्रतिष्ठेचा विचार करता विरोधी पक्षनेत्याने सभापतींविरुद्ध अविश्वास प्रस्तावावर स्वाक्षरी करणे योग्य नाही, असे काँग्रेसने सांगितले.

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पदावरून हटविण्यासाठी काँग्रेस, द्रमुक आणि समाजवादी पक्षासह सुमारे १०० हून अधिक विरोधी खासदारांनी अविश्वास प्रस्तावावर स्वाक्षरी केली आहे. लोकसभेचे महासचिव उत्पल कुमार सिंह यांच्याकडे हा अविश्वास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. काँग्रेस नेते के सुरेश, गौरव गोगोई आणि मोहम्मद जावेद यांनी ही सूचना सादर केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा ठराव संविधानाच्या कलम पान २ वर

# माथेरानमध्ये ई-रिक्षा संपावर

## •रिक्षा स्टँडवर शुकशुकाट • दोन दिवसांचा अल्टिमेटम

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरानमधील हातरिक्षा चालवणाऱ्या ७४ श्रमिकांच्या हाती पर्यावरणपूरक ई-रिक्षा देण्यात याव्यात या मागणीसाठी आजपासून चालवल्या जाणाऱ्या २० ई रिक्षा बंद ठेवण्यात आल्या आहे. १२ फेब्रुवारीपर्यंत शासनाने निकाल दिला नाही तर स्थानिक लोकांना विश्वासात घेऊन माथेरान बंद ठेवले जाईल, असा इशारा श्रमिक रिक्षा संघटना यांनी दिला आहे.



माथेरान हे पर्यटन स्थळ असून या ठिकाणी पर्यावरणपूरक इ रिक्षा चालवली जाते. मात्र माथेरान मध्ये कोणत्याही वाहनाला परवानगी नसताना माथेरान मध्ये असणारे श्रमिक रिक्षा संघटना यांच्या माध्यमातून माथेरानमध्ये २० इ रिक्षासाठी पायलेट प्रोजेक्ट राबवण्यासाठी परवानगी देण्यात आली होती. मात्र, सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार या पर्यावरण पुरक इ रिक्षा माथेरानमध्ये सेवेत आहेत. माथेरान अस्तित्वात आले तेंव्हापासून माथेरानमध्ये हात रिक्षा ओढणारी माणसाने माणसाला उडणारे पद्धत म्हणजे हातरिक्षा ही चालवली जात होती. त्यानंतर माथेरानमध्ये २० इ रिक्षा आल्यामुळे माथेरानमध्ये आजही ७४ हात रिक्षा चार माणसांना ओढण्याचे काम करीत आहेत.

६ फेब्रुवारी २०२५ रोजी सुप्रीम कोर्टाने माथेरान मध्ये असणाऱ्या ७४ हातरिक्षा या बंद करण्यात याव्यात आणि ७४ ई-रिक्षा देण्यात याव्यात, असे आदेश दिले आहेत. मात्र, सहा महिने नाही, तर एक वर्षे होत आले तरीदेखील पर्यावरणपूरक ई-रिक्षा चालवण्याची परवानगी शासनाने दिलेली नाही.

या मागणीसाठी माथेरान मध्ये असणाऱ्या श्रमिक हात रिक्षा चालक यांना पर्यावरणपूरक ई-रिक्षा याव्यात, अशी मागणी करीत मंगळवार, दि. १० फेब्रुवारीपासून माथेरान शहरात पर्यावरणपूरक ई-रिक्षा बंद ठेवण्यात आल्या. हातरिक्षा चालक यांची संघटना असलेल्या श्रमिक रिक्षा संघटना यांना या संपामुळे प्रवासी पर्यटक यांचे होत असलेले हाल लक्षात घेऊन शासनाच्या वतीने चर्चेला बोलावण्यात आलं. महसूल अधीक्षक सुरेंद्र ठाकूर, माथेरान नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, माथेरान नगरपालिका मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी श्रमिक रिक्षा संघटना यांची बाजू समजून घेतली. रिक्षा संघटना यांच्यावतीने उपनगराध्यक्ष संतोष शेलार, अध्यक्ष शकील पटेल, उपाध्यक्ष प्रकाश सुतार, सचिव नगरसेवक सुनील शिंदे, तसेच गटनेते नगरसेवक शिवाजी शिंदे यांनी सहभाग घेतला. या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. मात्र, ७४ हात रिक्षा चालक यांच्याबाबत निर्णय होऊ शकला नाही. त्यामुळे अखेर पर्यावरणपूरक ई-रिक्षा बंद ठेवण्याचा निर्णय कायम ठेवण्यात आला आहे. १२ फेब्रुवारीपर्यंत शासनाने निर्णय घेतला नाही तर काही दिवसांनी या मागणी साठी माथेरान बंद ठेवण्यात येईल, असा इशारा श्रमिक रिक्षा संघटना यांनी दिला आहे.

# कोकणात 'सुरक्षित तट समृद्ध भारत' मोहिमेला बळ

## वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉनचे १३ फेब्रुवारीला आगमन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

कोकण किनारपट्टीच्या सुरक्षिततेसाठी केंद्र शासनाच्या ''सुरक्षित तट समृद्ध भारत'' या मोहिमेंतर्गत आयोजित वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉन २०२६ चे शुक्रवार, दि.१३ फेब्रुवारी रोजी विद्यापीठामध्ये आगमन होणार आहे. या उपक्रमामुळे कोकणात राष्ट्रभक्ती, सुरक्षा जनजागृती आणि नागरिक सहभागाला नवे बळ मिळणार आहे.

ही सायक्लोथॉन डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे येथे सकाळी ठीक ९ वाजता ध्वजप्रदर्शन फ्लॅग ऑफ समारंभ होणार असून, ही रॅली महाड सोवेली गाव (दापोली) दाभोळ गुहागर असा प्रवास करणार आहे. लोणेरे येथे आयोजित ध्वजप्रदर्शन समारंभात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सायक्लोथॉनला अधिकृत प्रारंभ करण्यात येणार आहे.

या सायक्लोथॉनमध्ये केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल, जिल्हा प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था, युवक-विद्यार्थी, महिला बचत गट तसेच मच्छीमार संघटनांचा सक्रिय सहभाग असणार आहे. 'वंदे मातरम्' व 'सुरक्षित तट समृद्ध भारत' या



घोषणांतून किनारपट्टी सुरक्षेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

याप्रसंगी नागरिकांना किनारपट्टीवरील सतर्कता, संशयास्पद हालचालींची त्वरित माहिती देण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात येणार आहे. आधुनिक तंत्रज्ञान, ड्रोन पाळत, सीसीटीव्ही व्यवस्था तसेच आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा अधिक सक्षम करण्यात आल्याची माहिती सुरक्षा अधिकाऱ्यांनी दिली.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय**
**जुने सचिवालय, विस्तार इमारत, पहिला मजला, एलफिस्टन कॉलेजच्या बाजूला, काळा घोडा, फोर्ट, मुंबई-०३२**

क्रं.अपिल/डेस्क-१/आरटीएस/रिव्ही/७९८/२०२५ दिनांक :-२९/१२/२०२५

**जाहिर सूचना**

प्रति,

१.श्री.पांडुरंग गणपत म्हात्रे
मु.बामणोली, पो.थळ
ता.अलिबाग जि.रायगड अर्जदार

विरूद्ध

१.श्री.आशिष अशोक म्हात्रे
२.श्रीम.मंदा अशोक म्हात्रे
३.श्री.अमित अशोक म्हात्रे
४.श्री.सुजित अशोक म्हात्रे
क्र.१ ते ४ मु.बामणोली, पो-थळ
ता.अलिबाग जि.रायगड
५.सौ.अमिता प्रमोद थळे
रा.मुळे, पो-थळ, ता.अलिबाग जि.रायगड
६.सौ.ममता संदेश राऊत
रा.मु.पो.मापगांव, ता.अलिबाग जि.रायगड
७.श्री.बाळकृष्ण अप्पाजी शिर्सेकर
८.सौ.विजेता बाळकृष्ण शिर्सेकर
दोघे रा.कनकेश्वर फाटा, पो.नवगाव,
ता.अलिबाग जि.रायगड

**विषय -** अपर जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील आदेश क्रं.हक्कनोंद/अपिल क्र.३२/२०२४, दि.१९/०५/२०२५ चे विरूद्ध पुनर्रिक्षण अर्ज

सामनेवाले क्र.३ ते ५ यांस कळविण्यात येते की, वरील पुनर्रिक्षण अर्जाची सुनावणी (दाखल करून घेण्याच्या व विलंबाच्या मुद्यावर) मा.अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचे समोर त्यांचे जुने सचिवालय १ ला मजला, विस्तार भवन, फोर्ट, मुंबई-३२ येथील कार्यालयात दिनांक १७/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

वरील दिवशी व वेळी आपण स्वतः अगर वकीलामार्फत किंवा प्राधिकृत अभिकर्त्या मार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, वरील तारखेस आपण हजर राहुन म्हणणे न मांडल्यास पुनर्रिक्षण अर्जाचे कामी आपणांस काही सांगणे नाही असे समजण्यात येवून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सही/-
**(वैभव गुहागरकर)**
**नायब तहसिलदार (अपिले)**
**कोकण विभाग**

## पान १ वरून

### चौलमध्ये शिंदे गटाची गुंडगिरी

मात्र, शिंदे गटातील कार्यकर्त्यांना अद्याप अटक करण्यात आलेली नाही. मात्र, उबाठा गटाच्या कार्यकर्त्यांना अटक केली आहे. पोलिसांच्या या भूमिकेबाबत स्थानिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सत्तेत असणाऱ्या शिंदे गटाला अभय देणाऱ्या रेवदंडा पोलिसांबाबत नाराजीचे सूर उमटले आहेत. याबाबत रेवदंड्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव यांच्याशी संपर्क साधला असता, तो होऊ शकला नाही.

### अजितदादांचा अपघात की घात?

''व्यक्तीला लक्ष्य करायचे असेल तर त्याच्या चालकावर हल्ला करणे हा सोपा मार्ग असतो,'' असा एका पुस्तकातील उल्लेख सांगत त्यांनी या दुर्घटनेमागे घातपात असू शकतो, अशी शंका व्यक्त केली. मात्र त्यांनी कोणावर थेट आरोप नसल्याचे स्पष्ट केले. रोहित पवार यांनी व्हिएसआर विमान कंपनी, 'ॲरो' कंपनी आणि कपूर नावाच्या पायलटबाबत संशय व्यक्त केला. ॲरो कंपनीने व्हिएसआरचे विमान भाड्याने घेतले होते. व्हिजिबिलिटी क्लिअर असल्याचे सांगण्यात आले होते. परंतु, प्रत्यक्ष परिस्थिती काय होती, याची चौकशी व्हावी, असे त्यांनी म्हटले. या कंपन्यांचे राजकीय नेत्यांशी संबंध असल्याचाही त्यांनी उल्लेख केला.

''सरकारवर किंवा डीजीसीएवर आरोप नाही. पण, या प्रकरणाची चौकशी तज्ज्ञ संस्थेकडून व्हावी. ब्लॅक बॉक्समधील माहिती तज्ज्ञांसोबत कुटुंबातील प्रतिनिधीला पाहण्याची संधी द्यावी,'' अशी मागणी त्यांनी केली. मुंबई विमानतळावरील सीसीटीव्ही फुटेज तपासले गेले नाही, चौकशी संथ गतीने सुरू आहे, काही गोष्टी दाबल्या जात आहेत, असा आरोपही त्यांनी केला. व्हिएसआर कंपनीकडून पायलटवर दबाव आणला जातो, वेळेआधी फ्लाइट उडवायला भाग पाडले जाते, कॉस्ट कटिंगसाठी सुरक्षेकडे दुर्लक्ष होते, असा गंभीर आरोप त्यांनी केला.

रोहित पवार यांच्या मते, व्हिजिबिलिटी कमी असतानाही विमान उतरवण्याचा प्रयत्न झाला. विमान अन्य विमानतळावर वळवले असते तर कंपनीचे आर्थिक नुकसान झाले असते. त्यामुळे घाई करण्यात आली असावी, असा त्यांचा दावा आहे. तसेच विमानातील स्टॉल वॉर्निंग सिस्टिम बंद होती, पीटीटी सिस्टिममध्ये आवाज नव्हता, देखभाल प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह आहे, असेही त्यांनी नमूद केले. ब्लॅक बॉक्समधून अनेक गोष्टी स्पष्ट होतील, असे ते म्हणाले. या सर्व पार्श्वभूमीवर, हा अपघात होता की घात होता? हा प्रश्न उपस्थित करत रोहित पवार यांनी या संपूर्ण प्रकरणाची सखोल, तांत्रिक आणि निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी जोरदार मागणी केली.

**पूर्व विदर्भातील नेत्याच्या फोननंतर फाईलवर सही**

रोहित पवार यांच्या म्हणण्यानुसार, पूर्व विदर्भातील एका नेत्याकडून फोन आल्याचे सांगितले जाते. त्यानंतर एका महत्त्वाच्या फाईलवर सही करणे आवश्यक असल्याचे कळले. ती फाईल मंत्रालयात असल्याने ती आणण्यात वेळ गेला आणि त्यामुळे प्रवासाचा आराखडा बदलला.

**राजकीय सल्लागाराचा करार रद्द करण्याबाबत चर्चा**

रोहित पवार यांनी सांगितले की, मागील तीन-चार महिन्यांत दादा आणि काही अधिकाऱ्यांमध्ये एका राजकीय सल्लागाराचा शेकडो कोटी रुपयांचा करार रद्द करण्याबाबत चर्चा सुरू होती. त्या कराराचा काही फायदा होत नसल्यामुळे तो रद्द करण्याचा विचार सुरू होता. बारामती येथील हॉस्टेलमध्ये झालेल्या एका बैठकीतही दादांनी काही लोकांना ''राजकारण आम्हाला शिकवू नका, सर्वेक्षणाचे काम करा,'' असे स्पष्ट सांगितल्याचे त्यांनी नमूद केले.

### बारावीच्या परीक्षेला सुरुवात

कला, वाणिज्य, विज्ञान आणि किमान कौशल्य शाखेतील एकूण ३३ हजार १२१ विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले आहेत. पहिल्या दिवशी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत इंग्रजी विषयाचा पेपर शांततेत पार पडला. कोणताही गैरप्रकार घडला नसल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

जिल्ह्यात एकूण ५२ परीक्षा केंद्रांवर या परीक्षा सुरू आहेत. बुधवारी (दि.११) हिंदी विषयाचा पेपर सकाळी ११ ते २ या वेळेत होणार आहे, तर गुरुवारी (दि.१२) मराठी विषयाचा पेपर होणार आहे. हा परीक्षेचा हंगाम १८ मार्चपर्यंत सुरू राहणार आहे. परीक्षेदरम्यान गैरप्रकार होऊ नयेत यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. प्रत्येक परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांची कसून तपासणी केली जात आहे. मुलींच्या तपासणीसाठी महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व परीक्षा केंद्रांवर व्हिडिओ रेकॉर्डिंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दक्षता समितीचे अध्यक्ष किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समिती स्थापन करण्यात आली आहे. कॉपीमुक्त अभियानाची प्रभावी अंमलबजावणी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. जिल्ह्यातील विविध परीक्षा केंद्रांवर गैरप्रकार टाळण्यासाठी नऊ भरारी पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये विभागीय, जिल्हास्तरीय पथके, शिक्षणाधिकारी माध्यमिक, शिक्षणाधिकारी प्राथमिक, शिक्षणाधिकारी योजना, उपशिक्षणाधिकारी माध्यमिक तसेच विशेष महिला भरारी पथकांचा समावेश आहे. याशिवाय तालुका स्तरावर प्रत्येकी एक अशा १५ पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून**

बारावीच्या परीक्षेनंतर आता दहावीच्या परीक्षेची तयारी सुरू झाली आहे. दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होणार असून, त्यासाठी अवघे आठ दिवस शिल्लक आहेत. जिल्ह्यातील ३७ हजार ५७९ विद्यार्थी या परीक्षेला बसणार आहेत. यासाठी ७५ परीक्षा केंद्रांची निवड करण्यात आली आहे.परीक्षेदरम्यान कॉपी किंवा इतर गैरप्रकार होऊ नयेत यासाठी शाळा व महाविद्यालयांमधील शिक्षकांकडून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली आहे. शिक्षण विभागाकडूनही वेळोवेळी सूचना देऊन कॉपीमुक्त परीक्षेसाठी प्रयत्न सुरू आहेत.

**परीक्षेसाठी प्रचंड मेहनत**

दहावी आणि बारावीची परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक आणि करिअरच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांसोबतच पालकांनाही परीक्षेची चिंता वाटत आहे. काही पालकांनी मुलांच्या अभ्यासासाठी कार्यालयातून सुट्टी घेतली आहे. परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पोषक वातावरण मिळावे यासाठी पालक आणि शिक्षक मोठ्या प्रमाणात मेहनत घेत असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे.

### आज संपावर

महागाईवर नियंत्रण, खासगीकरण-कंत्राटीकरण थांबविणे, नवीन शैक्षणिक धोरणाचा पुनर्विचार, शिक्षकांची टीईटी परीक्षा रद्द करणे, मनरेगा कायद्यातील बदल मागे घेणे, माथाडी व असंघटित कामगारांसाठी स्वतंत्र कायदा अशा प्रमुख मागण्या आंदोलनातून मांडल्या जाणार आहेत.महाराष्ट्र शासनाने सुधारित पेन्शनचा प्रश्न १ मार्च २०२४ पासून सोडविण्याचे जाहीर केले असले तरी त्यासंदर्भातील शासन निर्णय अद्याप प्रसिद्ध झालेला नाही. परिणामी, १ मार्च २०२४ नंतर निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना पेन्शनचा लाभ मिळालेला नाही. विनाअनुदानित शाळांतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तातडीने पेन्शन योजनेचा लाभ देण्याचीही मागणी आहे. नगरपंचायत-नगरपरिषद कर्मचाऱ्यांचे आकृतीबंध, चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे प्रश्न, रिक्त पदे, कामाचा वाढलेला ताण, तसेच आरोग्य विमा योजनांचा अभाव यामुळे कर्मचारी वर्गात तीव्र नाराजी आहे. एका कर्मचाऱ्यावर अनेक पदांची जबाबदारी टाकली जात असल्याने प्रशासनिक कामकाजावर परिणाम होत असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे.

कंत्राटीकरण आणि खासगीकरणाच्या धोरणामुळे कायमस्वरूपी नोकऱ्यांवर गदा येत असल्याचा आरोप करत, कायमस्वरूपी भरती करण्याची मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली आहे. या आंदोलनात सरकारी-निमसरकारी कर्मचारी, जिल्हा परिषद कर्मचारी-शिक्षक, सेवानिवृत्त कर्मचारी तसेच संघटित-असंघटित कामगार मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती संयुक्त कृती समितीने दिली आहे.

हे आंदोलन यशस्वी करण्याचे आवाहन कर्मचारी-शिक्षक समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष सुरेश पालकर, निमंत्रक प्रभाकर नाईक, सरचिटणीस संतोष पवार, राज्य सरकारी मध्यवर्ती संघटनेचे परशुराम म्हात्रे, दर्शना पाटील, महाराष्ट्र राज्य पेन्शनर्स संघटनेचे अध्यक्ष संदीप नागे, सर्वहारा जन आंदोलनचे चंद्रकांत गायकवाड, सोपान सुतार आणि रायगड जिल्ह्यातील विविध कर्मचारी-कामगार संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### जे.एम. म्हात्रेंवर ईडीची कारवाई

ही मालमत्ता अवैधरित्या देवाणघेवाणीतून मिळवण्यात आली आहे.

जे.एम. म्हात्रे यांच्यावर पनवेल महानगरपालिकेत आर्थिक गैरव्यवहाराचेही आरोप झाले आहेत. महाराष्ट्र सरकारने १९७५ मध्ये महाराष्ट्र प्रायव्हेट फॉरेस्ट कायद्यांतर्गत वन जमिनीचे अधीग्रहण करण्यात आलं होतं. वन विभागाच्या नावे ही जमीन करण्यात आली होती. जमीन कायद्याने सरकारी वन जमीन होती, पण त्यानंतर घोटाळा केला गेला. वन विभागाचे नाव हटवून जेएम म्हात्रे यांच्यासह इतरांची नावे जमिनीवर लावली गेली. हा बदल अनधिकृत पद्धतीने केला गेला. पुढे हीच जमीन एनएचएआयला विकली गेली. यामुळे कोट्यवधींची नुकसान भरपाई जेएम म्हात्रेंना मिळाली.

एनएचएआयला जमीन दिल्याने जेएम म्हात्रेंना ४२.४ कोटी रुपये भरपाईपोटी मिळाले. ईडीने ही नुकसान भरपाई चुकीच्या पद्धतीने मिळवल्याचं म्हटलं होतं. चौकशीत समोर आलं की याच रकमेतून इतर मालमत्तेची खरेदी केली गेली. तसंच कर्ज फेडण्यासाठी आणि व्यवसायासाठी हा पैसा वापरला गेला. काही कंपन्यांमध्येही पैशांची गुंतवणूक केली गेली. वन विभागाकडून तक्रार आणि एफआयआर दाखल केल्यानंतर ईडीने जून २०२५ मध्ये गुन्हा दाखल केला होता. १७ जून २०२५ रोजी मुंबई आणि नवी मुंबईत जेएम म्हात्रेंच्या ठिकाणांवर ईडीने छापे टाकले. यात १६.५ लाख रुपये इतकी बेहिशोबी रोकड जप्त केली होती. तसंच आठ बँक खाती आणि एफआर गोठवले होते. यात एकूण ४३ कोटी ७८ लाख रुपये होते.

**जमिनीची पार्श्वभूमी**

सर्वे क्रमांक ४२७/१ (४१.७० हेक्टर) आणि ४३६/१ (११०.६० हेक्टर) या जमिनी महाराष्ट्र सरकारने १९७५ मध्ये महाराष्ट्र प्रायव्हेट फॉरेस्ट (अधिग्रहण) अधिनियमांतर्गत ताब्यात घेतल्या होत्या. त्यानंतर ७/१२ उताऱ्यात मालकी हक्क वन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या नावावर नोंदवण्यात आला होता.

**म्युटेशन नोंदीत कथित फेरफार**

ईडीच्या तपासानुसार, जमिनीच्या म्युटेशन नोंदीत कथितरीत्या फेरफार करून वन विभागाचे नाव काढून टाकत जे.एम. म्हात्रे आणि इतरांच्या नावांची नोंद करण्यात आल्याचा आरोप आहे. त्यानंतर या जमिनीचा काही भाग राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला विकण्यात आला.

**२०२५ मधील झडती**

वन विभागाच्या तक्रारीनंतर आणि गुन्हा नोंद झाल्यानंतर जून २०२५ मध्ये ईडीने गुन्हा दाखल केला. १७ जून २०२५ रोजी मुंबई आणि नवी मुंबईतील अनेक ठिकाणी झडती घेण्यात आली. यात १६.५ लाख रुपयांची बेहिशोबी रोकड जप्त करण्यात आली तसेच ८ बँक खाती आणि एफडीआर गोठवण्यात आले. या खात्यांमध्ये सुमारे ४३.७८ कोटी रुपये असल्याची माहिती आहे.

### निधीअभावी शाळांची दुरुस्ती रखडली

१८२ शाळा आणि २५१ ते १००० पटसंख्या असलेल्या २५ शाळा आहेत. या सर्व शाळांना दुरुस्ती, स्वच्छता, रंगरंगोटी, लाईट बिल, शालेय साहित्य आणि इतर किरकोळ खर्चासाठी या अनुदानावर अवलंबून राहावे लागते.

संयुक्त शाळा अनुदानांतर्गत हा निधी पटसंख्येनुसार शाळांना वर्ग करण्यात आला असला, तरी अपुऱ्या निधीमुळे सर्व गरजा पूर्ण करणे कठीण झाले आहे. परिणामी, शाळांमधील डागडुजी, रंगकाम, वीजबिल भरणे यांसारखी अत्यावश्यक कामेही रखडल्याची चर्चा सुरू आहे. निधीअभावी हजारो शाळांची दुरुस्ती लांबणीवर पडली असून, याचा थेट परिणाम शैक्षणिक वातावरणावर होत आहे.

### खंडणी मागणे पडले महागात

पॅकेट पैसे देतात. हॉटेलजवळ बंगल्यांचे काम सुरु आहे. यातील एक बंगला माझ्या पत्नीच्या नावावर कर आणि मला २५ लाख रुपये दे, अशी धमकी दिली. मयुरेश गंभीर याच्या पत्नीने सोन्याच्या दागिन्यांची मागणी केली. तसेच लवेश याने रिसॉर्टमधील कामाचा ठेका मला द्या, असे हिंदीमध्ये सांगून धमकावले. त्यानंतर हॉटेलमधील रुममध्ये नेऊन पिस्तुलचा धाक दाखवून जीवे ठार मारण्याची धमकी दिली. तसेच फिर्यादी चावला यांच्या खिशातून ५० हजार रुपयांची रोकड हिसकावून घेऊन गायब झाले. ही घटना भरदिवसा घडली. याप्रकरणी चावला यांनी पोयनाड पोलीस ठाण्यात मयुरेश गंभीर, मैथली गंभीर आणि लवेश या तिघांविरोधात तक्रार दाखल केली. घटनेचे गांभीर्य ओळखून सहाय्यक पोलीस निरीक्षक विजयकुमार देशमुख यांनी आरोपींचा शोध घेऊन त्यांना गजाआड केले. अलिबागमधील न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने मयुरेशला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. मयुरेश गंभीरविरोधात पेण, पोयनाड, मांडवा सागरी, अलिबाग, उरण पोलीस ठाण्यात १८ गुन्हे दाखल आहेत.

### पोलीस निरीक्षकाची कॉलर पकडली

पोलिसांनी ताब्यात घेतला. यावेळी स्वप्निल गायकर याला पोलिसांनी घोषणा देण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याने पोलिसांसोबत हुज्जत घातली. यावेळी खारघर येथील पोलीस निरीक्षक सूरज पाटील यांची कॉलर धरून त्यांना धक्काबुक्की तसेच शिवीगाळ करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पोलिसांनी स्वप्निल गायकर याला ताब्यात घेतले आणि त्याच्याविरोधात ९ फेब्रुवारी गुन्हा दाखल केला.

### लोकसभा अध्यक्षांविरोधात अविश्वास प्रस्ताव

९४(क) अंतर्गत मांडण्यात आला आहे, ज्यामध्ये लोकसभेच्या कामकाजात 'स्पष्टपणे पक्षपाती पद्धतीने' चालविल्याचा आरोप करण्यात आला आहे. विरोधी पक्षांच्या नेत्यांना सभागृहात बोलू दिले जात नाही, याला मूलभूत लोकशाही अधिकाराचा भंग म्हटले आहे. या प्रस्तावात अलीकडील घटनांचादेखील उल्लेख आहे, ज्यात धन्यवाद प्रस्तावाच्या चर्चे दरम्यान राहुल गांधींना त्यांचे भाषण पूर्ण करू न देणे आणि आठ विरोधी खासदारांचे निलंबन यांचा समावेश आहे. लोकसभेत दीर्घकाळ सुरू असलेल्या गदारोळाच्या पार्श्वभूमीवर हे पाऊल उचलण्यात आले आहे. लोकसभेचे महासचिव यांना नोटीस सुपूर्द केल्यानंतर, ओम बिर्ला सभागृहाच्या कामकाजात सहभागी झाले नाहीत.

**महाराष्ट्र शासन**
**आधारसामग्री संकलन व नियोजन व जलविज्ञान मंडळ, नाशिक अंतर्गत,**
**कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प, कळवा (ठाणे)**
**पत्ता :- सहकारविद्यालय समोर, जुना मुंबई-पुणे महामार्ग, कळवा (ठाणे) ४००६०५**
ई-मेल:- eehpthn@rediffmail.com दूरध्वनी क्रमांक ०२२-२५४२६०५३
(Recall-४ फेर-४)ई-निविदा सुचना क्र.०२ सन २०२५-२०२६
Main Portal : http://mahatenders.gov.in

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, कळवा (ठाणे) महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन निविदा मागवित आहे. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, कळवा (ठाणे) यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविणेत येईल.

कामाचे नांव :- Real time data acquisition system (RTDAS- 3 ) For west ward Forwing rivers Basins in Konkan region to control flood, ,

जिल्हा : ठाणे
निविदेची अंदाजित किंमत: रु. २,८०,३२,००० /-
ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक- ११/०२/२०२६ ते दिनांक- १८/०२/२०२६
ई-निविदा उघडणे :- दिनांक :- २०/०२/२०२६ वेळ १७.०० वा.
स्थळ : कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, कळवा (ठाणे) यांचे कार्यालय
✻ संकेत स्थळावर प्रसिद्ध होणाऱ्या निविदा उघडण्याची तारीख व वेळेनुसार कंत्राटदाराने किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधीने संबंधित कार्यालयात उपस्थित रहावे. अन्यथा निविदा उघडल्यास कोणतीही तक्रार स्वीकारली जाणार नाही ✻

जा.क्र.जविप्रविक/लेशा-२/१३४/२०२६
कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग,
कळवा (ठाणे) यांचे कार्यालय,
दिनांक :- ०९/०२/२०२६

सही/-
**(श्रीमती वै.रा.कुरणे)**
**कार्यकारी अभियंता,**
**जलविज्ञान प्रकल्प विभाग,**
**कळवा (ठाणे)**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. :- 7000038826**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-1/2026-2027**<br>RFx E-tender for Providing service for housekeeping, cleaning, sweeping and Garden Maintenance, Water Tank Cleaning work at various Substation and offices under EHV (O&M) Division, Panvel for FY 2026-27.<br>**Tender amount Limited to Rs. 25,27,094/-,**<br>**EMD amount Rs. 25,271/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **11.02.2026, 18:00 Hrs. to 26.02.2026, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 26.02.2026 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **27.02.2026 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**Executive Engineer,**
**E.H.V.(O&M) Dn. Panvel**

**पनवेल महानगरपालिका**
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | कार्यकारी अभियंता, पनवेल महानगरपालिका, पनवेल, | ०१ रेन ट्री झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती अ, खारघर मधील भुखंड क्र. १६ सेक्टर १४, स्मशानभुमी येथे नैसर्गिक वायुप्रवाहावर आधारित आधुनिक लाकूड आधारित अंत्यसंस्कार प्रणालीचे बांधकाम करणेस ०१ झाड बाधित होत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडणी करण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी**
पनवेल महानगरपालिका

जा.क्र.- PMC-PARK/42/2026-PTAD

## निवडक



### अंतुले यांची जयंती साजरी

**म्हसळा** : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री स्व. बॅ. ए.आर. अंतूले यांच्या जयंती निमित्त म्हसळा येथील वसंतराव नाईक तसेच बॅ.ए.आर. अंतूले महाविद्यालयात सकस खाद्य महोत्सव कार्यक्रम व अन्नधान्य वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी एकूण १०० गरजुंना याचा लाभ मिळाला. कोकण उन्नती मित्र मंडळाचे सचिव अशोक तळवटकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमाला संस्था खजिनदार वंदना विचारे, महाविद्यालयीन विकास समिती विश्वस्त सचिव प्रतिनिधी फझल हळदे, डॉ. मुश्ताक मुकादम, विकास समिती सदस्या निलम वेटकोळी, समाज सेवक निजाम कागदी, नफिस शहापुरी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य दिगंबर टेकळे यांनी केले. सूत्र संचालन प्राध्या. बेंद्रे, प्रा.भोसले यांनी केले.

### अत्याचार करणारा तरुण अटकेत

**पनवेल :** अल्पवयीन मुलीसोबत मैत्री करून तिच्यावर अत्याचार करणाऱ्या तरुणाला कामोठे पोलिसांनी अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मनीष वारीया (२८) असे तरूणाचे नाव असून तो रसायनी येथील रहिवासी आहे. त्याने सुरुवातीला १४ वर्षीय पीडित मुलीसोबत मैत्री करून तिच्यासोबत जवळीक साधली. त्यानंतर त्याने तिच्यावर अत्याचार केले. याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आल्यावर पोलिसांनी मनीष याच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर पोलिसांनी त्याला पनवेल-अलिबाग रोड येथून अटक केली. त्याला न्यायालयात हजर केले असता, त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

### कळंबोली वसाहतीमधून वृद्ध बेपत्ता

**पनवेल :** ८० वर्षीय वृद्ध व्यक्ती कळंबोली वसाहती मधून हरवल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गजानन कृष्णा तांबुसकर असे या व्यक्तीचे नाव आहे. त्यांचा बांधा मजबुत, उंची १६८ सेमी, रंग-सावळा, चेहरा उभट, तोंडात एकहि दात नाही, नाक सरळ, केस कमी टक्कल पडलेले, दाढी पांढरी, अंगात आकाशी रंगाचा शर्ट, काळी पँट असून त्याला मराठी व हिंदी भाषा येते. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कळंबोली पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार एम.बी. पवार यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### नवी मुंबई पोलिसांच्या सेवेत 'सजग ॲप'

**पनवेल :** नवी मुंबई पोलिसांकडून गस्त पोलीस सेवेचे डिजिटलायझेशन करण्यात येत आहे. या प्रक्रियेचा भाग म्हणून पोलिसांसाठी सजग ॲप आणि डॅश कॅमेरा दिला जात आहे. याशिवाय प्रायोगिक तत्त्वावर सजग ॲप हे स्मार्ट वाचप्रमाणे काम करणार आहे. गस्त पोलीस पथक ज्या-ज्या ठिकाणी गस्त घालण्यासाठी गेले, त्याची माहिती या ॲपद्वारे मिळते. या शिवाय गस्त घालत असताना कोण कुठे, किती वेळ थांबले याचीही माहिती साठवली जाते. चारचाकी गाड्यांतूनही गस्त घालत असताना त्यांना डॅश कॅमेरा पुरवण्यात येत असून त्याद्वारे ज्या-ज्या ठिकाणी गस्त पथक गेले त्याचे चित्रीकरण करून ते जतन करण्यात येणार आहे. नवी मुंबई पोलिसांच्या वाहतूक शाखेतील कर्मचाऱ्यांना आतापर्यंत दहा बॉडी वॉर्न कॅमेरे देण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांची संख्या आणखी वाढवण्यात येणार आहे. बॉडी कॅमेऱ्यामुळे पोलिसांच्या कारवाईमध्ये पारदर्शकता राहणार आहे. सजग ॲपमुळे त्यात अजून सुधारणा होईल, अशी आशा आयुक्त मिलिंद भारंबे यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, नवी मुंबई पोलिसांनी आयुक्तालय कार्यालयाच्या आवारात सीसीटीव्ही कमांड सेंटरची स्थापना केली आहे. तळ मजल्यावर हे काम सुरू असून पहिल्या मजल्यावर त्याचे प्रशिक्षण केंद्र आहे. एखादी छोटी मोठी घटना घडल्यावर जेव्हा वेगात अगोदर गस्त पोलीस पथक जाते त्यावेळी सजग ॲपचा सर्वाधिक फायदा होणार आहे. सध्या माहिती मिळताच नवी मुंबई पोलीस सुमारे सहा मिनिटांत पोहचतात. हा राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचा वेगवान वेळ आहे.वाहतुकीच्या नियमांचा भंग केल्याप्रकरणी २०२४ मध्ये एकूण ८ लाख ८७ हजार ७७० गुन्हे दाखल करण्यात आले होते. २०२५ मध्ये हे प्रमाण वाढून ९ लाख ८० हजार ८०६ वर गेले. हेल्मेट न घालणाऱ्या २ लाख ३ हजार ४३७ दुचाकीस्वारांवर वर्षभरात कारवाई केली आहे.

# अलिबागमध्ये सेवा, योजनांचा महामेळावा

## वेगवेगळ्या शासकीय योजना एका छताखाली; जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचा पुढाकार

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

सर्वसामान्य घटकाला एका छताखाली योजनांच्या लाभांसह त्यांना सर्व योजनांची माहिती मिळावी, यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने पुढाकार घेतला आहे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड-अलिबाग व जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबागमध्ये विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय सेवा योजनांचा महामेळावा आयोजित केला आहे. कुरुळ येथील आरसीएफ हॉलमध्ये शनिवारी (दि.१४) हा उपक्रम राबविला जाणार असल्याची माहिती सचिव तथा न्यायाधीश तेजस्विनी निराळे यांनी दिली.



प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष राजेंद्र सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली या महामेळाव्याचा उद्घाटन सोहळा सकाळी १० वाजता होणार आहे. यावेळी रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा सरकारी वकील ॲड. संतोष पवार, अलिबाग बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. प्रसाद पाटील आदी मान्यवरांसह वेगवेगळ्या क्षेत्रातील अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित असणार आहेत. या मेळाव्यामध्ये कायदेविषयक तसेच एसटी महामंडळ, प्रादेशिक परिवहन, महसूल, क्रीडा, आरोग्य, शिक्षण, कृषी, मत्स्य, समाजकल्याण, महिला व बालकल्याण तसेच जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येणाऱ्या सर्व विभागाची माहिती मिळणार आहे. त्यासाठी ३१ हून अधिक स्टॉल उभारण्यात येणार आहेत. वंचित घटकाचा सर्वांगिण विकास साधण्याबरोबरच शासनाच्या सर्व योजनांची माहिती त्यांच्यापर्यंत पोहचविण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. त्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. जिल्ह्यातील सर्व विभागाचा या मेळाव्यामध्ये सहभाग असणार आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून कायदेविषयक सेवांसह वेगवेगळ्या शासकीय योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत यांनी केल्याची माहिती तेजस्विनी निराळे यांनी दिली.

### वंचित, दुर्बल गरजूंना मिळणार योजनांचा लाभ

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबागमध्ये महामेळावा आयोजित केला आहे. शासकीय योजनांचा लाभ वंचित घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी हा महामेळावा आयोजित केला आहे. कायदेविषयक माहिती व शासकीय योजना जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहचविण्यासाठी हा उपक्रम सुरु केला आहे. वंचित, दुर्बल, गरजू घटकांपर्यंत प्रभावीपणे योजनांचा थेट लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यावेळी प्रातिनिधीक स्वरुपात निवडणक लाभार्थ्यांना योजनांचा लाभही तात्काळ देण्यात येणार असल्याची माहिती अलिबाग बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. प्रसाद पाटील यांनी दिली.

## जिल्हा चिटणीसपदी नितीन पाटील

**। हमरापूर । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र नवनिर्माण सुरक्षा सेनेच्या रायगड जिल्हा चिटणीसपदी पेण तालुक्यातील खारसापोली येथील नितीन पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आशीर्वादाने कामगार सेनेचे अध्यक्ष मनोज चव्हाण तसेच सुरक्षा रक्षक सेनेचे अध्यक्ष नंदकिशोर तळवडेकर, उपाध्यक्ष रुपेश ओवाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली नितीन पाटील यांची ही नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी रायगड जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील, जिल्हा चिटणीस कामगार सेना पंकज शहा, दिलीप पाटील, जिल्हा महिला उपाध्यक्ष छाया शिंदे, पेण तालुका अध्यक्ष महिला गौरी ओरा, शालोम



पेणकर, सुरेंद्र गावंड, उपतालुकाध्यक्ष श्रीराम पाटील, शहराध्यक्ष सुदेश संसारे, अल्पसंख्या अध्यक्ष इमरान बेमजी, उपशहर अध्यक्ष ऋषी कोळी यांच्यासह महाराष्ट्र निर्माण सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते. या निवडीबद्दल नितीन पाटील यांचे तालुक्यातून तसेच जिल्ह्यातून अभिनंदन होत आहे.

## कर्जतमध्ये आरोग्य सुविधांचा बोजवारा

**■ आरोग्य केंद्र उपलब्ध करून देण्याची मागणी**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात आरोग्य सेवेचा बोजबारा वाजला आहे. या भागात एखादे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यासाठी राजकीय पक्षांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करणारे मागणी पत्र अस्सल येथील कार्यकर्ते सचिन गायकवाड यांनी केली आहे. सरकारच्या पोर्टलवर अशा प्रकारचे निवेदन पाठवून देण्यात आले असून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत नेत्यांना या आरोग्य समस्येबाबत जाग आली नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

कर्जत तालुक्यातील अस्सल ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील सात आदिवासी वाड्यांसाठी स्वतंत्र व सुसज्ज मध्यवर्ती प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्याची मागणी अनेक वर्षापासून होत आहे. कर्जत तालुका हा आदिवासीबहुल व डोंगराळ भाग आहे. या तालुक्यातील अस्सल ग्रुप ग्रामपंचायत हद्दीमध्ये चिंचवाडी, सागाची वाडी, पाली धनगर वाडा, बोरीची वाडी, नाण्याचा माळ, भुतिवली व अस्सलवाडी अशा एकूण सात आदिवासी वाड्या असून त्या सर्व वाड्या डोंगर माथ्यावर आणि अतिदुर्गम परिसरात वसलेल्या आहेत. या वाड्यांमधील आदिवासी समाज आजही मूलभूत आरोग्य सुविधांपासून पूर्णतः वंचित आहे. पावसाळ्यात रस्त्यांचा अभाव, वाहतुकीची कोणतीही सोय नसणे आणि दुर्गम भौगोलिक परिस्थिती यामुळे आजारी रुग्ण, गरोदर महिला, लहान मुले तसेच वयोवृद्ध नागरिकांना वेळेवर उपचार मिळणे अत्यंत कठीण झाले आहे. अनेक वेळा गंभीर प्रसंगी रुग्णांना कावड करून किंवा अत्यंत धोकादायक परिस्थितीत खाली आणावे लागते, ही अत्यंत वेदनादायक आणि गंभीर बाब आहे.

विशेषतः आदिवासी महिलांच्या आरोग्य समस्या, गरोदर मातांची काळजी, प्रसूतीपूर्व आणि प्रसूतीनंतरचे उपचार, किशोरवयीन मुलींच्या आरोग्य समस्या तसेच लहान बालकांचे लसीकरण याबाबत आजही योग्य वैद्यकीय मार्गदर्शन व उपचार उपलब्ध नाहीत. परिणामी काही ठिकाणी जुन्या रूढी-परंपरांवर आधारित उपचार पद्धती अवलंबल्या जात असून त्यानंतरचे गंभीर आणि कधी कधी प्राणघातक परिणाम होत आहेत. तरी या सातही आदिवासी वाड्यांसाठी प्रशासनाला सोयीस्कर ठरेल अशा एका मध्यवर्ती ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्यात यावे. या आरोग्य केंद्रामध्ये नियमित डॉक्टर व निवासी प्रशिक्षित नर्स नेमण्यात यावी. गरोदर महिलांसाठी प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतरची सेवा उपलब्ध करून देण्यात यावी. त्यामुळे आदिवासी समाजाचे आरोग्य सुरक्षित होईल, माता-मृत्यू व बाल-मृत्यूचे प्रमाण कमी होईल तसेच शासनाच्या आरोग्यविषयक योजना प्रत्यक्षात प्रभावीपणे राबवता येतील, अशी मागणी करणारे निवेदन सरकारी पोर्टलवर करण्यात आली आहे.

## नेरळमध्ये भुयारी मार्ग बांधण्याची मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ पाडा येथील रेल्वे क्रॉसिंग वरील गेट क्रमांक २१ बंद केले जाणार असल्याचे बोलले जात आहे. या परिसरात रेल्वेकडून ओव्हर ब्रिज बनविला जाणार असून सध्याच्या अस्तित्वात असलेल्या फाटक परिसरात रेल्वे मार्गाच्या खाली भुयारी मार्ग बनविण्यात यावा, अशी मागणी पाडा ग्रामस्थांनी केली आहे. अशा आशयाचे पत्र खासदार तटकरे यांना देण्यात आले आहे.



मध्य रेल्वेच्या मुंबई-पुणे रेल्वे मार्गावरील नेरळ स्टेशन जवळील नेरळ पाडा येथे असलेल्या रेल्वे क्रॉसिंग वरील गेट क्रमांक २१ बंद करून त्याऐवजी रेल्वे ओव्हर ब्रिजचे काम प्रस्तावित आहे. भविष्यात उड्डाण पुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर नेरळ पाडा गेटमधून येणे-जाणे बंद होण्याची भीती आहे. त्यामुळे नेरळ पूर्व भागातील व परिसरात असलेल्या गावांतील ग्रामस्थांची नेरळ मध्ये बाजारहाट करण्यासाठी, मुलांना शाळेत नेण्यासाठी, रुग्णांना दवाखान्यात जाण्यासाठी त्रासाचे होणार आहे.अशावेळी स्थानिकांना उड्डाण पुलावरून वळसा घालून जावे लागणार आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे पूर्वापार असलेल्या हिंदू समाजाच्या स्मशानभूमी आणि मुस्लिम धर्मीय दफन भूमी नेरळ पश्चिमकडे आहेत. त्यामुळे अंत्यविधीसाठी प्रेत स्मशानात घेऊन जातांना खूप मोठा वळसा घालावा लागणार आहे. रेल्वेने त्यांच्या भागात सुधारणा करतांना नागरिकांसाठी असलेला जवळचा मार्ग बंद करू नये. उड्डाण पुलाचे बांधकाम प्रस्तावित करतांना रेल्वेने नागरिकांच्या कोणत्याही प्रकारे हरकती मागविल्या नाहीत की सूचना मागविल्या नाहीत. हजारो लोक रेल्वे मार्गाच्या दोन्ही बाजूस राहतात. आणि त्यांना विविध कामांसाठी परस्पर विरुद्ध भागात चालत जावे लागते. त्यांना प्रत्येकवेळी उड्डाण पुलावरून जाणे शक्य नाही.



## माता रमाई फाऊंडेशनची स्थापना

**। पाली-बेणसे । प्रतिनिधी ।**

माता रमाई भिमराव आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंती दिनी माता रमाई फाऊंडेशन या सामाजिक व शैक्षणिक संस्थेचा उद्घाटन सोहळा नुकताच पालीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे पार पडला. हा सोहळा सुधागड तालुका बौद्धजन पंचायत संस्थेचे सुप्रीम कमिटी अध्यक्ष आयु. मारुती गायकवाड, आयु. प्रभाकर गायकवाड, जयवंत कांबळे, मध्यवर्ती कमिटीच्या माजी महिला अध्यक्षा नूतन शिंदे, रोहिणी जाधव, मनीषा कांबळे, संस्थेच्या महिला सचिव निता कांबळे, यशवंत कांबळे, विलास जगताप, मोरेश्वर कांबळे, तसेच प्रमुख पदाधिकारी यांच्या उपस्थितीत पार पडला.

## कमळाकर साखळे यांच्या निधनाने हळहळ

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

रेवदंडा येथील शेतकरी पक्षाचे ज्येष्ठ नेते, रेवदंडा ग्रामपंचायतीचे माजी सदस्य, तसेच अलिबाग कृषी उत्पन्न बाजार समितीचे व सुमित्र पतसंस्थेचे विद्यमान अध्यक्ष



कमळाकर उर्फ आप्पा साखळे यांचे मुंबई येथील खासगी रूग्णालयात निधन झाले, निधनासमयी त्यांचे वय ७४ वर्ष होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने संपूर्ण रेवदंडा सहीत पंचक्रोशीत हळहळ व्यक्त झाली. त्यांच्या निधनाचे वृत्त समजतात, विविध स्तरातील मंडळीने त्यांच्या अंत्यदर्शनासाठी गर्दी केली होती.

## सुशोभिकरणासाठी लावलेली झाडे जाळली

**। उरण । प्रतिनिधी ।**

द्रोणागिरी नोड येथील रस्ता सुशोभीकरण्यासाठी सिडकोकडून सुमारे १ कोटी रुपये खर्च करून लावण्यात आलेली नारळाची झाडे काही समाज कंटकांकडून जाळून टाकली आहेत. तसेच, रस्त्याच्या बाजूला असलेल्या खारफुटीच्या झाडांना देखील झळ लागली असून ती झाडे देखील होरपळली आहेत. त्यामुळे निसर्गप्रेमींकडून संताप व्यक्त केला जात आहे.

उरण द्रोणागिरी नोड परिसरातील रस्त्यांवर विविध प्रकारची झाडे लावण्याचा संकल्प शासनाच्या 'माझी वसुंधरा' या माध्यमातून सिडकोने हाती घेतला आहे. त्या धर्तीवर सिडकोने पागोटे, भेंडखळ, करंजा बंदर या द्रोणागिरी नोड परिसरातील नव्याने निर्माण करण्यात आलेल्या कोस्टल रस्त्यांवर सुमारे १ कोटी रुपये खर्च करून नारळाची ४ हजार झाडे लावली आहेत. या झाडांचे संरक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी ही सिडकोची आहे. त्यामुळे सिडको दरवर्षी पावसाळ्यानंतर या झाडांचे जतन व संवर्धन करण्यासाठी ठेकेदाराच्या माध्यमातून लाखो रुपये खर्च करुन नारळाच्या झाडांची देखभाल करत आहे. मात्र, सिडकोच्या दुर्लक्षित पणामुळे या रस्त्याच्या बाजूला काही परप्रांतियांनी बेकायदेशीर टपऱ्या व झोपड्या बांधल्या असून त्यामध्ये अवैध व्यवसाय सुरू केला आहे. त्यातील काही व्यवसायिक व सिडकोकडून झाडांचे जतन, संवर्धन करण्याचा ठेका घेणारे ठेकेदार हे झाडा जवळील गवत काढून न टाकता ते गवत जाळून टाकत आहेत. तरी सिडकोने ही झाडे जाळणाऱ्यांचा शोध घेऊन कडक कारवाई करावी, अशी मागणी सध्या जनतेतून करण्यात येत आहे.


**आर्ट फेस्टिवल स्पर्धेत प्रथम पारितोषिक | प्रताप सरनाईक यांच्या हस्ते सन्मान**

# छायाचित्रकार सुधीर नाझरे यांची 'फोटो वारी'


**। मुरूड-जंजिरा । प्रतिनिधी ।**

ठाणे संस्कृती आर्ट फेस्टिवलमध्ये 'पंढरपूर वारी' या विषयावर आधारीत छायाचित्रे राज्यभरातून मागवण्यात आली होती. त्यातील हजारो छायाचित्रांतून सुधीर नाझरे यांच्या चित्राला प्रथम क्रमांकचा पुरस्कार प्राप्त झाला. नुकतेच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते सुधीर नाझरे यांचा सन्मान करण्यात आला. या सन्मान सोहळ्यादरम्यान सरनाईक यांनी नाझरे यांच्या छायाचित्राची प्रशंसा देखील केली. तसेच, सुधीर नाझरे यांच्या 'फोटो वारी'तून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन संपुर्ण जगाला घडत आहे.

सुधीर नाझरे गेली २२ वर्षे वृत्तपत्र छायाचित्रकार म्हणून काम करत आहेत. त्यांना महाराष्ट्रातील ४३ पुरस्कार प्राप्त झाले असून त्यांचे महाराष्ट्रात १२ ठिकाणी छायाचित्रांचे प्रदर्शन झाले आहे. मागील ३ वर्षे जागतिक स्पर्धेत नाझरे यांनी भाग घेण्यास सुरवात केली. आज त्यांच्या



विविध चित्रांना १७३ सुवर्णपदक प्राप्त झाले आहेत. तसेच, फोटोग्राफी सोसायटी ऑफ अमेरिकाचे अनेक सुवर्णपदक मिळवून महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा असलेले चित्र जगासमोर ते मांडत आले आहे. गेल्यावर्षी रशियात झालेल्या फोटो ऑलम्पिक २०२५ साठी भारतातून ९५ छायाचित्रकारांची निवड



करण्यात आली होती. त्यात भाताचे ५ छायाचित्रकार निवडले गेले होते. त्यात महाराष्ट्रातून सुधीर नाझरे यांचा देखील समावेश होता. रशियातील फोटो प्रदर्शनात सुधीर नाझरे यांचे पंढरपूर वारीतील २ छायाचित्र प्रर्दशित झाले होते.

आता नुकतीच ठाणे संस्कृती आर्ट फेस्टिवलमध्ये 'पंढरपूर वारी' या विषयावर छायाचित्र स्पर्धा पार पडली. त्यासाठी राज्यभरातून छायाचित्रे मागविण्यात आली होती. त्यातील हजारो छायाचित्रांतून सुधीर नाझरे यांच्या छायाचित्राला प्रथम क्रमांकचा पुरस्कार प्राप्त झाला. त्याचा सन्मान सोहळा सोमवारी (दि.९) ठाणे उपवन आर्ट गॅलरी येथे पार पडला. यावेळी सुधीर नाझरे यांना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते ११ हजार रोख व सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. आळंदी व देहू येथून माऊलींची व तुकारामांची पालखी वारकरी पायी चालत पंढरपूरला जातात. त्यावेळचे जिवंत अनुभव टिपण्याचे काम सुधीर नाझरे यांनी केले आहे. गेली १५ वर्षे वारीचे छायाचित्रण करत असल्याने वारीतील प्रत्यक्ष क्षणाचे फोटो त्यांच्या संग्रही आहेत. त्यामुळे यावेळी ठाणेकरांना वारीचे सुंदर दर्शन ठाणे उपवन आर्ट गॅलरी येथे घडले. या प्रदर्शनाला ४ दिवसांत ३ लाख ठाणेकरांनी भेट देऊन पांडुरंगाची वारीचा आनंद घेतला. यावेळी उर्वरित छायचित्रकार सुभाजित मुखर्जी, हरी मुलमुले, अक्षय चंद्रकांत येवगे, महेश अंबरे, प्रशांत एस. खरोटे, सोहम बावस्कर, जय मावळे व शरद इरागोंडा पाटील यांचा देखील सन्मान करण्यात आला.

## झाडाला धडक लागून अपघात



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

शहापूर-कर्जत या राष्ट्रीय महामार्गावर असलेले खड्डे जीवघेणे ठरत आहेत. अशातच कशेळे येथील खड्डे चुकवत असलेल्या दुचाकीला वाचवताना प्रवासी वाहन थेट रस्त्याच्या बाजूला असलेल्या झाडावर आढळले. या दुचाकीस्वार किरकोळ जखमी झाले आहेत.

शहापूर-कर्जत राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावर कशेळे गावाच्या हद्दीत रस्त्यावर प्रचंड खड्डे आहेत. हे खड्डे वाहनचालकांसाठी धोक्याचे असल्याचे सांगितले जात आहेत. मात्र, राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडून रस्त्यावर असलेले खड्डे बुजविण्याची कार्यवाही होत नाही. त्याचा परिमाण रस्त्याने वाहतूक करणाऱ्या अनेकांना अपघाताला सामोरे जावे लागले आहे. कशेळे गावाजवळ एक पी पेट्रोल पंपाशेजारी एक दुचाकीस्वार हा रस्त्यावरील खड्डा चुकवत असताना अचानक त्याची दुचाकी रस्त्याच्या मधोमध आली. त्याचवेळी समोरून येणाऱ्या कारचालकाने दुचाकीला वाचविण्याचा प्रयत्न केला असता त्यांची गाडी थेट रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर आदळली. यावेळी दुचाकीस्वाराला थोडासा धक्का लागून त्याला किरकोळ दुखापत झाली. कारच्या देखील सर्वच एअर बॅग उघडल्याने चालकाला देखील किरकोळ दुखापत झाली. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही.

# सोईस्कर आणि लबाड

सरसंघचालक मोहन भागवत यांची मुंबईत दोन दिवस प्रवचने झाली. संघ शताब्दीनिमित्त सध्या प्रमुख शहरांमध्ये जाऊन सेलिब्रिटींसमोर संघाचे कीर्तन करण्याचा हा उपक्रम आहे. यापूर्वी दिल्लीत देशोदेशींच्या राजदूतांना वगैरे जमवून विज्ञान भवनात त्यांची अशीच प्रवचने झाली होती. नंतर बंगळुरुत आयटीतल्या लोकांपुढे ज्ञान झाडण्यात आले. मुंबई म्हणजे तर सेलिब्रिटींचे आगर. हिंदी चित्रपटसृष्टी आणि उद्योगधंदे यांच्यातले नामी-गिरामी इथे राहतात. एरवी हे लोक फुकटचे पाच पैसेही कोणाला देत नाहीत. पण फायदा असेल किंवा सत्तेची भीती असेल तर हे काहीही करू शकतात. त्यानुसार हे तद्दन भंपक सिनेस्टार आणि उदयोगपती वगैरे दोन दोन दिवस भागवतांपुढे खोट्या भक्तिभावाने बसलेले होते. राजस्थानात हरणं मारण्याचा आरोप असलेला सलमान खान ते ठिकठिकाणी पर्यावरणाची वाट लावण्याचे आरोप असलेले जिंदाल असे सगळे तिथे होते. भाजपमुळे संघाला अच्छे दिन आलेले नसून संघामुळे भाजपला अच्छे दिन आले आहेत असे भागवत म्हणाले. ते खरे असेल. पण या देशात मुळात सामान्य लोकांना अच्छे दिन येणार होते त्याचे काय झाले हे ना मोदी सांगतात, ना भागवत सांगतात. पण भाजप सध्या सत्तेत असल्यामुळेच संघाच्या अशा व्याख्यानांना रॉयल ट्रीटमेंट मिळते हे उघड आहे. प्रचंड प्रसिध्दी, सुरक्षा व्यवस्था, आलिशान सभागृहामध्ये आयोजन आणि मी- मी म्हणत भले भले भागवतांचा हा सत्संग ऐकायला हजर असा सगळा माहौल मोदी-शाह यांना खूष करण्यासाठी आहे हे खुद्द भागवतांनाही ठाऊक आहे. त्यामुळे भाजप सत्तेत संघामुळे आला असेल. पण भागवत विज्ञान भवन आणि नेहरु सेंटरमध्ये भाषणे ठोकत आहेत ती मोदींच्या भाजपची कृपा आहे हे तितकेच खरे आहे. भागवतांनी नंतर अदनान सामीसोबत बसून जेवण केले असे फोटो प्रसिध्द झाले आहेत. या अदनान सामीचे वडील पाकिस्तानी सैन्यात होते आणि त्यांनीच १९६५ च्या युध्दात भारताच्या पठाणकोट हवाई दल तळावर हल्ला केला होता. भाजप आणि संघवाले इथल्या साध्या मुसलमान फळवाल्यांवर बहिष्कार घालून त्यांचे जिणे हराम करणार आणि दुसरीकडे भागवत अदनानबरोबर फलाहार करणार असा हा सगळा मामला आहे.

## दलित आणि आदिवासी देखील

भागवतांच्या भाषणांमध्ये खरे तर नवीन असे काही नसतेच. तरीही काही गोष्टींना पुन्हा प्रसिध्दी मिळते. सबब त्यांची दखल घेणे भाग पडते. दलित किंवा आदिवासी देखील संघाचा सरसंघचालक होऊ शकतो असे भागवत यावेळी म्हणाले व ती अनेकांची हेडलाईन झाली. या देशातील सर्व हिंदू पाच हजार वर्षांपासून एकच आहेत असे संघवाले सांगतात. ब्रिटिशांनी इथे जातिभेदाचे विष पेरले असे सांगून संघवाले गेले १०० वर्षे हिंदू संघटनाचे काम करीत असतात. असे असूनही दलितसुध्दा प्रमुख होऊ शकतात असे जेव्हा भागवत म्हणतात तेव्हा दलित हे प्रस्थापित हिंदूंपेक्षा वेगळे व खालच्या दर्जाचे आहेत हेच भागवत मान्य करत असतात. महाराष्ट्रात यवतमाळ किंवा चंद्रपूर या जिल्ह्यांतला नेताही मुख्यमंत्री होऊ शकतो असे कोणी कधी म्हणत नसते. कारण राजकीय पातळीवर सर्व जिल्हे समान आहेत हे गृहित असते. म्हणून तर वसंतराव नाईक आणि मारोतराव कन्नमवार हे याच जिल्ह्यातले नेते काँग्रेसच्या काळात सहजपणे मुख्यमंत्री होऊ शकले. नंतरही अमुक जाती किंवा जमातीचा माणूसही मुख्यमंत्री होऊ शकतो असे न म्हणता काँग्रेसने अ.र. अंतुले आणि सुशीलकुमार शिंदे यांना सहजपणे मुख्यमंत्री केले. हिंदू ऐक्याचा दावा करणाऱ्या संघामध्ये मात्र ते आजतागायत घडू शकलेले नाही. उलट ते देखील होऊ शकतात असे सांगून भागवत आम्ही कुठे त्यांना अडवतोय अशा ब्राह्मणी भूमिकेत जाताना दिसतात. मुसलमानही आपलेच आहेत असे ते सांगतात. त्यांना कोणीतरी सांगायला हवे की, या देशातले सगळे लोक, सर्व समाज समान पातळीवर आहेत. मुसलमान आमचेच आहे असे सांगणे म्हणजे हा देश हिंदूंच्या मालकीचा असून मुसलमान वगैरेंना आमच्या गोठ्यात राहू देत आहोत असा हा भाव व्यक्त करणे होय.

## नैतिकतेचा बुरखा

त्याहूनही वाईट गोष्ट ही की, भागवतांच्याच विविध संघटनांचे हिंदू कार्यकर्ते देशभरातल्या मुस्लिमांना अतिशय वाईट वागवत आहेत. त्यांच्या धंद्यावर बहिष्कार घालत आहेत. गोरक्षणाच्या नावाखाली त्यांचे खून पाडत आहेत. पण भागवत हिंदू धर्माच्या वतीने एकदाही याबाबत कधी खेद व्यक्त करताना किंवा या कार्यकर्त्यांचा निषेध करताना दिसत नाहीत. येता-जाता संस्कार, संस्कार असा जप हे करतात. पण नेमके यांचेच लोक हिंदुत्वाचे नाव घेऊन देशात विद्वेष पसरवत फिरताना दिसतात. त्याबद्दल भागवतांनी कधी तरी जबाबदारी घ्यावी आणि काळजी व्यक्त करावी अशी अपेक्षा आहे. अन्यथा, हे सर्व त्यांच्याच उद्दिष्टाबरहुकुम चालू आहे असे समजावे लागेल. संघ कधीही राजकारण करीत नाही असे सांगायचे, पण आडून आडून सर्व राजकीय विषयांवर बोलायचे ही खाली मुंडी, पाताळ धुंडी वृत्ती याही भाषणांमध्ये भागवतांनी कायम ठेवली आहे. त्यानुसार त्यांनी देशातील घुसखोरांना घालवले पाहिजे व हिंदू समाजाने सरकारला मदत केली पाहिजे असे सांगितले. हे सर्व बंगालच्या निवडणुकीसाठी चालू आहे हे न समजण्याइतकी जनता दुधखुळी नाही. पण भागवतांना हे विचारायला हवे की, गेली अकरा वर्षे या देशात भाजपचेच सरकार असूनही व सीमेचे रक्षण ही अमित शाह इत्यादींचीच जबाबदारी असताना इतक्या काळात अजूनही घुसखोर इथे कसे येत आहेत व त्यांच्यावर कारवाई का झालेली नाही? सर्व गंभीर प्रश्नांमधून मतांचे राजकारण करायचे हे मोदी सतत करतात. आम्ही नाही त्यातले म्हणत भागवतांनी त्यांना साथ द्यावी हे वाईट आहे. अमेरिकेच्या दबावाखाली करार होऊ नये असे भागवत म्हणाले. पण रशियाकडून तेल खरेदी बंद करणार नाही असे ट्रम्पला ठणकावून सांगा असे मोदींना बजावण्याची हिंमत भागवत यांच्यामध्ये नाही. तिथे लगेच ते अराजकीयपणाचा बुरखा घेऊन मागे बसतात. स्वदेशीचा मुद्द्याला भागवतांनी अगदीच पुसटपणे स्पर्श केला. याच भागवतांनी गेल्या वर्षी चिनी वस्तूंवर बहिष्काराचे आवाहन केले होते. त्यांच्या लाखो स्वयंसेवकांपैकी किती जणांनी हे आवाहन अमलात आणले हे मात्र त्यांनी सांगितले नाही. तसे ते करूच शकत नाहीत. कारण देशभक्तीच्या नावावर मुसलमानांची दुकाने फोडणे सोपे असते, पण स्वस्त चिनी वस्तू वापरणे थांबवणे शक्य नसते हे त्यांना कळून चुकले आहे. संघ म्हणजे नैतिकतेचा पुतळा असा आव आणायला या बुवांना आवडते. पण यांचे चेले असणारे मोदी ते फडणवीस या मंडळींनी देशातील सरकारांमध्ये व निवडणुकांमध्ये जो हैदोस घातला आहे, प्रचंड पैशांचा पाऊस पाडला आहे, जी फोडाफोडी केली आहे त्या सर्व पापांबद्दल भागवत एक चकार शब्दही कधी काढत नाहीत. अशा या सर्व सोईस्कर आणि लबाड प्रवचनांमुळे संघविचार फोफावेल असे भागवतांना वाटत असेल तर तो त्यांचा भ्रम आहे. उलट अशांमुळे संघ अधिकाधिक उघडा पडत जाईल.

विचार

# ग्रीनलँडकडे नजर फक्त खनिजांसाठी?

***अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रप यांची भाषा वैश्विक आर्थिक मंचावर बदलली असली आणि त्यांचे स्वर थोडे नरम झाले असले, तरी ग्रीनलँडचा ताबा घेण्यावर ते ठाम आहेत. हवामानबदलामुळे बर्फ वितळत असताना आर्क्टिकमध्ये नवीन समुद्री मार्ग उघडत आहेत. त्यामुळे लपलेले खनिज साठे उघड होत आहेत. रशिया आणि चीन आधीच तेथे कार्यरत असल्याने ट्रम्प यांना या प्रदेशावर आपले नियंत्रण हवे आहे.***



प्रा. जयसिंग यादव

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची ग्रीनलँड खरेदी करण्याची इच्छा केवळ रिअल इस्टेट व्यावसायिकाची आहे, की ५०० ट्रिलियन डॉलर्सच्या खजिन्याशी संबंधित जाणूनबुजून केलेला कट आहे, असा प्रश्न उपस्थित होतो. इतिहासाकडे वळून पाहताना लक्षात येते, की अमेरिकेने १९६० च्या दशकात 'प्रोजेक्ट आइसवर्म' नावाची एक अत्यंत गुप्त आणि भयानक मोहीम सुरू केली. त्याचा उद्देश बर्फाच्या चादरीखाली चार हजार किलोमीटरचे बोगदे बांधणे आणि तेथे ६०० अणु क्षेपणास्त्रे तैनात करणे हा होता. अमेरिका सोव्हिएत महासंघाच्या सीमेजवळ इतक्या जवळून हल्ला करू इच्छित होती, की त्यांना सावरण्याची संधीच मिळणार नाही; पण निसर्गाने ही अणु योजना उधळून लावली. हिमनद्या इतक्या वेगाने मागे हटल्या, की हा प्रकल्प सोडून द्यावा लागला आणि अमेरिका पळून गेली; पण भयावह गोष्ट अशी आहे, की अणु कचरा आणि किरणोत्सर्गी विष आजही तिथेच गाडले आहे. आज जागतिक तापमानवाढीमुळे बर्फ वितळत असताना अमेरिकेसह अन्य देश विष समुद्रात सोडण्यास तयार आहेत. प्रश्न असा आहे, की ट्रम्प यांना ग्रीनलँडमध्ये या ऐतिहासिक पापाचे पुरावे गाडायचे आहेत का, की ते भविष्यातील युद्धाची तयारी करत आहेत? ग्रीनलँड केवळ बर्फासाठीच नाही, तर 'पांढऱ्या सोन्या'साठी ओळखले जाते. पांढरे सोने म्हणजे दुर्मिळ पृथ्वी खनिजांचे अमर्याद साठे. त्याशिवाय जगाची आधुनिक अर्थव्यवस्था एक दिवसही काम करू शकत नाही. स्मार्टफोनपासून सर्वात प्रगत एफ-३५ या लढाऊ विमानापर्यंत सर्व काही या खनिजांवर अवलंबून आहे.

सध्या, चीन या बाजारपेठेवर नियंत्रण ठेवतो आणि या क्षेत्रात आपला ध्रुवीय रेशीम मार्ग बांधण्याचा प्रयत्न करत आहे. येथूनच 'संसाधन युद्ध' सुरू होते.

अमेरिकन प्रशासनाला माहीत आहे, की भविष्यात तंत्रज्ञानावर प्रभुत्व मिळवायचे असेल, तर त्यांना ग्रीनलँडच्या खाणींवर नियंत्रण ठेवावे लागेल. त्यामुळेच ट्रम्प आता ग्रीनलँडबाबत कोणत्याही राजनैतिक शिष्टाचाराचे पालन करण्याच्या मनः स्थितीत नाहीत. त्यांनी जबरदस्ती आणि भेदभावा'चे धोरण स्वीकारले आहे. अमेरिकन प्रशासन आता थेट ग्रीनलँडच्या सामान्य नागरिकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहे. ग्रीनलँडमधील प्रत्येक रहिवाशाला दहा हजार ते एक लाख डॉलरपर्यंत देण्याचा पर्याय विचारात घेतला जात आहे. याचा अर्थ थेट संपूर्ण बेटावरील लोकांना पैशाने खरेदी करण्याचा प्रयत्न करणे. शिष्टाचाराचे उल्लंघन करणाऱ्या ट्रम्प यांनी नॉर्वेजियन पंतप्रधान जोनास यांना एक पत्र लिहिले. ते आंतरराष्ट्रीय राजकारणात अणुबॉम्बसारखे स्फोट घडवून आणत आहेत. ट्रम्प लिहितात, की प्रिय जोनास, आठ युद्धे रोखल्याबद्दल तुमच्या देशाने मला नोबेल शांतता पुरस्कार न देण्याचा निर्णय घेतल्याने मला आता फक्त शांततेबद्दल विचार करण्याची गरज नाही. मी आता अमेरिकेसाठी काय चांगले आहे याचा विचार करू शकतो. ट्रम्प यांनी डेन्मार्कच्या ग्रीनलँडवरील मालकी हक्कांना आव्हान दिले आहे. आपल्या इच्छेविरुद्ध जाणाऱ्यांसाठी कोणत्याही प्रकारचे सौजन्य दाखवण्यास किंवा आंतरराष्ट्रीय राजनैतिक नियमांचे पालन करण्यास तयार नाहीत. ग्रीनलँडच्या अभिमानी लोकांनी स्पष्ट केले आहे, की ते विकले जाणार नाहीत किंवा शरण जाणार नाहीत. ग्रीनलँडचे ज्येष्ठ राजकारणी टिली मार्टिनुसेन यांनी अमेरिकेची ऑफर नाकारत म्हटले आहे, की आम्हाला अमेरिकनांसारखे श्रीमंत व्हायचे नाही. आम्ही पाहतो, की ते किती लोभी आहेत. आम च्या मित्रांवरही हल्ला करण्याचा प्रयत्न करत आहेत. अलास्काचे उदाहरण देत मार्टिनुसेन यांनी इशारा दिला, की अमेरिकेने तेथील आदिवासी लोकांकडून जमीन हिसकावून घेतली आहे. ट्रम्प यांचा विश्वास आहे, की 'नाटो' गेल्या २० वर्षांपासून डेन्मार्कला रशियन धोक्याबद्दल इशारा देत आहे; परंतु डेन्मार्क ग्रीनलँडच्या रक्षणाबाबत अपयशी ठरला आहे. ट्रम्प यांनी 'सोशल मीडिया'वर जाहीर केले आहे, की हा प्रदेश ताब्यात घेण्याची वेळ आली आहे. ट्रम्प यांचे विधान 'नाटो' एकतेवर थेट हल्ला आहे. डेन्मार्कने ग्रीनलँडमध्ये आपले सैन्य वाढवले आहे. त्यामुळे युद्धासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.

ग्रीनलँडबद्दल इतकी चिंता का आहे, हे समजून घेण्यासाठी, नकाशावरील 'जीआययूके गॅप' पाहण्याची आवश्यकता आहे. 'जी' म्हणजे ग्रीनलँड, 'आय' म्हणजे आइसलँड आणि 'युके' म्हणजे युनायटेड किंग्डम. 'जीआययूके गॅप' हा म हासागराच्या मध्यभागी एक अरुंद आणि गुप्त मार्ग आहे, जो उत्तर अटलांटिक महासागरातून जातो. तो अमेरिकेला उर्वरित जगाशी जोडतो. लष्करी रणनीतीकारांच्या भाषेत, तो 'जगाचा गळा' आहे. रशियन अणु पाणबुड्या अमेरिकेच्या किनाऱ्यावर पोहोचायच्या असतील, तर त्यांना या 'जीआययूके गॅप' मधून जावे लागेल. शिवाय, जगातील ९० टक्के इंटरनेट डेटा वाहून नेणाऱ्या समुद्राखालील केबल्सदेखील याच मार्गाने जातात.

ग्रीनलँडमध्ये शत्रूचा प्रभाव वाढल्यास ते केवळ अमेरिकेला वेढू शकत नाहीत, तर एका झटक्यात अर्ध्या जगासाठी इंटरनेट आणि डिजिटल संप्रेषणदेखील बंद करू शकतात. म्हणूनच ट्रम्प कोणत्याही किंमतीत ग्रीनलँडला डेन्मार्क किंवा चीनच्या दयेवर सोडले जाऊ शकत नाही, असे सांगतात. ग्रीनलँडमधील हा खजिना जगासाठी संपन्नता आणेल का, की महासत्तांच्या अण्वस्त्रांच्या आणि लोभाच्या दरम्यान तो 'नशिबाचा तारा' ठरेल, हे फक्त काळच सांगेल. शेवटी, प्रश्न उद्भवतो, की ग्रीनलँड फक्त जमिनीचा तुकडा आहे का, की तो मानवतेच्या भविष्याचा यज्ञवेदी बनणार आहे?

एका बाजूला ट्रम्प यांना ग्रीनलँडचा तुकडा हवा आहे, दुसऱ्या बाजूला चीनला त्यावर कब्जा करायचा आहे. तिसऱ्या बाजूला ग्रीनलँडचे लोक त्यांची संस्कृती जपू इच्छितात. येणारी वर्षे ग्रीनलँड हे जगासाठी एक नवीन संसाधन केंद्र बनेल की महासत्तांच्या अहंकारांम धील नवीन युद्धभूमी बनेल हे पहावे लागेल. ट्रम्प ग्रीनलँड मुद्द्यावर आपली भूमिका बदलत असल्याचे दिसून येते. दावोस येथील गुंतवणूकदारांच्या मेळ्यात ट्रम्प यांनी सांगितले, की 'नाटो' सरचिटणीस मार्क रुट यांच्याशी झालेल्या बैठकीत ग्रीनलँड करारासाठी एक चौकट अंतिम करण्यात आली आहे. करार झाला तर 'नाटो' सदस्य देशांवर आयात शुल्क लादले जाणार नाही. स्टॉक आणि बाँड मार्केटमधील मोठ्या प्रमाणातील गोंधळामुळे ट्रम्प यांना आपली भूमिका बदलण्यास भाग पाडले आहे. त्यांनी ग्रीनलँडचा ताबा बळजबरीने घेणार नाही, असे एकीकडे सांगितले असताना ग्रीनलँडचा ताबा घेतल्याशिवाय राहणार नाही, असेही म्हटले आहे.

दरम्यान, 'नाटो' सदस्य देशांच्या लष्करी अधिकाऱ्यांनी एका करारावर चर्चा केली आहे. या करारांतर्गत डेन्मार्क लष्करी तळ बांधण्यासाठी ग्रीनलँडच्या एका छोट्या भागावर अमेरिकेला सार्वभौमत्व देईल. ट्रम्प यांनी स्पष्ट केले, की ग्रीनलँडचा वापर सबब म्हणून करण्याचा त्यांचा कोणताही हेतू नाही. त्यांनी असेही सांगितले, की ग्रीनलँड करारात गोल्डन डोम आणि खनिज अधिकार समाविष्ट आहेत. करारानुसार, अमेरिका आता ग्रीनलँडवर 'गोल्डन डोम' बसवेल, जेणेकरून रशिया किंवा इतर देशांकडून हल्ला झाल्यास अमेरिकेपर्यंत पोहोचण्यापूर्वीच क्षेपणास्त्रे पाडता येतील. दरम्यान, 'नाटो'च्या प्रवक्त्याने सांगितले, की अमेरिकेच्या जवळ असलेल्या या बेटावर चीन आणि रशियाचा आर्थिक किंवा लष्करी प्रभाव वाढण्यापासून रोखण्यासाठी अमेरिका, ग्रीनलँड आणि डेन्मार्कमध्ये चर्चा सुरू आहे. ट्रम्प ग्रीनलँडला आपल्याशी जोडण्याच्या प्रयत्नात कोणत्याही थराला जाण्यास तयार आहेत. ट्रम्प यांनी स्वित्झर्लंडच्या दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक मंचावर जगासमोर आपले हेतू स्पष्टपणे सांगितले. ट्रम्प यांच्या ग्रीनलँडबाबतच्या घोषणेनंतर ग्रीनलँडमध्ये सैन्य पाठवणारे आठ 'नाटो' सदस्य देश अधिक सक्रिय झाले आहेत. चीन आणि रशियादेखील सक्रिय झाले आहेत.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

# शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी 'टास्क फोर्स'



राकेश लोहार

महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न हा केवळ आकडेवारीचा विषय नाही, तर तो सामाजिक वेदनेचा, आर्थिक असुरक्षिततेचा आणि व्यवस्थात्मक उणिवांचा परिणाम आहे. अनेक वर्षांपासून विविध योजना, मदतपॅकेज, कर्जमाफी, विमा योजना राबवल्या गेल्या; तरीही आत्महत्यांचा प्रश्न पूर्णपणे आटोक्यात आलेला दिसत नाही. अशा पार्श्वभूमीवर कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी 'टास्क फोर्स' स्थापन करण्याचा घेतलेला निर्णय महत्त्वाचा आहे; पण तो खरोखरच आत्महत्या रोखू शकेल का, हा मूलभूत प्रश्न उपस्थित होतो.

कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी जाहीर केलेल्या या उपक्रमात केवळ आर्थिक मदत किंवा शेतीसंबंधी सल्ला देण्यापलीकडे जाऊन शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्याला, सामाजिक परिस्थितीला आणि हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या संकटांना एकत्रितपणे हाताळण्याचा दृष्टिकोन दिसून येतो, ही बाब निश्चितच सकारात्मक आहे. कारण, शेतकरी आत्महत्येकडे आजपर्यंत केवळ राजकारण म्हणून पाहिले जात असल्याचा आरोपच वारंवार होत असताना, सरकार अद्याप यावर ठाम अशी कोणतीच उपाययोजना आखू शकलेले नाही, हेसुद्धा वास्तव आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्या हा केवळ प्रश्न नसून अनेक घटकांनी विणलेले गुंतागुंतीचे वास्तव आहे.

हवामान बदलामुळे पावसाचे अनियमित चक्र, अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट यांसारख्या नैसर्गिक आपत्ती वाढत आहेत. याचा थेट परिणाम पिकांवर होतो आणि शेतकऱ्याचे आर्थिक गणित बिघडते. कर्ज, उत्पादन खर्च, बाजारभावातील अनिश्चितता आणि नुकसानीची भरपाई वेळेत न मिळाल्याने या सगळ्याचा मानसिक परिणाम शेतकऱ्यावर, त्या संपूर्ण कुटुंबावर होतो. शेतीतील तोटा हा केवळ आर्थिक नसतो; तो शेतकऱ्याच्या आत्मविश्वासावरही परिणाम करतो. कारण, पिकाची पेरणी केल्यापासून, ते पीक घरात येईपर्यंत, अनेक संकटांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागते. आणि, एकामागोमाग येणाऱ्या संकटांमुळेच शेतकऱ्यांमध्ये सामाजिक ताणतणाव, कुटुंबाची जबाबदारी, समाजातील अपेक्षा आणि एकटेपणाची भावना यामुळे नैराश्य वाढते. आणि, यातूनच तो आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतो. आजवर असंख्य शेतकऱ्यांनी आपपले जीवन सरकारच्या शेतीविरोधी योजनांमुळे संपवल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

आजपर्यंतच्या उपाययोजनांमध्ये या मानसिक बाजूचा पुरेसा विचार झालेला नव्हता. 'टास्क फोर्स'च्या माध्यमातून समुपदेशन, संवाद, मार्गदर्शन आणि मानसिक आधार देण्याचा प्रयत्न निश्चितच स्वागतार्ह आहे. तथापि, येथेच सर्वात महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो, तो म्हणजे केवळ टास्क फोर्स निर्माण केल्याने शेतकरी आत्महत्या खरोखर थांबतील का?

कारण शेतकरी आत्महत्यांचे मूळ कारण केवळ मानसिक नैराश्य नाही; ते आर्थिक अस्थैर्य, बाजारपेठेतील अन्यायकारक परिस्थिती, कर्जबाजारीपणा आणि शेतीतील अनिश्चितता यात खोलवर रुजलेले आहे. आपत्तीपूर्व, आपत्तीच्या काळात आणि आपत्तीनंतर काम करण्याची योजना निश्चितच उपयुक्त आहे. पण जर पिकाला योग्य भाव मिळत नसेल, विम्याची रक्कम वेळेत मिळत नसेल, कर्जाची साखळी तुटत नसेल, आणि शेती हा तोट्याचा व्यवहारच राहिला, तर मानसिक आधार किती प्रभावी ठरेल?

या 'टास्क फोर्स'चे यश कागदोपत्री आदेशांवर नव्हे, तर गावपातळीवरील अंमलबजावणीवर अवलंबून असेल. कृषी सहाय्यक, ग्रामसेवक, आरोग्य कर्मचारी, समुपदेशक, सामाजिक कार्यकर्ते यांच्या समन्वयाने काम झाले, तरच शेतकऱ्यांपर्यंत वेळेत मदत पोहोचू शकते. अन्यथा हा उपक्रमही अनेक योजनांप्रमाणे फाईलपुरता मर्यादित राहण्याची भीती आहे.

याशिवाय, पीकविमा, बाजारभाव, साठवण सुविधा, कर्जव्यवस्था, सिंचन, पायाभूत सुविधा यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर ठोस उपाययोजना न झाल्यास टास्क फोर्सचे प्रयत्न अपुरे पडतील. महाराष्ट्राने देशात पहिल्यांदाच असा उपक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे, ही बाब निश्चितच उल्लेखनीय आहे. पण, हा उपक्रम शेतकऱ्यांच्या आयुष्यात प्रत्यक्ष बदल घडवू शकला, तरच तो अर्थपूर्ण ठरेल. शेतकऱ्यांना केवळ समजून घेणारी नव्हे, तर त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारी व्यवस्था हवी आहे. 'टास्क फोर्स' ही त्याची सुरुवात ठरू शकते; पण ती अंतिम उपाययोजना ठरू शकत नाही. खरा प्रश्न अजूनही तसाच उभा आहे, हा उपक्रम शेतकरी आत्महत्या खरोखर रोखणार का, की आणखी एक प्रशासकीय प्रयोग ठरणार?

लोकसंसद

## सार्वजनिक निधीत गोपनीयता कशाला?

पंतप्रधान कार्यालयाने (पीएमओ) लोकसभा सचिवालयाला दिलेल्या सूचनेनुसार संसदेमध्ये पीएम केअर्स निधी, पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी आणि राष्ट्रीय संरक्षण निधी यासंदर्भात प्रश्न किंवा चर्चा स्वीकारली जाणार नाही अशी बातमी वाचनात आली. लोकसभा नियमावलीतील तरतुदींचा आधार देत हा निर्णय घेतला असला, तरी तो लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत ठरतो. या तिन्ही निधींच्या नावात 'पंतप्रधान' हा शब्द आहे, अध्यक्ष किंवा विश्वस्त म्हणून पंतप्रधान स्वतः आहेत आणि सरकारी अधिकारी पदसिद्ध सदस्य आहेत. सार्वजनिक उपक्रमांकडून या निधींना देणग्या दिल्या जातात. अशा पार्श्वभूमीवर हे निधी ''सरकारच्या थेट नियंत्रणाखाली नाहीत'' असे सांगून संसदेला त्यावर प्रश्न विचारण्यापासून रोखणे, हा युक्तिवाद सामान्य नागरिकाला पटणारा नाही. या निधींमधील रक्कम थेट कररूपाने गोळा केली जात नसली, तरी ती सार्वजनिक देणग्यांची आहे आणि त्यावर करसवलत दिली जाते. त्यामुळे अप्रत्यक्षपणे सरकारी महसुलावर त्याचा परिणाम होतो. नैसर्गिक आपत्ती, आरोग्यसंकट किंवा संरक्षणाशी संबंधित गरजांसाठी वापरल्या जाणाऱ्या निधीबाबत माहिती मागण्यात गैर काय? प्रश्न विचारणे म्हणजे आरोप करणे नव्हे; ती पारदर्शकतेची प्राथमिक अट आहे. संसद ही कार्यकारी सत्तेवर नियंत्रण ठेवणारी सर्वोच्च संस्था आहे. ''या विषयावर प्रश्नच विचारू नका'' असा आदेश म्हणजे लोकप्रतिनिधींच्या अधिकारांवर मर्यादा घालण्याचा प्रयत्न होय. आज या तीन निधींचा विषय आहे; उद्या इतर कोणत्याही 'स्वायत्त' व्यवस्थेलाही संसदेला जाब द्यावा लागणार नाही, असा धोकादायक पायंडा यातून पडू शकतो. लोकशाही प्रश्नांनी कमकुवत होत नाही; ती प्रश्नांमुळेच अधिक सशक्त होते. **– दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

दिनविशेष

# विज्ञानातील महिलांचा आंतरराष्ट्रीय दिवस

आंतरराष्ट्रीय पातळीवर ११ फेब्रवारी हा दिवस विज्ञान क्षेत्रातील मुली आणि महिलांचा दिवस म्हणून ओळखला जातो. जगभरातील विकासाच्या प्रक्रियेत महिलांना सामावून घेण्याची गरज ओळखून संयुक्त राष्ट्रसंघाने २०१५ मध्ये याची सुरुवात केली. विज्ञान, तंत्रज्ञान आणि सामाजिक-आर्थिक शाश्वत विकासात समानतेला प्रोत्साहन देणे हा यामागील हेतू आहे. अनेक देशातील महिलाकेंद्रित उपक्रम आणि परिषदांनी हा दिवस साजरा केला जातो.

अधिक भारतीय महिलांना विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित (एसटीईएम) या क्षेत्रात शिक्षण घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी प्रसिद्ध जॉर्ज वॉशिंग्टन विद्यापीठाने एका संयुक्त उपक्रमाची घोषणा केली. ज्याद्वारे महिलांचा ङ्गएसटीईएमफ संबंधित नोकऱ्यांम ध्ये सहभाग वाढेल. याचा हेतू म हिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हा होता.

युनेस्कोच्या अहवालानुसार एसटीईएमशी संबंधित क्षेत्रांमध्ये महिला कर्मचाऱ्यांचे प्रमाण ३० टक्क्यांपेक्षा कमी आहे. फक्त तीन टक्के मुली माहिती तंत्रज्ञान संबंधित उच्च शिक्षण अभ्यासक्रमात, .पाच टक्के मुली नैसर्गिक विज्ञान, गणित आणि सांख्यिकी संबंधित शिक्षणात आणि आठ टक्के अभियांत्रिकी, उत्पादन आणि बांधकाम संबंधित शिक्षणासाठी प्रवेश घेतात. सामान्यतः महिलांना या क्षेत्रात लिंगभेदाचा सामना करावा लागतो. ही क्षेत्रे परंपरेने पुरुष विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांची क्षेत्रे म्हणून ओळखली जातात. दूरचित्रवाणी कार्यक्रम आणि चित्रपटांमध्येही महिला वैज्ञानिक, गणितज्ज्ञ किंवा सांख्यिकीतज्ज्ञ म्हणून क्वचितच दिसतात. महिला क्रांतीनंतर काही गोष्टी बदलल्या. महिला घराबाहेर पडण्याचे धाडस करू लागल्या, शिक्षण घेऊ लागल्या आणि त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात नोकरी करू लागल्या. पण, एसटीईएम क्षेत्र फारसे बदलले नाही. हे सर्व अडथळे असतानाही महिलांनी काही पथदर्शक शोध लावले. उदाहरणार्थ, मादाम मेरी क्युरी या पहिल्या महिला नोबेल विजेत्या होत्या. त्यांच्यामुळेच आपल्याला क्ष-किरणांची माहिती मिळाली.

संपूर्ण जगाला लॉकडाऊनमध्ये ढकलणाऱ्या कोरोना विषाणूविरोधात लढण्यासाठी लस बनवण्यात के. सुमती आणि नीता पटेल यांचे म हत्त्वाचे योगदान आहे. कोव्हॅक्सिन बनवणाऱ्या भारत बायोटेकम धील रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंटचे नेतृत्व सुमती यांनी केले, जी भारताची स्वतःची लस होती; तर अमेरिकेतील नोवाव्हॅक्सचे नेतृत्व करणाऱ्या नीता पटेल यांनी नोवाव्हॅक्स कोविड व्हॅक्सिन बनवण्यात मोलाची कामगिरी पार पाडली. काही शतकांपूर्वीचा काळ पाहिला तर भारत हा शंकुतला देवी यांच्यासारख्यांचा देश राहिला आहे. गणित विद्येची माता आणि मानवी कॅलक्युलेटर म्हणून त्यांना ओळखले जात असे. आपल्या मानसिक गणिताच्या क्षमतेच्या जोरावर त्यांनी त्या काळच्या भारतातील सर्वात जलद संगणकाचा पराभव केला होता. विशेष म्हणजे कोणतेही औपचारिक शिक्षण घेतलेले नसताना त्यांनी हे करून दाखवले. गणितातील त्यांची क्षमता सर्वांनाच माहीत आहे. शालेय अभ्यासक्रमात महिला शास्त्रज्ञांचे योगदान समाविष्ट केले पाहिजे आणि शिक्षकांना विज्ञानातील महिलांबद्दल विद्यार्थ्यांशी बोलण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. विज्ञानासंबंधित उपक्रमात सहभागी होण्यासाठी कुटुंबातूनच म ुलींना प्रोत्साहन द्यायला हवे आणि मुलींना शिक्षण व नोकरीसाठी प्रवेश मिळण्याइतके एसटीईएम क्षेत्र सामान्य झाले पाहिजे. शिक्षणाच्या आणि कामाच्या सर्व क्षेत्रात मोठी उंची गाठण्यास महिला आणि मुली सक्षम आहेत. कमतरता आहे ती योग्य मार्गदर्शनाची, प्रोत्साहनाची आणि त्यांना सिद्ध करण्यासाठी योग्य संधीची. विज्ञानाच्या क्षेत्रात जाऊ इच्छिणाऱ्या आपल्या घरातील महिला व मुलींचा मार्ग विनाअडथळा बनवण्याचे व्रत घेऊ या, जेणेकरून त्या उंच भरारी घेऊ शकतील आणि आपल्या सर्वांना अभिमान वाटेल असे कार्य करतील.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे. **संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**कै. महेन्द्र लखमा गायकवाड, स्मरणार्थ, अलिबाग**



**श्री. रविकांत शिंदे, वाढदिवस अलिबाग**

## महिलेचे दागिने लुटून चोरटा पसार

**पनवेल :** कामोठे ते कळंबोली परिसरात चोरट्यांचा सुळसुळाट वाढला आहे. एका लुटारुने रविवारी (दि.८) पहाटे दोन महिलांसोबत धक्काबुक्की करून त्यांच्या अंगावरील दागिने लुटून पसार झाला. त्याला पकडण्याच्या झटापटीत दोन महिला जखमी झाल्या आहेत. कळंबोली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. करंजाडे भागातील सुनीता रमेश शिंदे (५४) या रविवारी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास त्यांच्या भाचे सुनेसोबत सांगलीहून खासगी ट्रॅव्हल्सने कामोठे येथील बस थांब्यावर उतरल्या होत्या. तेथून करंजाडे येथे जाण्यासाठी दोघी रिक्षा शोधण्यासाठी कळंबोली सेवा रस्त्याने पायी जात होत्या. त्यावेळी पाठीमागून दुचाकीवरून आलेल्या एका लुटारूने सुनीता यांच्या गळ्यातील ४५ हजारांची सोन्याची चेन हिसकावण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी निलिमा ढाके हिने लुटारुला पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र, लुटारुने तिला जोरात धक्का दिला. रस्त्यावर शुकशुकाट होता, याचा फायदा घेत चोरटा दुचाकीवरून पसार झाला.

# सहा अल्पवयीन मुली बेपत्ता

**● पालकांमध्ये चिंतेचे वातावरण; शोध घेण्यासाठी विशेष पथकांची स्थापना**

**| तळा | प्रतिनिधी |**

कल्याण येथील पूर्व आणि पश्चिम भागांत अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याच्या घटनांत वाढ झाली आहे. यामुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. दहावी-बारावीतील ३ विद्यार्थिनी घरातून अचानक बेपत्ता झाल्याची प्रकरणे समोर आली आहेत. त्यांना अज्ञात इसमाने फूस लावून पळवल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. वाडेघर, भवानीनगर, वायलेनगर तसेच अटाळी परिसरातील मुलींच्या बेपत्ता झाल्याच्या तक्रारी खडकपाडा पोलीस ठाणे येथे प्रविष्ट आहेत. काही प्रकरणांत भ्रमणभाषसंच बंद असणे, शाळेत न पोचणे किंवा घरातून रागाने निघून जाणे, असे प्रकार समोर आले आहेत.




वाडेघर परिसरात राहणारे गोविंद निंबळे हे सुरक्षारक्षक म्हणून काम करतात. त्यांची बारावीत शिकणारी १७ वर्षीय मुलगी मैत्रिणीकडे जाते असे सांगून घराबाहेर पडली. मात्र रात्र झाली तरी ती परत आली नाही. शिवाय तिचा मोबाईलही बंद होता. पालकांनी सर्वत्र शोध घेतला. मात्र कुठेच थांगपत्ता लागला नाही. अखेर वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या घटनेत भवानीनगर, प्रेम ऑटो परिसरात राहणाऱ्या सुनील सिंग यांची अल्पवयीन मुलगी महिन्यापासून बेपत्ता आहे. रामबाग येथील हिंदी शाळेत शिकणारी ही मुलगी २६ जानेवारी रोजी झेंडावंदनासाठी जाते असे सांगून सकाळी ७ वाजता घरातून निघाली. मात्र ती घरी परतली नाही. सुनील यांनी तिच्या मैत्रिणींकडे चौकशी केली असता मैत्रिणींनी ती शाळेत आली नसल्याचे सांगितले. त्यामुळे मुलीला अज्ञाताने पळवून नेले असल्याची तक्रार सुनील सिंग यांनी खडकपाडा पोलीस ठाण्यात केली आहे.

योगेशचंद्र तिवारी हे खडकपाडा वायलेनगर भागात राहतात. त्यांची मुलगी बारावीत असून ती अग्रवाल महाविद्यालयात शिक्षण घेते. परीक्षा जवळ आली आहे म्हणून 'तू आता अभ्यास कर. सारखा मोबाईल हातात घेऊ नकोस' अशी सूचना तिच्या भावाने आपल्या बहिणीला केली. त्याचा राग येऊन बहिणीने रागाच्या भरात चिठ्ठी लिहून ठेऊन घरातून निघून गेली. कुटुंबीयांचा परिसरात शोध घेतला. मात्र ती कुठेच आढळून आली नाही. त्यामुळे तिला अज्ञाताने पळवून नेले असण्याची शक्यता या मुलीचा भाऊ अनिकेत यांनी खडकपाडा पोलीस ठाण्यातील तक्रारीत व्यक्त केली आहे.

अटाळी भागातून एका भंगारविक्री करणाऱ्या महिलेची अल्पवयीन मुलगी स्वच्छतागृहात जाऊन येते सांगून परत घरी आली नाही. ती बेपत्ता असल्याची तक्रार तिच्या आईने खडकपाडा पोलीस ठाण्यात केली आहे. गेल्या महिन्यात बारावे गावातून दोन अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्या आहेत. वाडेघर भागातून गेल्या महिन्यात एक चौदा वर्षाची मुलगी बेपत्ता झाली आहे.

बेपत्ता मुलींचा खडकपाडा पोलीस शोध घेत असून त्यासाठी विशेष पथकेही स्थापन केली आहेत.



## परीक्षा केंद्रात गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या बारावीच्या लेखी परीक्षेला मंगळवारी (दि.१०) फेब्रुवारीपासून सुरुवात झाली. उरण तालुक्यातील चिरनेर येथील पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या परशुराम धाकू खारपाटील माध्यमिक विद्यालय व काळुशेठ धाकु खारपाटील कनिष्ठ महाविद्यालयाच्या नियोजित परीक्षा केंद्रावर देखील मंगळवारपासून, बारावीची लेखी परीक्षा सुरू झाली. ही बारावीची परीक्षा १८ मार्चपर्यंत सुरू राहणार आहे. इंग्रजी भाषा विषयाच्या पेपरपासून परीक्षेला प्रारंभ झाला. चिरनेर येथील परीक्षा केंद्राचा परीक्षा केंद्र क्रमांक २५११ असा आहे. परीक्षेचे केंद्र संचालक म्हणून मिलिंद पट्टेबहादूर तर उपकेंद्र संचालक म्हणून भिकाजी गाडे हे काम पाहत आहेत. या चिरनेर परीक्षा केंद्रातून बारावीच्या ४५१ परीक्षार्थीपैकी ४५० विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेचा पहिला पेपर दिला. १९ ब्लॉकमधून चिरनेर परीक्षा केंद्रातून परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची आसन व्यवस्था करण्यात आली आहे.

पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष पी. पी. खारपाटील, उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील, संचालक समीर खारपाटील, सागर खारपाटील यांनी परीक्षार्थी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. तर संचालिका अर्चना ठाकूर, प्रशासकीय अधिकारी व्ही.ए. पाटील, मुख्याध्यापक मिलिंद पट्टेबहादूर, पर्यवेक्षक आनंद चिर्लेकर तसेच अन्य शिक्षकांनी गुलाब पुष्प देऊन परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

## अपघातात आंतरराष्ट्रीय नेमबाजाचा मृत्यू

**| पालघर | प्रतिनिधी |**

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर पालघरच्या हद्दीत कारचा भीषण अपघात झाला. फॉर्च्युनर कारची समोरून येणाऱ्या ट्रकला जोरदार धडक बसली. या अपघातात आंतरराष्ट्रीय नेमबाजाचा जागीच मृत्यू झाला तर त्याचा मित्र गंभीर जखमी झाला आहे.





मुंबई-अहमदाबाद या महामार्गावरील दुर्वेस येथील हेरिटेज डेअरी समोर मंगळवारी (दि.१०) सकाळी दहाच्या सुमारास हा अपघात झाला. गुजरातच्या दिशेनं जाणाऱ्या भरधाव फॉर्च्युनर कारनं पुढे असलेल्या अवजड वाहनाला जोरदार धडक दिली. कारच्या चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला. हा अपघातात चालकाच्या शेजारी बसलेल्या आंतरराष्ट्रीय नेमबाज संभाजी शिवाजी झणझण पाटील (२७) यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांचा सहकारी यश चौधरी (२२) गंभीर जखमी झाला. तर कारचालक यश चौधरी किरकोळ जखमी झाला आहे. त्याला उपचारांसाठी मनोरमधील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी कार चालकाच्या विरोधात मनोर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## विद्यार्थिनीवर भटक्या कुत्र्यांचा हल्ला

**कल्याण :** कल्याण-शीळ रोडवरील खोणी पलावा येथील आर्केड सोसायटीमध्ये शाळेत जाणाऱ्या एका विद्यार्थिनीवर चार ते पाच भटक्या कुत्र्यांनी हल्ला केला. सुदैवाने सोसायटीतील सुरक्षा रक्षकाने प्रसंगावधान राखत कुत्र्यांना हुसकावून लावल्यामुळे मुलीचा जीव वाचला. या परिसरात भटक्या कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणात असून स्थानिक नागरिकांनी याबाबत अनेक वेळा महापालिका प्रशासनाकडे तक्रारी केल्या आहेत. मात्र प्रशासनाकडून ठोस उपाययोजना न झाल्याने असे प्रकार वाढत आहेत.

## ज्यूट उत्पादन केंद्राचे उद्घाटन

**सिंधुदुर्ग :** नॅशनल ज्यूट बोर्ड (वस्त्रोद्योग मंत्रालय, भारत सरकार) आणि चिवार (सेंटर ऑफ बांबू व्हॅल्यू ॲडिशन अँड रिसर्च) यांच्या पुढाकाराने सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रथमच ज्यूट व बांबू मॅटपासून नावीन्यपूर्ण उत्पादने बनवण्याच्या प्रशिक्षण आणि उत्पादन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

कुडाळ एम. आय. डी. सी. येथील चिवार केंद्रात शुक्रवारी (दि.६) हा कार्यक्रम झाला. चिवारचे अध्यक्ष मोहन होडावडेकर यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाचे महत्त्व सांगितले. हा कार्यक्रम केवळ प्रशिक्षणापुरता मर्यादित नसून, येत्या वर्षात नॅशनल ज्यूट बोर्डाच्या सहयोगाने १०० ज्यूट उत्पादक आणि १०० बांबू चटई उत्पादक महिलांना कायमस्वरुपी रोजगार देण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. जिल्हा परिषदेच्या 'उमेद' अभियानाच्या सहकार्याने हा प्रकल्प राबवला जात आहे.

प्रशिक्षणानंतर महिलांना सवलतीच्या दरात कच्चा माल उपलब्ध करून दिला जाईल आणि त्यांच्या मालासाठी स्वतंत्र विक्री केंद्र उभारले जाईल, असे त्यांनी सांगितले.

## खड्ड्यात ट्रक पलटी

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

रत्नागिरी शहरातील साळवी स्टॉप परिसरात सोमवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास एक भीषण अपघात घडला. मिऱ्या-नागपूर महामार्गाचे काम सुरू असलेल्या या भागात रस्त्यावरील मोठ्या खड्ड्याचा अंदाज न आल्याने एक ट्रक थेट पलटी झाला. अपघातानंतर ट्रकच्या केबिनमध्ये अडकलेल्या चालकाला स्थानिक नागरिकांनी तातडीने मदत करत बाहेर काढले. या अपघातात ट्रक चालक किरकोळ जखमी झाला आहे. सुदैवाने ट्रकच्या खाली कोणीही न आल्याने मोठा अनर्थ टळला आहे. मात्र, अपघातावेळी ट्रकचालक मद्य प्राशन केलेल्या अवस्थेत होता, असा प्राथमिक



अंदाज प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी व्यक्त केला आहे. घटनास्थळी उपस्थित असलेल्या काही लोकांनी चालकाच्या वर्तनावरून तो नशेत असल्याचे सांगितले. दरम्यान महामार्गाच्या कामामुळे निर्माण झालेल्या धोकादायक परिस्थितीबाबत नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे.

# मनात भीती न बाळगता परीक्षा द्यावी

**● जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे विद्यार्थ्यांना आवाहन**

**| तळा | प्रतिनिधी |**

उच्च माध्यमिक म्हणजेच बारावीच्या परीक्षा मंगळवार दि.१० फेब्रुवारीपासून सुरू झाल्या आहेत. रायगड जिल्ह्यात एकूण ५२ केंद्रांवर या परीक्षा होणार आहेत. बारावीच्या परीक्षेसाठी जिल्ह्यातील एकूण ३३ हजार १२१ विद्यार्थी प्रविष्ठ आहेत. कॉपीमुक्त परीक्षा होण्यासाठी एकूण ९ भरारी पथके तसेच पूर्ण वेळ बैठे पथक तैनात करण्यात आले आहे.

बारावीची परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा मानला जातो. यानंतर विद्यार्थीआपल्या भविष्याची वाटचाल नक्की कोणत्या दिशेने करायची आहे, हे ठरवतात. त्यामुळे या परीक्षेला अधिक महत्त्व आहे. सर्व प्रविष्ठ विद्यार्थ्यांनी कॉपी न करता कोणतीही भीती



मनात न बाळगता परीक्षा देण्याचे आवाहन मा.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले असून शुभेच्छा दिल्या आहेत. परीक्षा सुरळीत व्हाव्यात यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असून परीक्षा कॉपीमुक्त होण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दलाची मदत घेतली जाणार आहे. बारावीच्या परीक्षेसाठी जिल्ह्यातील एकूण ३३ हजार १२१ विद्यार्थी प्रविष्ठ आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समितीही गठीत करण्यात आली आहे. परीक्षा केंद्रांवर परीक्षे आधी १ तास व परीक्षेनंतर १ तास बैठक पथक असणार आहे. त्यामुळे कॉपीमुक्त परीक्षा होण्यास मदत होणार आहे. मा. जिल्हाधिकारी किशन जावळे व राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी सर्व प्रविष्ठ विद्यार्थ्यांना कॉपी न करता कोणतीही भीती मनात न बाळगता परीक्षा देण्याचे आवाहन केले आहे.

**लोकलसेवा अखंडित राहण्यास मदत | बटण दाबताच रुळावरील पाण्याचा उपसा**

# ठाणे स्थानकात मायक्रोटनेलिंगचे काम पूर्ण

**| मुंबई | प्रतिनिधी |**

ठाणेकरांसाठी आणि मध्य रेल्वेच्या लाखो प्रवाशांसाठी एक दिलासादायक बातमी आहे. ठाणे स्थानकात दरवर्षी पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या पाणी साचण्याच्या समस्येवर आता कायमस्वरूपी तोडगा निघाला आहे. मध्य रेल्वेने ठाणे स्थानक परिसरात मायक्रोटनेलिंगचे काम यशस्वीपणे पूर्ण केले आहे. विशेष म्हणजे मायक्रोटनेल कार्यान्वित करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था उभारण्यात आली असून एक बटण दाबताच पाण्याचा उपसा करणे शक्य




होणार आहे.

ठाणे शहराच्या पश्चिम भागातून येणारे पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात फलाट क्रमांक एक, दोन आणि तीनवर साचत होते. यामुळे रेल्वे रुळ पाण्याखाली जात असून सीएसएमटी आणि कल्याण दिशेने जाणारी लोकल सेवा वारंवार विस्कळीत होत होती. ही समस्या कायमस्वरूपी दूर करण्यासाठी मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने फलाट क्रमांक एक ते दहा यांच्या खाली मायक्रोटनेल उभारण्याचा निर्णय घेतला.

उच्च अचूकता, सुरक्षितता आणि कार्यक्षमतेसाठी एमबीटीएम (मायक्रोटनेल बोरिंग मशिन) अत्याधुनिक यंत्रणेचा वापर करण्यात येत आहे. यामुळे पावसाळ्यात पाण्याचा निचरा वेगाने होऊन लोकलसेवा अखंडित राहण्यास मदत मिळणार आहे, असे विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

### लोकलचा वेग मंदावणार नाही

**मुंबईची लोकल ही शहराची जीवनवाहिनी आहे आणि ठाणे हे त्यातील एक महत्त्वाचे स्थानक आहे. या प्रकल्पामुळे आगामी पावसाळ्यात लोकलसेवा अबाधित राहील, असा विश्वास विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. दरवर्षी पावसाळ्यात प्रवाशांना ज्या मनस्तापाला आणि लेटलतीफ कारभाराला सामोरे जावे लागत असे, त्यातून त्यांची आता कायमस्वरूपी सुटका झाली आहे. आता पाऊस कितीही पडला तरी ठाणे स्थानकात लोकलचा वेग मंदावणार नाही.**

### लेझरचा वापर

**या भागातील भूस्तर कठीण चिकणमाती आणि तुटक खडकांचा होता. त्यामुळे हे काम किंबहुना पाइप जोडणी आव्हानात्मक होती. लेझर यंत्रणा, हायड्रोलिक जॅक आणि अन्य आधुनिक यंत्रसामुग्रीच्या मदतीने पाइपची अचूक जोडणी करण्यात आली.**

## निवडक

### परीक्षेसाठी निघालेल्या तरुणाचा लोकलमधून पडून मृत्यू

**मुंबई :** लोकल ट्रेनमधील गर्दी कधी-कधी प्रवाशांच्या जीवावर बेतते. डोंबिवलीतील एका तरुणाचा लोकलमधून पडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सोहम कटरे असे मृत तरुणाचे नाव असून तो इयत्ता बारावीत शिक्षण घेत होता. मिळालेल्या माहितीनुसार, बारावीची परीक्षा सुरू झाल्याच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी (दि.१०) कळव्यातील मनिषा विद्यालयात पहिल्या पेपरसाठी सोहम घरातून सकाळच्या सुमारास बाहेर पडला होता. मात्र कळवा ते मुंब्रा रेल्वे स्थानकादरम्यान तो लोकलमधून खाली पडला. लोकलमधील प्रचंड गर्दीमुळे तोल जाऊन तो खाली पडल्याची माहिती आहे. अपघातात गंभीर जखमी होऊन सोहमचा जागीच मृत्यू झाल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे. मुंबई लोकलमधील वाढती गर्दी, हा गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत असलेला प्रश्न आहे. गर्दीमुळे आतापर्यंत अनेक प्रवाशांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. अशातच आता पुन्हा एकदा एका कॉलेजच्या विद्यार्थ्याचा हकनाक बळी गेल्याने लोकलमधील गर्दी नियंत्रणाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

### तरुणाचा दरीत कोसळून मृत्यू

**खोपोली :** लोणावळ्यात पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी गेलेल्या एका तरुणाचा दरीत कोसळून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. सनसेट पाहताना पाय घसरून तो सुमारे ७० ते ८० फूट खोल दरीत कोसळला. गंभीर दुखापत झाल्याने त्याचा मृत्यू झाला. हि दुर्घटना रविवारी (दि.८) घडली असून प्रज्वल वसंत गिरी (२६) असे मृत तरुणाचे नाव आहे. प्रज्वल रविवारी आपल्या नातेवाइकांसोबत कारने मुंबईहून पुण्याकडे येत होता. प्रवासादरम्यान नाश्ता करण्यासाठी सर्वजण लोणावळ्यात थांबले होते. यावेळी ''टेकडीवरून फिरून येतो'' असे सांगून प्रज्वल आणि त्याचा मावसभाऊ बाजूला गेले. मात्र, टेकडीवर फिरत असताना अचानक पाय घसरला आणि प्रज्वल सुमारे ७० ते ८० फूट खोल दरीत कोसळला. यात त्याच्या डोक्याला व हाताला गंभीर दुखापत झाली. त्यातच त्याचा मृत्यू झाला. प्रज्वल पुण्यात बीएड करत असतानाच स्पर्धा परीक्षेची तयारी करत होता. प्रशासकीय सेवेत अधिकारी होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या तरुणाचा असा अचानक अंत झाल्याने गिरी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. एका उमद्या तरुणाच्या अशा मृत्यूने पर्यटनाच्या ठिकाणी असलेल्या सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.



### कुलस्वामिनी देवीची प्राणप्रतिष्ठा



**माणगाव :** खांदाड-माणगाव येथे पोवार घराण्याच्या कुलदैवत आई श्री कुलस्वामिनी देवीच्या स्थापनेचा व प्राणप्रतिष्ठेचा पवित्र सोहळा मंगळवारी (दि.१०) अत्यंत मंगल वातावरणात पार पडला. हा सोहळा केवळ धार्मिक विधी न राहता, तो प्रत्येक भक्ताच्या अंतःकरणाशी नाते जोडणारा आध्यात्मिक अनुभव ठरला. यादिवशी सकाळी सोनभैरव मंदिरापासून निघालेली पालखी मिरवणूक म्हणजे भक्तीचा अखंड प्रवाहच होता. पारंपरिक ढोल-ताशांचा निनाद, महिलांच्या ओव्या, युवकांचा जयघोष आणि 'आई कुलस्वामिनी माऊली की जय' या घोषणांनी संपूर्ण परिसर भारावून गेला. यानंतर वैदिक मंत्रोच्चारात मूर्ती प्राणप्रतिष्ठा व होमहवन पार पडले. ब्राह्मण आणि पुजारी रघुनाथ भिकू पोवार यांच्या पौरोहित्याखाली संपन्न झालेल्या या विधींनी उपस्थित भाविकांच्या मनात भक्तीची ज्योत प्रज्वलित केली. दुपारी श्री सत्यनारायणाची महापूजा झाली असता अनेक भक्तांनी आईच्या चरणी आपले दुःख, चिंता आणि मनोकामना अर्पण केल्या. सायंकाळी झालेल्या संगीत भजन कार्यक्रम झाला. महाप्रसादाने या पावन सोहळ्याची सांगता झाली. हा संपूर्ण सोहळा ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ व नवयुवक मित्र मंडळ, खांदाड यांच्या अथक परिश्रमातून यशस्वी झाला.

### बांधावरचे अनोखे साहित्य संमेलन

**चिपळूण :** कोकणच्या डोंगराळ भागात आणि भरपूर पावसात शेतीचे आधारस्तंभ ठरणाऱ्या बांधवर साहित्यप्रेमींनी एक अनोखा प्रयोग करत साहित्य संमेलनाचे आयोजन केले होते. 'माणूस, माती आणि नाती यांचे बंध उलगडणारा साहित्यिक सहवास', असे ब्रीदवाक्य घेऊन राज्यभरातील रसिकांचे लक्ष वेधून घेणारे 'बांधावरचे संमेलन रविवारी (दि.८) चिपळूण नजीकच्या धामणवणे येथील विठ्ठलाई मंदिराजवळील 'साद मयुराची' शिवारात पार पडले. संमेलनाचे उद्घाटन शेणाने सारवलेल्या शेताच्या बांधावर दीपप्रज्वलन, पारंपरिक वाद्य संबळच्या निनादात श्रीसातेरी मातेच्या वारूळाचे पूजन आणि पवित्र वाशिष्ठी-नर्मदा गंगाजलाने भरलेल्या मातीच्या घटाचे पूजन करून झाले. यावेळी पारंपरिक आरज लावून आणि भलरी गाऊन या सोहळ्याला प्रारंभ झाला. यावेळी संमेलनाध्यक्ष प्रा. सुहास बारटक्के, स्वागताध्यक्ष शशिकांत मोदी, उद्घाटक डॉ. प्रशांत पटवर्धन, चिपळूणचे आमदार शेखर निकम, कोकणात सलग ११ ग्रामीण साहित्य संमेलने यशस्वी करणारे सुभाष लाड, वाशिष्ठी उद्योग समूहाच्या प्रवर्तक स्वप्ना प्रशांत यादव, नामवंत कवी अरुण म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रकाश गांधी यांनी खास मालवणी भाषेत गाऱ्हाणे घातले. संमेलनाचे कार्याध्यक्ष प्रा. संतोष गोनबरे यांनी प्रास्ताविकातून बांधावरच्या संमेलनाचा उद्देश स्पष्ट केला. प्रा. सोनाली खर्चे यांनी लिहिलेल्या आणि अमेय वराडे यांनी संगीतबद्ध केलेल्या बांधावरच्या गीताचे सादरीकरण वीणा परांजपे, सुखदा परांजपे, संगीता जोशी, संध्या आठल्ये, अपर्णा नातू, छाया पोटे, स्नेहल दीक्षित, संजय शिंदे, विजय कदम यांनी केले. साथसंगत यदुवीर चौगुले यांनी दिली. धीरज वाटेकर यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.




### हॉटेलमधील जेवणादरम्यान एकाचा मृत्यू

**चिपळूण :** चिपळूण शहरातील पाग कासकरआळी येथील रहिवासी फैयाज हसन कासकर (५५) यांचा जेवणादरम्यान अचानक मृत्यू झाला. शुक्रवारी (दि.७) दुपारी २ ते ३ च्या दरम्यान फैयाज कासकर हे चिपळूण येथील हॉटेल सदगुरू येथे जेवणासाठी गेले होते. जेवण सुरू असतानाच त्यांना अचानक उलटी होऊन ते खाली कोसळले. ही बाब लक्षात येताच हॉटेलमधील कामगारांनी तात्काळ त्यांना उपचारासाठी कामथे येथे उपजिल्हा रूग्णालयात दाखल केले. मात्र रूग्णालयात दाखल केल्यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी चिपळूण पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली आहे. या घटनेचा पुढील तपास चिपळूण पोलीस करीत आहेत.

# शासकीय रुग्णालयांत उपचार मोफतच

## शुल्क आकारण्याच्या बातम्यांचा खुलासा; सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली कार्यरत असलेल्या सर्व शासकीय रुग्णालयांमधील तपासणी व उपचार हे २३ ऑगस्ट २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये पूर्णतः निःशुल्क करण्यात आलेले असून ही सुविधा आजही पूर्वीप्रमाणेच लागू आहे, असा महत्त्वाचा खुलासा सार्वजनिक आरोग्य विभागाने केला आहे. त्यामुळे शासकीय रुग्णालयांमध्ये रुग्णांकडून उपचारासाठी शुल्क आकारले जाणार असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते परंतु या प्रसिद्ध झालेल्या बातम्यांमध्ये कोणतेही तथ्य नाही, असे संबंधित विभागाने स्पष्ट केले आहे.


(संग्रहीत छायाचित्र)

अलीकडे काही राष्ट्रीय व राज्यस्तरीय वृत्तमाध्यमांमध्ये सरकारी रुग्णालयांमध्ये मोफत उपचार बंद होणार तसेच शासकीय रुग्णालयांमध्ये सेवा शुल्क आकारले जाणार अशा आशयाच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. या बातम्यांमुळे श्रीवर्धन तालुक्यासह ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांमध्ये संभ्रम आणि चिंता निर्माण झाली होती. याची दखल घेत सार्वजनिक आरोग्य विभागाने अधिकृत खुलासा प्रसिद्ध करण्यात आला.

सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, १६ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या नागरिकांच्या सनदेमधील परिशिष्ट-३ मध्ये सेवा सुविधा पुरविण्यासाठी ६ जून २०१५ च्या शासन निर्णयातील शासनमान्य दर अनावधानाने समाविष्ट झाले होते. या तांत्रिक चुकीमुळे शासकीय रुग्णालयांमध्ये उपचारांसाठी शुल्क आकारले जाणार असल्याचा चुकीचा अर्थ काढण्यात आला.

प्रत्यक्षात, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय रुग्णालयांमध्ये तपासणी, निदान व उपचार हे २३ ऑगस्ट २०२३ च्या शासन निर्णयानुसार पूर्णतः निःशुल्क करण्यात आले आहेत, आणि त्या निर्णयामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही, असे विभागाने स्पष्ट केले आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने ९ फेब्रुवारी २०२६ रोजी शुद्धीपत्रक जारी करून नागरिकांच्या सनदेमधील परिशिष्ट-३ पूर्णतः वगळण्यात आल्यामुळे शासकीय रुग्णालयांमधील तपासणी व उपचार मोफतच राहतील, याबाबत कोणतीही शंका उरलेली नाही.

### अफवांवर विश्वास ठेऊ नका

सार्वजनिक आरोग्य विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, शासकीय रुग्णालयांबाबत पसरविल्या जाणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये आणि कोणत्याही शंका असल्यास अधिकृत शासन आदेश व विभागीय सूचनांचीच माहिती घ्यावी. राज्य सरकार सर्वसामान्य नागरिकांना सुलभ, दर्जेदार व मोफत आरोग्य सेवा देण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### तालुक्यातील रुग्णांना दिलासा

या निर्णयामुळे श्रीवर्धन तालुक्यातील ग्रामीण भागातील, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. तालुक्यातील ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच उपकेंद्रांमधून पूर्वीप्रमाणेच मोफत आरोग्य सेवा दिली जाणार आहे. आरोग्य सेवा मोफत राहणार असल्याने गोरगरीब रुग्णांना खासगी रुग्णालयांकडे वळण्याची गरज भासणार नाही, तसेच उपचार खर्चामुळे होणारा आर्थिक भार टळणार असल्याचे मत नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# निवडक



## पालीत माता रमाई जयंती साजरी

**पाली :** पालीत शनिवार (दि.७) रोजी त्यागमूर्ती माता रमाई भिमराव आंबेडकर यांची १२८ वी जयंती डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह पाली येथे सुधागड तालुका बौद्धजन पंचायत र. नं २७५६ सुप्रीम कमिटीचे अध्यक्ष मारुती गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी तथागत गौतम बुद्ध, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई, क्रांतिसूर्य जोतिबा फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून बुद्ध पुजापाठ घेऊन माता रमाईंना सर्वांनी अभिवादन केले. यावेळी अध्यक्ष मारुती गायकवाड, प्रभाकर गायकवाड, रोहिणी जाधव, नूतन शिंदे तसेच महिला पदाधिकारी यांनी रमाईंच्या जयंतीदिनी उजाळा दिला. यावेळी जयवंत कांबळे, विलास जगताप, यशवंत कांबळे, मोरेश्वर कांबळे, निता कांबळे, मनीषा कांबळे, रुपेश गायकवाड, ॲड. सुशिल गायकवाड, अक्षय गायकवाड, निशांत पवार, सिद्धांत गायकवाड, विवेक रोकडे, विष्णू गायकवाड, किरण कांबळे, नितीन वाघमारे, आकाश गायकवाड, तसेच बहुसंख्येने महिला पदाधिकारी यांनी उपस्थित राहून रमाईंना वंदन केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक निता कांबळे यांनी केले.



## प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**गडब :** आदर्श युवा संघटनेतर्फे गडबतर्फे जनता हायस्कुल गडब येथील प्राविण्य प्राप्त विद्यार्थाचा गुणगौरव करण्यात आला. जनता हायस्कुल गडब येथील दहावी व बारावी उत्तीर्ण प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. यावेळी आदर्श युवा संघटनेचे संचालक के. पी. पाटील उपाध्यक्ष तुळशीदास कोठेकर, कमलेश ठाकूर, निरंकार पाटील, मोरेश्वर कडू, मुख्याध्यापक सोनवणे आदीसह, शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते. स्वामी विवेकानंदांचे विचार आचरणात आणून त्यांचे पालन करावे स्वामी विवेकानंदांनी जगाला अनमोल अशी शिकवण दिली आहे त्यांचे विचार आपल्या जीवनात प्रेरणा देणार आहेत, विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अतिवापर टाळावा असे के. पी. पाटील यांनी याप्रसंगी सांगितले.



## वाळंजवडीत बंद ट्रेलरमुळे धोका

**सुतारवाडी :** वाळजवाडी रस्त्याच्याकडेला वळणावरच कोलाड कडून सुतारवाडीमार्गे विळा भागाड येथील कंपनीकडे सुमारे १०० टनाच्या दोन कॉइल घेऊन जाणारा ट्रेलर क्रमांक डी. डी. ०१. एम. ९६५३ हा ट्रेलर सात फेब्रुवारीपासून बंद अवस्थेत आहे. या ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या सिग्नलची व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे रात्रीच्या वेळी वाहन एकमेकांवर किंवा या ट्रेलरला धडकण्याची शक्यता आहे. कधी-कधी तर कोलाडकडून सुतारवाडीकडे तसेच सुतारवाडीकडून कोलाडकडे जाणाऱ्या अडथळा निर्माण होत असतो. येथून खडीचे डंपर ही मोठ्या प्रमाणावर ये-जा करत असतात. त्यांच्याही मार्गात अडथळा निर्माण होत असतो. वाळजवाडी ते कुडली दरम्यान अशा प्रकारचे कॉईल घेऊन जाणारे ट्रेलर अनेक वेळा बंद अवस्थेत असतात.

## कॉपीमुक्त परीक्षेसाठी प्रशासन सज्ज

**श्रीवर्धन :** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र म्हणजेच इयत्ता बारावीच्या परीक्षा मंगळवारी (दि.१०)पासून सुरू झाल्या असून श्रीवर्धन तालुक्यात या परीक्षांसाठी सर्व यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. तालुक्यातील एकूण ७४९ विद्यार्थी बारावीच्या परीक्षेस प्रविष्ठ झाले आहेत. परीक्षा कॉपीमुक्त पार पडाव्यात यासाठी प्रशासनाकडून उपाययोजना राबवल्या आहेत. परीक्षा केंद्रांच्या आसपास शांतता राखण्याचे आवाहन विद्यार्थी व पालकांनी प्रशासनाला केले आहे. परीक्षा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी तालुक्यातील सर्व शिक्षण विभाग तसेच केंद्र संचालक, पर्यवेक्षक, शिक्षकवर्ग व पोलीस यंत्रणा देखील समन्वयाने कार्यरत आहेत.


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- फर्निचर पॅकींगसाठी मुले पाहिजेत. शिक्षणाची अट नाही. ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार- १२००० महिना, संपर्क : ९८२३५८५३२१
- कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९
- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. रेस्टॉरंट मॅनेजर,रिसेप्शनिस्ट,कॉन्टिनेंटल,मेन्टेनन्स,वेटर, हाऊसकिपींग, रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- अलिबाग शहर येथील हॉस्पिटलच्या कामासाठी सिस्टर व मावशी यांची आवश्यकता आहे. संपर्क : ९८२२४०९८४९/९८५०३४८५०६
- मेघा टॉकीजसमोर स्वामी समर्थ बंगला १५०० SF. Reputed Bank Back office साठी उत्तम.
- Vintage दगडी सागवानी बंगलो मांडवा-सारळ समुद्रापासून २ मिनीट स्वीमिंग पूल गार्डन वगैरे सोयीसह. Contact- 9373747354
- मुले/मुली पाहिजेत. जय संतोषी मां. पंप, वाडगाव फाटा, सीएनजी पंप, मो. ९९३०५४४१२८, ८४११००९९९९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# तळा केंद्रावर शांततेत परीक्षा सुरू

**| तळा | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेला सुरुवात झाली आहे. तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा केंद्र क्रमांक २७४१ बारावी फेब्रुवारी-मार्च २०२६ ची बोर्ड परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व शांत वातावरणात पार पडत आहे. या परीक्षेसाठी राज्यात १० हजार ६६४ शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांतील १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा बारावीची विद्यार्थीसंख्या सुमारे २७ हजारांनी वाढली आहे. परीक्षेच्या काळात गैरप्रकार रोखण्यासाठी २७१ भरारी पथकांसह अन्य काटेकोर उपाययोजना करण्यात आल्या आहेत. परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी यंदा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तळा केंद्रावर कला शाखा ७०, वाणिज्य शाखा ७३ तर विज्ञान शाखा ९४ असे एकूण २३७ विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत.



यावेळी संस्थेचे विश्वस्त मारुती शिर्के, अध्यक्ष मंगेश देशमुख, प्राचार्य दिलीप ढाकणे, प्राचार्य डॉ नानासाहेब यादव, पर्यवेक्षक महादेव लोकरे आदी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

तळा केंद्रावर केंद्राध्यक्ष म्हणून प्राध्यापक बोळेगावे आय बी, केंद्र उपसंचालक प्रा. गायकवाड पी एम, किरण नागावकर, स्वप्निल वरंडे, प्रसाद सुतार काम पाहत आहेत. झूम ॲपद्वारे रायगड जिल्हाधिकाऱ्यांना तळा केंद्रावरील परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त, शांतता, पोलीस बंदोबस्त व बैठे पथकांच्या उपस्थितीत पार पडत असल्याचे लाईव्ह चित्रीकरण दाखवण्यात आले आहे.

## माधव सिद्धेश्वरे यांचा सत्कार

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण नगर परिषदेचे कर्मचारी माधव काशिनाथ सिद्धेश्वरे यांनी बीएलओचे उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांचा जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी सत्कार केला आहे. सिद्धेश्वरे हे मतदार यादीचे पुनरनिरीक्षण कामी बीएलओ म्हणून अतीशय जबाबदारीने गेले अनेक वर्षे काम करत आहेत. खऱ्या अर्थाने लोकशाही टिकली पाहीजे यासाठी सिद्धेश्वरे यांनी आपले काम प्रामाणिकपणे शिस्तबद्ध पद्धतीने केल्याबद्दल म्युनिसिपल एम्प्लॉइज युनियनचे सिद्धेश्वरे यांना जिल्हाधिकारी जावळे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय, अलिबाग येथे हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. प्रामाणिक व कर्तव्यदक्ष असलेले कर्मचारी सिद्धेश्वरे यांना म्युनिसिपल एम्प्लॉइज युनियनच्या सर्व पदाधिकारी तसेच सर्व कर्मचाऱ्यांनी त्याचे कौतुक केले आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते पुरस्कार मिळाल्याने यांच्यावर सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## गुलाब सांगळे यांचे निधन

**| रसायनी | प्रतिनिधी |**

वासांबे मोहोपाडा जिल्हा परिषद विभागातील लोधिवली येथील गुलाब किसन सांगळे यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने सांगळे कुटुंबावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या राख धुवण्याच्या दिवशी त्यांचे स्मरण सदैव राहावे या उद्देशाने साळोख ग्रामस्थांच्या वतीने वैकुंठधाम स्मशानभूमी परिसरात जांभूळ व इतर फळझाडांची लागवड करण्यात आली आहे. या उपक्रमात चंद्रकांत तात्याजी कडू, बाळकृष्ण मोरे, गणेश मोरे, दत्तात्रेय धोंडू मोरे यांच्यासह समस्त साळोख ग्रामस्थांचा सहभाग होता. त्यांचा दशक्रिया विधी श्रीक्षेत्र धाकटी पंढरी, साजगाव येथे होणार आहे. तर उत्तरकार्य मंगळवार, (दि.१७) फेब्रुवारी साळोखतर्फे नीड येथे पार पडणार आहे.



## सचिन ठसाळची भारतीय सेनेत कॅप्टन पदावर नियुक्त

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यासाठी शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. खुजारे हनुमानवाडी गावचे सचिन गणपत ठसाळ यांची भारतीय सेनेत कॅप्टन या अत्यंत मानाच्या पदावर नियुक्ती झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे संपूर्ण श्रीवर्धन तालुका आणि रायगड जिल्ह्याचे नावलौकिक वाढले आहे.

सचिन ठसाळ यांनी लहानपणापासूनच शिस्त, मेहनत आणि देशसेवेचे स्वप्न मनाशी बाळगले होते.

सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर प्रशिक्षण आणि अपार जिद्दीच्या जोरावर त्यांनी भारतीय सेनेत अधिकारी पदापर्यंत मजल मारली. कॅप्टन पदावर नियुक्त होणे ही केवळ वैयक्तिक कामगिरी नसून, ती त्यांच्या कुटुंबासाठी, गावासाठी आणि परिसरातील तरुणांसाठी प्रेरणादायी गोष्ट ठरली आहे.

या ऐतिहासिक यशाची बातमी समजताच खुजारे हनुमानवाडी गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. गावकरी, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अनेकांनी त्यांना देशसेवेच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या असून, सचिन ठसाळ हे आजच्या तरुण पिढीचे आदर्श आहेत अशी भावना व्यक्त केली जात आहे.

सचिन ठसाळ यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील तरुणांमध्ये सैन्य सेवेकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन अधिक दृढ झाला आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे परिस्थिती कितीही कठीण असली तरी मेहनत आणि ध्येय निश्चित असेल तर यश निश्चित मिळते हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी, देशसेवेत अधिक मोठी कामगिरी करण्यासाठी सर्व स्तरातून शुभेच्छा दिल्या जात असून, रायगड जिल्ह्याला अशा पुत्राचा अभिमान वाटत आहे.

# डॉ. विजय कोकणे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

भारत सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयाची योजना जन शिक्षण संस्थान रायगडचे संचालक व कवी, लेखक व विश्लेषणकार डॉ. विजय हिरामण कोकणे यांचे समाजकार्य-एक कलात्मक कौशल्य शास्त्र हे लेखक म्हणून सातव्या पुस्तकाचे प्रकाशन शुक्रवारी (दि. ६) रोजी जन शिक्षण संस्थान रायगड पर्यावरण पूरक व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, सहाण-अलिबाग येथे झाले. सदर पुस्तकाचे प्रकाशन डॉ. नितीन बाळकृष्ण गांधी यांच्या प्रकाशनाच्या माध्यमातून करण्यात आलेले असून हे त्यांचे पाचवे प्रकाशन आहे. समाजकार्य-एक कलात्मक कौशल्य शास्त्र ह्या पुस्तकाच्या माध्यमातून शास्त्रशुद्ध समाजकार्य विचार व वाचन संस्कृती वृद्धीसाठी पुस्तक प्रकाशनासाठी विशेष पुढाकार त्यांनी घेतल्याचे मत डॉ. नितीन गांधी यांनी कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले.



यापूर्वी त्यांना समाजकार्य, कौशल्य, ग्रामीण विकास, व महिला सक्षमीकरण आदी विविध विषयांमध्ये एकूण ६ मानद डॉक्टरेट प्राप्त झाल्या असून विविध क्षेत्रात ७ आंतरराष्ट्रीय, २१ राष्ट्रीय, व ५० पेक्षाही अधिक राज्य, जिल्हा व स्थानिक पुरस्कारांनी ते सन्मानित आहेत.

संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा किरीट सोमैया यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. नितीन गांधी, रत्नप्रभा बेल्हेकर, डॉ. विजय कोकणे, नरेन जाधव, ॲड. नीला तुळपुळे, गितांजली ओक, संजय राऊत, माधवी खेबूडकर, हिरामण कोकणे, डॉ. आशा कोकणे, सुमन कोकणे, वेदांत कोकणे, सचिन चव्हाण, उज्ज्वला चंदनशिव, डॉ. राजाराम हुलवान, रुपेश दांडेकर, मुकुल खेबूडकर, पंडित ढमढेरे, अनिलकुमार बेल्हेकर, अरविंद कर्णिक, प्रिया कर्णिक, जयश्री ढमढेरे, विनायक देशपांडे, सुजाता देसाई, विद्या पाठारे, प्रतिक्षा चव्हाण, कल्पना म्हात्रे, अक्षता जामकर तसेच कर्मचारी यांच्या मुख्य उपस्थितीत पुस्तक प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. माधवी खेबूडकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## म्हसळा केंद्रावर परीक्षा सुरळीत

**म्हसळा :** उच्च माध्यमिक शालांत परीक्षा अंजुमन हायस्कूल आणि जुनिअर कॉलेज म्हसळा येथे शांततेच्या वातावरणात सुरु झाल्या. केंद्रावर एकूण ६१२ परीक्षार्थी प्रविष्ठ झाले असून विज्ञान शाखेतून २०८, कला शाखेतून १३९ आणि वाणिज्य शाखेतून २६५ विद्यार्थी परीक्षा देत आहेत. अ. रहिमान घराडे यांची केंद्र संचालक तर धर्मा धामणकर यांच्यावर कस्टोडियनची जबाबदारी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाने सोपविली आहे.

**जे.एस.एम. महाविद्यालयाचा पुढाकार | विज्ञान क्षेत्रातील रोजगारावर मार्गदर्शन**

# विज्ञान-तंत्रज्ञान संशोधनावर आंतरराष्ट्रीय परिषद

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

अलिबाग येथील जनता शिक्षण मंडळाच्या श्रीमती इंदिराबाई जी. कुलकर्णी कला, जे. बी. सावंत विज्ञान आणि जानकीबाई धोंडो कुंटे वाणिज्य महाविद्यालयात 'रिसेंट ट्रेंड्स इन सायन्सेस' या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आधुनिक काळातील विज्ञानाचे महत्त्व आणि तंत्रज्ञानाचा प्रभाव अधोरेखित करण्यासाठी आयोजित करण्यात आली होती. परिषद ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही माध्यमांत पार पडली.

आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन डॉ. साक्षी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी ग्रामीण भागातील महाविद्यालयांनी जागतिक स्तरावरील विषय हाताळल्याबद्दल कौतुक केले. प्राचार्य डॉ. सोनाली पाटील यांनी संशोधनवृत्तीवर भर दिला.



विज्ञानातील वेगाने होणारे बदल आत्मसात करण्यासाठी विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता संशोधनाकडे वळावे, असे आवाहन त्यांनी केले. परिषदांमुळे विज्ञान आणि समाजाचा संबंध अधिक दृढ होतो आणि संशोधनाचे फायदे थेट लोकांपर्यंत पोहोचतात, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

प्रा. डॉ. आर. एस. लोखंडे यांनी हरितगृह वायू आणि कार्बन प्रिंट विषयावर सादरीकरण करताना हरितगृह वायूंचे प्रकार, त्यांचे पर्यावरणावर होणारे परिणाम तसेच जागतिक तापमानवाढीशी असलेला संबंध सांगितला. तसेच कार्बन फूटप्रिंट या संकल्पनेचे सोप्या भाषेत स्पष्टीकरण देत दैनंदिन जीवनातील विविध कृतींमधून होणारे कार्बन उत्सर्जन आणि ते कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना यावरही त्यांनी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. विजयकुमार मुळे यांनी संशोधनातील आधुनिक प्रवाह, आयसीटीचा वाढता प्रभाव आणि विज्ञान क्षेत्रातील रोजगाराच्या नव्या संधी यावर उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले.

आंतरराष्ट्रीय परिषदेच्या आयोजनासाठी जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. परिषदेचे आयोजन डॉ. एस. ए. कानडे यांनी केले होते. त्यांना डॉ. ए. सी. घाटपांडे, डॉ. प्रीती व्ही. फाटे यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. निलम म्हात्रे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. शिल्पा कवळे यांनी केले.

### शोधनिबंधांचे सादरीकरण

परिषदेचे मुख्य आकर्षण केंद्र म्हणजे शोधनिबंध सादरीकरण होते. यामध्ये विविध राज्यांतून आणि देशांतून आलेल्या सुमारे १०० विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग घेतला, तर ८० संशोधकांनी आपल्या संशोधन पेपरांचे सादरीकरण केले. या सादरीकरणांमुळे परिषद अधिक ज्ञानवर्धक व विचारप्रवर्तक ठरली.

# निवडणुकीतील पराभव मान्य

## संजय जांभळे यांचे प्रतिपादन

| गडब | प्रतिनिधी |

जनतेने माझ्यावर जे प्रेम दाखवून मला मतदान केले. त्या मतदानाचा मी आदर करून माझा पराजय मी मान्य करत आहे. असे वडखळ गटातील शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार माजी जिल्हा परिषद सदस्य संजय जांभळे यांनी वडखळ येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.



पुढे बोलताना ते म्हणाले की, वडखळ गटातुन प्रभाकर म्हात्रे हे निवडून आल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. तसेच, तमाम जनतेला विनंती करतो की, जनतेने माझ्यावर जे प्रेम दाखवून मला मतदान केले. त्या मतदानाचा मी आदर करून माझा पराजय मी मान्य करत आहे. परंतु, पराजय मान्य करत असताना मला, ३२ मतदान केंद्रावर दोन अक्षरी संख्या राहिली. आणि फक्त सहा मतदान केंद्रावर तीन अक्षरी संख्या राहिली. याचे मला आश्चर्य वाटते. समाजामध्ये मी नवीन होतो काय? किंवा समाज मला ओळखत नव्हतं काय? हे खऱ्या अर्थाने मला चुकीचे वाटते. ज्या गावांमध्ये माझे एवढे नातेवाईक असताना तिथे मतदान मला कमी होते. दुसरी गोष्ट या मतमोजणी चालू असताना दुसऱ्या फेरीनंतर काही तांत्रिक बिघाडामुळे मतमोजणी एक ते दिड तास बंद होते. आता कसं काय बोलायचं? त्याच्यावर विवेचन करण्यापेक्षा माझा पराजय झालाय ते मी मान्य करतो. या निवडणुकीच्या प्रचारात त्याना गावोगावी चांगला प्रतिसाद मिळत होता, असेही ते पत्रकार परिषदेत म्हणाले.



# फार्मसी महाविद्यालयाच्या फार्म फियेस्टाचा शुभारंभ

| कर्जत | प्रतिनिधी |

कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाचा फार्म फियेस्टा वार्षिक संम्मेलनाचा शुभारंभ करण्यात आला. या संम्मेलनात विद्यार्थ्यांनी क्रीडा, सांस्कृतिक माध्यमातून आपले गुणदर्शन सादर करीत असून त्यानंतर पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात येणार आहे.

कोकण ज्ञानपीठ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात फार्म फियेस्टा वार्षिक संम्मेलनाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे उपाध्यक्ष प्रकाश मुथ्था यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव प्रदिपचंद्र श्रृंगारपुरे, खजिनदार झुलकरनैन डाभीया, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य विजय मांडे, प्राचार्य डॉ. मोहन काळे, उपप्रचार्य डॉ. अमोल चांदेकर, विद्यार्थी प्रतिनिधी प्रज्वल खांडकर, सुशील गायकवाड, डॉ. निलोफर खान, डॉ. रूपाली येवले, डॉ. स्वप्नील फालक, डॉ. प्रियांका बांदिवडेकर, अनिकेत इंदुलकर, निलेश बोंडे, विशाल शेळके, धनश्री शिंदे, अश्विनी भोईर, स्विटी भोपी, वैष्णवी काळे, पूजा मोधळे, स्वाती चुंभले, सिद्धिका धोपे, सुष्मिता माजली, श्वेता शेळके, वैभव गाभाले, अश्विनी भांगे, पूजा धनगर, धनश्री साळुंखे, ऐश्वर्या नारायणकर, मुक्ता गोचडे, रेवती देशपांडे, निकेत मंडावळे, प्रवीण पाटील, मयूर कडू, नवनाथ शेळके आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

मांडे यांनी, तत्कालीन उच्च शिक्षण मंत्री अप्पासाहेब धारकर यांनी कर्जतसारख्या ग्रामीण भागात पस्तीस वर्षांपूर्वी उच्च शिक्षणाची व्यवस्था करून विशेष करून मुलींना शिक्षणाची कवाडे उघडून दिली. त्यामुळेच या परिसरातील मुली उच्च शिक्षित झाल्या. यापुढेही संस्थेचे नाव अधिक उज्वल व्हावे यासाठी सर्वांनी प्रामाणिक प्रयत्न करावेत? असे सूचित केले. प्रकाश मुथ्था यांनी, कोकण ज्ञानपीठ संस्थेची सर्व महाविद्यालये अधिक चांगल्या प्रकारे व्हावीत. यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. येथे कनिष्ठ महाविद्यालय, दंत महाविद्यालय सुरु करण्याचा आमचा मानस आहे. वास्तुविशारद शिक्षणही येथे असावे असे आम्हाला वाटते. परंतु त्यासाठी वेळ हवा आहे. तूर्तास आपण अभियांत्रिकी तंत्रशिक्षण सुरु करीत आहोत. त्यासाठी सर्वजण सहकार्य करीत आहेत. असे स्पष्ट केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, आमचे आशिलाने मौजे खांडसई ता. सुधागड, जिल्हा-रायगड, येथील खालील वर्णनाची मिळकत, असुन सदर मिळकत कायम खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले आहे. या खरेदी-विक्री संदर्भात उभयपक्षांमध्ये बोलणी सुरू असुन, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी दिला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे:-

**मौजे खांडसई, ता. सुधागड, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ५४/६ | ०.५८.००<br>पो.ख. ०.१४.००<br>एकुण क्षेत्र ०.७२.०० | ०.२३ |

तरी वरील नमुद जमिन मिळकतीमध्ये विद्यमान मालकांशिवाय अन्य कुणाही व्यक्ती, संस्थेचा साठेकरार, खरेदीखत, कूळवहिवाट, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, वारसाहक्क, पोटगी, गहाण, दान, बोजातारण, भाडेपट्टा, अदलाबदलीचा करारनामा, लीज, जाण्या येण्याचा वहिवाटीचा मार्ग, इजमेंट हक्क वगैरे अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. उक्त मुदतीत अशा प्रकारच्या हरकती न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असुन तिचे टायटल मार्केटेबल व क्लियर आहे असे समजुन आमचे आशिल मिळकतीच्या विद्यमान मालकांसोबत सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची सर्वांनी या नोटीसीद्वारे नोंद घ्यावी.

सुधागड
दि. १०/०२/२०२६

सही /-
**ॲड. ज्योती चं. कुडपणे**
मु.पो.पाली, ता.सुधागड, जि.रायगड
मो.नं.८२३७१५२७४९

## महावितरण — ई-निविदा सुचना

महावितरण तर्फे अधीक्षक अभियंता, पेण मंडळांतर्गत Repairing of Dist. Transformer (Up to १०० KVA & above १०० KVA) साठी Empanelled Agency करीता एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीसाठी कामे करण्यासाठी कंत्राटदारांकडून निविदा क्र. SE/PC/T/TF Repair/T-०८ ते T-११/२०२५-२६ साठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा महावितरण कंपनीच्या संकेतस्थळावर (https://etender.mahadiscom.in/eatApp) दि.११.०२.२०२५ ते दि.२८.०२.२०२५ (दुपारी ०५.०० वा) पर्यंत उपलब्ध आहेत. तसेच निविदा दि.२८.०२.२०२५ रोजी सायंकाळी ११.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. निम्नस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्विकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. तसेच कंत्राटदारांना विनंती करण्यात येते की, महावितरणच्या निविदा संकेतस्थळावर आपली नोंदणी करुन घ्यावी. तसेच निविदेबाबत काही मुदतवाढ किंवा शुध्दी पत्रकाबाबत फक्त संकेतस्थळावरील "Annoncements" मध्येच कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
PRO NO - 025 — अधीक्षक अभियंता, महावितरण, मंडळ कार्यालय पेण

## MAHAVITARAN — Tender Notice

Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

Following Tender is invited from Eligible Bidders by E-tendering Process under Goregaon Division under Pen Circle Raigad District. The Details are as below -

| Sr. No. | Tender No. | Nature of Work | Amount of EMD (in Rs.) | Tender Cost Fee (in Rs.) |
|---|---|---|---|---|
| 1 | EE/GRN/e-Tender/BM-HT/T-01/2026-27 | Breakdown Maintenance of HT overhead lines and underground cables in Goregaon Division Pen Circle for FY 2026-27 on partial turnkey basis. | 10,000/- | 1000+18 %GST= 1180/- |
| 2 | EE/GRN/e-Tender/BM-LT/T-02/2026-27 | Breakdown Maintenance of LT overhead lines, LT underground cables & Fuse calls in Goregaon Division Pen Circle for FY 2026-27 on partial turnkey basis. | 10,000/- | 1000+18 %GST= 1180/- |
| 3 | EE/GRN/e-Tender/BM-DTC/T-03/2026-27 | Breakdown Maintenance of Distribution Transformer Centre in Goregaon Division Pen Circle for FY 2026-27 on partial turnkey basis. | 10,000/- | 1000+18 %GST= 1180/- |
| 4 | EE/GRN/e-Tender/NSC/T-04/2026-27 | Empanelment of Agencies for Infrastructure development for release of new connections (RCI and others) in Goregaon Division Pen Circle for FY 2026-27 on partial turnkey basis | 25,000/- | 1000+18 %GST= 11800/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://etender.mahadiscom.in & can be downloaded from Dt. 10.02.2026 to Dt. 23.02.2026. Contact Person- Addl. Executive Engineer Mob no-9029135601, MSEDCL Ltd., Chinchvali, Goregaon, Tal:Mangaon, Dist.-Raigad-402103.

PRO No. 023

Executive Engineer,
Goregaon Division

## ग्रुप ग्रामपंचायत कडापे ता. माणगाव, जि. रायगड

### जाहीर निविदा

नोटिस बोर्ड प्रसिद्धी दिनांक - ०४/०२/२०२६

ग्रुप ग्रामपंचायत कडापे ता.माणगाव जि.रायगड यांस कडून खालील कामाकरिता जास्त नोंदणीकृत इच्छित ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तसेच सदरचे निविदा व दरपत्रक दि. १२/०२/२०२६ पर्यंत ग्रामपंचायत कार्यालय कडापे येथे सकाळी ११.०० वाजे पर्यंत सादर करावे.

| अ.क्र | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | येरद अंतर्गत गटार दुरुस्ती करणे | १५ वा वित आयोग | १००००० | ६ महिने |
| २ | येरद गणपती विसर्जन रस्त्यालगत गटार बांधणे | १५ वा वित्त आयोग | १५१००० | ६ महिने |
| ३ | पाणी शुद्धी करण्याच्या बाबी | १५ वा वित्त आयोग | ५०००० | ६ महिने |
| ४ | कांदळगाव बु. येथील पाण्याची टाकी दुरुस्ती करणे | १५ वा वित्त आयोग | १००००० | ६ महिने |
| ५ | कडापे येथील आडाच्या पाण्याला संरक्षक भिंत बांधणे | १५ वा वित्त आयोग | १००००० | ६ महिने |
| ६ | कडापे जलजीवन योजनेच्या विहिरीला कंपाउंड व जाळी बसविणे | १५ वा वित्त आयोग | १०१५०० | ६ महिने |
| ७ | येरद शाळेला सोलर पैनल बसविणे | १५ वा वित्त आयोग | ९०४५० | ६ महिने |
| ८ | अंगणवाड्यांना फर्निचर खरेदी करणे | १५ वा वित्त आयोग | ३६१८० | ६ महिने |
| ९ | कडापे बौद्धवाडी येथे स्मशान चौथरा बांधणे | १५ वा वित्त आयोग | ११९३९४ | ६ महिने |
| १० | नामदेव भोसलेंच्या घरापासून ते सुरेश दबडे यांच्या घरापर्यंत रस्ता करणे | १५ वा वित्त आयोग | ११५७७६ | ६ महिने |
| ११ | १५ टक्के मागासवर्गीय खर्च रक्कमेतून मागासवर्गीय वस्ती मध्ये वैयक्तिक साहित्य पुरविणे व सार्वजनिक काम करणे | स्वनिधी | १६०००० | ३ महिने |

**अटी व शर्ती :**

१. प्राप्त निविदा दि. १२/०२/२०२६ रोजी स. ११.०० वाजता ग्रा. पं. कडापे येथे उपस्थितांच्या समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उघडणेत येतील.
२. निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती/चलन जोडलेली असावी.
३. कोणतेही कारण न देता एक किवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
४. कामाच्या अंदाज पत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील.
५. निविदा मंजुरी अंती ठेकेदार/ पुरवठादार यांस रीतसर करारनामा करून घ्यावा लागेल.
६. कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे काम पूर्ण करणे बंधनकारक राहील, अन्यथा नियमानुसार दंड व ज्ञाप्ती लागू करण्यात येतील.
७. साहित्य व वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली आहे.
८. निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.
९. नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल.
१०. ठेकेदार पुरवठा दार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व प्रणालीशी संलग्न असावे.
११. कायद्याच्या देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल.

सही/-
**नम्रता नरेश तरडे**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत कडापे**
**ता.माणगाव जि.रायगड**

सही/-
**अस्मिता जनार्दन सिलीमकर**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत कडापे**
**ता.माणगांव जि.रायगड**

## जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी गांव कामथ येथील खालील वर्णनाच्या जमीन मिळकती ७/१२ कडील वर्णनानुसार शारदा विनायक काठे वगैरे यांचे मालकीच्या असून, सदर जमिनी विकत घेण्याबाबत आमचे अशिलांची बोलणी चालू आहेत.

| सर्व्हे/गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ३०५ | - | ०-०९-४० | २=०६ |
| २६४ | - | ०-४६-५० | ९=७९ |

वर नमूद मिळकती विद्यमान मालकांकडून विकत घेण्याची आमचे अशिलांची इच्छा आहे. सदर व्यवहार अंतिमतः ठरवून पूर्ण करण्याआधी मिळकतींच्या जडजोखीमीबाबत खात्री करण्याकरिता ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. तरी, सदर मिळकतींच्या वर नमूद केलेल्या सहमालकांव्यतिरिक्त इतर कोणाचाही दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, वहिवाटीचा हक्क, जप्ती अगर तत्सम अन्य प्रकारचा हक्क या मिळकतींवर असल्यास किंवा सदर मिळकतींबाबत महसूल कोर्ट अगर दिवाणी कोर्टात कोणताही वाद निर्णित झाला असेल अथवा प्रलंबित असेल असे कोणाचेही म्हणणे असल्यास आणि वर नमूद केलेल्या मालकांच्या हक्काबाबत कोणाचीही कोणत्याही स्वरूपाची हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत नोंदवावी. त्यानंतर आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

तारीख : १०/०२/२०२६

सही/-
**ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा कोऑप. हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग, रायगड.
९२७०१६२९२९/९४२२६८९१७०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे केळवली, ता. खालापुर जि.रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायमची विकत घेण्याची निश्चित केलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकत परिशिष्ठ मौजे केळवली, ता. खालापुर जि.रायगड**

| खातेदार नाव | गट नंबर | क्षेत्रफळ हे.आर.प्रति | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| दिपक मणिलाल शहा, चंद्रिका दिपक शहा | ८८ | ०.३२.०० | ०.५० |
| निशा रमेश दिसले | ९४ | ०.३९.१० | २.४३ |
| गणेश नागु दिसले | ९४ | ०.४०.०० | १.८९ |

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा संस्थेचा बोजा, हक्क, हितसंबंध अधिकार कुळ वहिवाट, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, वारस हक्क, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत द्यावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास, वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या व्यवहाराची पुर्तता करतील. मुदतबाह्य हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कार्यालय पत्ता
१०३, पहिला मजला, पांडुरंग धाम,
रेल्वे गेट जवळ, नेरळ, ता. कर्जत,
जि. रायगड. मो. नं. ७७९८४३३८८८

सही /-
**ॲड. कैलास अनंत बासरे**

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि.रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./हि.नं. | एकुण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्री. आण्णा काळु खडेकर | १८/३ | एकुण क्षेत्र ३-०१-०० हे. आर. पॉ.यापैकी लिहुन देणार यांचे मालकीचे विकत देत असलेले क्षेत्र ००-५०-०० हे.आर.पॉ. | ०-६९ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ११/०२/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता- बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि.रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीचे मालक श्री.नामदेव शिवराम हंकारे यांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील मिळकत आमचे अशिल यांना कायम स्वरूपी खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलांचे बरोबर केलेली आहेत. मौजे वाकस, तालुका-कर्जत, जिल्हा- रायगड ४१०१०१ येथील शेतजमिन मिळकत व त्या जमिनीमध्ये खालील वर्णन केलेली सर्व मिळकत :-

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै) |
|---|---|---|
| ५०/१ | एकूण क्षेत्र ०.२८.०० या मिळकतीपैकी जमिन मालक श्री. नामदेव शिवराम हंकारे यांचे हिस्याचे असलेले जमिनीचे क्षेत्र ०.१०.०० हे. आर.चौ.मी व त्या मिळकतीमध्ये बांधलेले ५ बीएचके आर.सी.सी बंगला ज्याचे ग्रामपंचायत वाकस मिळकत क्र. १३० क्षेत्र १८२२ चौ.मी व टेरेस असे असून सदरचे जागेमध्ये प्रशस्त स्विमिंगपुल, किचनशेड ज्याचे ग्रामपंचायत वाकस मिळकत क्र. १२६ क्षेत्र ३४४ चौ.मी, बोअरवेल व २५ पेक्षा अधिक झाडे, वॉल कंपाउंड, गेट, अशा या सर्व मिळकती सहीत. | ०.०० |

तरी शेतजमिन मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, वहीवाट, बयाणा, पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे केसेस व मनाईहुकूम, करारनामा व इतर कोणतेही हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांच्या नमुद केलेल्या कार्यालयाचे पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासह देण्यात यावे. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत
तारीख : ११/०२/२०२६

सही /-
**ॲड.जगदिश पांडूरंग कराळे**
कार्यालय : गाळा नंबर १०, पंकज रेसिडेन्सी,
साई हॉस्पिटल जवळ, आगरी समाज हॉल
शेजारी, धामोते, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
४१०१०१, मो.नं. ८३६९२१७३१३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे आंबिवली त.कोतलखलाटी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतीचे मालक प्रशांत प्रभाकर राणे यांचे कडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु. पै |
|---|---|---|---|
| १२ | १ | ०.१७.२० | ०.४७ |
| १२ | ३ | ०.२२.०० | १.८७ |

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकांबरोबर पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : - ११/०२/२०२६

**ॲड.सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड-४१०२०१

## जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत कायमस्वरूपी सदर मिळकतींचे मालक यांचेकडून विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

**मौजे वैजनाथ ता. कर्जत जि. रायगड येथील खाली नमूद मिळकत**

| मालकाचे नाव | भुमापन क्र .व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| हरेश नरेंद्र साळोखे | ७/४ | ०.०८.१० | ०.२८ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांकः /०२/२०२६

**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु.पो.चिंचवळी ता.कर्जत जि.रायगड
मो.नं. ९०४९४८६८०५

## जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक प्रभाकर वसंत गुरव यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे वैजनाथ, ता.कर्जत, जि.रायगड | १०/२/ब जुना स.नं. १३८/२ब | ०.८८.५० | ४.६२ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांकः /०२/२०२६

**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु. पो. चिंचवळी ता.कर्जत जि.रायगड
मो. नं. ९०४९४८६८०५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकती त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-आसल, तालुका-कर्जत, जि-रायगड येथील जमिन मिळकती**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| कांताबाई रामचंद्र गायकवाड<br>प्रकाश रामचंद्र गायकवाड<br>मुकुंद रामचंद्र गायकवाड<br>सुगंधा मिलींद वाघमारे<br>मनुबाई अशोक गायकवाड<br>आशाबाई दिपक बनसोडे<br>प्रमिलाबाई सुनिल गायकवाड | ३७ | ३ | ०-२७-६० | १-७८ |
| कांताबाई रामचंद्र गायकवाड<br>प्रकाश रामचंद्र गायकवाड<br>मुकुंद रामचंद्र गायकवाड<br>सुगंधा मिलींद वाघमारे<br>मनुबाई अशोक गायकवाड<br>आशाबाई दिपक बनसोडे<br>प्रमिलाबाई सुनिल गायकवाड | ३७ | ५ | ०-०९-१० | ०-९४ |

सदरच्या जमीन मिळकती ह्या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती या तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या जमीन मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ११/०२/२०२६

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड.स्वप्निल बाबूराव देशमूख**
पत्ता. सदनिका नं.५०४, ५ वा मजला,
गजवक्र रेसिडेंन्सी, कचेरी रोड, कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८८३०५६०९६२/९२७३२२४६८०

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे पाल्हे, ता. अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक सीमा विशाल पाटील, शर्वरी शैलेश पाटील, निलीमा राकेश नाईक सर्व- सज्ञान सर्व रा. रूम नं. ८, के. डी. जाधव चाळ, बेतुरकर पाडा-८, काला तलाव कल्याण वेस्ट ४२१३०१ यांच्या नांवे असलेली सामाईक मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे स्नेही यांनी कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बयाणा पावती विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| पाल्हे ता.अलिबाग जि.रायगड | १७४ | ०-४१-५०<br>पो.ख. ०-०४-१०<br>एकूण क्षेत्र ०-४५-६० | ४.९० |

वर नमुद भातशेती मिळकतीपैकी ०-१६-०० हे.आर. मिळकत

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- ११/०२/२०२६

सही /-
**श्री.किशोर वामन तेलंगे**
पत्ता:श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालया समोर गाळा क्र.३, ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## निवडक

### विराट आणि रोहितच्या मानधनात झाली घट

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने सोमवारी



खेळाडूंचे नवीन वार्षिक करार जाहीर केले असून यात मोठे बदल करण्यात आले आहेत. वरिष्ठ सुपरस्टार खेळाडू विराट कोहली आणि रोहित शर्मा यांना अपेक्षांनुसार ब श्रेणीत स्थान देण्यात आले आहे. विशेष म्हणजे, बीसीसीआयने ७ कोटी रुपये मानधन असलेली ए प्लस ही सर्वोच्च श्रेणीच आता रद्द केली आहे. बीसीसीआयने एकूण ३० पुरुष आणि २१ महिला क्रिकेटपटूंना अ, ब आणि क श्रेणीचे वार्षिक करार देण्याची घोषणा केली आहे.गिल, बुमराह आणि जडेजा अ श्रेणीत नवीन करारानुसार, दोन प्रकारच्या क्रिकेटमधील कर्णधार शुभमन गिल, वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि अष्टपैलू रवींद्र जडेजा यांना अ श्रेणीत स्थान मिळाले आहे. बीसीसीआयने अद्याप तिन्ही श्रेणींसाठीच्या मानधनाची घोषणा केलेली नाही. यापूर्वीच्या रचनेनुसार अ श्रेणीसाठी ५ कोटी, ब श्रेणीसाठी ३ कोटी आणि कफ श्रेणीसाठी १ कोटी रुपये दिले जात होते. विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी कसोटी आणि टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली असून ते सध्या केवळ एकदिवसीय प्रकारातच खेळत आहेत. नियमांनुसार एकाच प्रकारात खेळणारे खेळाडू सर्वोच्च श्रेणीत राहू शकत नाहीत, त्यामुळे त्यांना ब श्रेणीत स्थान देण्यात आले आहे.ए प्लस श्रेणी रद्द करण्यामागचे कारण माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीच्या सूचनेवरून प्रशासकांच्या समितीने ए प्लस श्रेणी सुरू केली होती, असे मानले जाते.

### मुंबईला पराभवाचा धक्का

**नवी दिल्ली :** रणजी ट्रॉफी च्या उपांत्यपूर्व फेरीत कर्नाटकने ४२ वेळा विजेतेपद पटकावलेल्या मुंबई संघाला चार विकेट्सनी पराभूत करत उपांत्य फेरीत धडक मारली आहे. मुंबईतील एमसीएबीकेसी मैदानावर झालेल्या सामन्यात केएल राहुल कर्नाटक संघाच्या विजयाचा शिल्पकार ठरला. दबावात त्याने आपल्या फलंदाजीतील क्लास दाखवत शतकी खेळीसह संघाला विजय मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलला. यंदाच्या रणजी हंगामातील उपांत्य फेरीत कर्नाटकचा संघ आता उत्तराखंडविरुद्ध खेळताना दिसेल.मुंबईच्या संघाने कर्नाटकसमोर विजयासाठी ३२५ धावांचं आव्हानात्मक टार्गेट सेट केले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना लोकेश राहुलनं १८२ चेंडूत १३० धावांची शानदार खेळी साकारली. प्रथम श्रेणी क्रिकेटमधील त्याचे हे २४ वे आणि रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेतील ९ वे शतक आहे.लोकेश राहुल आणि स्मरण रविचंद्रन या जोडीच्या भागीदारीनं मुंबईचं गणित चुकलं. स्मरणने जबाबदारीनं खेळताना नाबाद ८३ धावांची खेळी केली. या दोघांनी केलेल्या १४७ धावांच्या भागीदारीच्या जोरावर हा सामना कर्नाटकच्या बाजूनं झुकला. लोकेश राहुलनं विकेट गमावल्यावर स्मरण रविचंद्रन याने शेवटपर्यंत मैदानात थांबून संघाचा विजय निश्चित केला.या सामन्याच्या पहिल्या डावात केएल राहुल साजेसा खेळ करू शकला नव्हता. पहिल्या डावात त्याने २८ धावांची खेळी केली. त्याच्या फ्लॉप शोनंतरही कर्नाटकच्या संघाने पहिल्या डावात ५३ धावांची आघाडी घेतली होती.

### मनू भाकरचा सुवर्णवेध थोडक्यात चुकला

**नवी दिल्ली :** आशियाई अजिंक्यपद नेमबाजी स्पर्धेतील



थरारक आणि तणावपूर्ण शूट ऑफमध्ये पराभव पत्करावा लागल्याने मनू भाकर हिचे सुवर्णपदक अगदी थोडक्यात हुकले. ऑलिम्पिकमधील दुहेरी कांस्यपदक विजेती मनूला २५ मीटर पिस्तूल इव्हेंटमध्ये रौप्यपदकावर समाधान मानावे लागले, तर भारताचीच ईशा सिंग हिने कांस्यपदक पटकावले. या स्पर्धेतील सर्वाधिक चुरशीच्या ठरलेल्या या लढतीत, सुवर्णपदक विजेती गुयेन थुई ट्रांग, मनू यांनी अंतिम फेरीत प्रत्येकी ३५ गुणांची समान कामगिरी केली. यानंतर शूटऑफमध्ये व्हिएतनामच्या नेमबाजाने बाजी मारली. मनू आणि ईशाने गुणांतील अंतर कमी केले. आठव्या फेरीअखेर ३० गुणांसह आघाडीवर असलेल्या ईशाला नवव्या फेरीत एकही लक्ष्य भेदता आले नाही आणि तिला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. अंतिम फेरीत मनूने ३ लक्ष्ये भेदली, तर ट्रांगने दोनच लक्ष्ये साधली. त्यामुळे दोघांचेही एकूण गुण ३५ झाले आणि थरारक शूट ऑफ खेळवावा लागला. याआधी, प्रिसिजन आणि ड्युएलिंग या टप्प्यांचा समावेश असलेल्या पात्रता फेरीत ईशाने ५८९ गुणांसह अव्वल स्थान मिळवले, तर मनू ५८४ गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर राहिली. तीन भारतीय नेमबाजांनी आठजणांच्या अंतिम फेरीत प्रवेश केला होता.

# डेव्हिस कपमध्ये भारताने नेदरलँड्सला हरवले

## दक्षिणेस्वर सुरेशने तीन सामने जिंकले, पहिल्यांदाच संघ वर्ल्ड ग्रुपमध्ये पोहोचू शकतो

**। बंगळूरु । वृत्तसंस्था ।**

बंगळूरु येथील एसएम कृष्णा स्टेडियममध्ये खेळल्या गेलेल्या डेव्हिस कप सामन्यात भारताने नेदरलँड्सला ३-२ ने हरवून इतिहास रचला. या विजयाचा सर्वात मोठा नायक २६ वर्षीय दक्षिणेस्वर सुरेश ठरला. दक्षिणेस्वरने दोन दिवसांत तीन अत्यंत कठीण सामने जिंकून भारताला डेव्हिस कप वर्ल्ड ग्रुपच्या जवळ पोहोचवले आहे. रविवारी निर्णायक सामन्यात त्याने नेदरलँड्सच्या गाय डेन ऑडेनला ६-४, ७-६ ने हरवून स्टेडियममधील हजारो प्रेक्षकांना जल्लोष करण्याची संधी दिली.



रविवारी सुरुवातीला भारत आणि नेदरलँड्स १-१ च्या बरोबरीत होते. कर्णधार रोहित राजपाल यांनी एक धाडसी निर्णय घेत डबल्समध्ये श्रीराम बालाजी यांच्या जागी दक्षिणेस्वरला युकी भांबरीसोबत मैदानात उतरवले. या जोडीने डेव्हिड पेल आणि सँडर एरेंड्सला ७-६, ३-६, ७-६ ने हरवून भारताला २-१ ची आघाडी मिळवून दिली. यानंतर सुमित नागल आपला सामना हरले आणि सामना २-२ च्या बरोबरीत आला. दबावाच्या क्षणी दक्षिणेस्वर पुन्हा कोर्टवर उतरले आणि निर्णायक सामना जिंकून भारताचा विजय निश्चित केला.

मदुराईचे रहिवासी असलेल्या दक्षिणेस्वर सुरेशची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांची ६ फूट ५ इंच उंची आणि त्यांची वादळी सर्व्हिस. शनिवारी त्यांनी वर्ल्ड नंबर ८८ जेस्पर डी जोंगला हरवून सर्वांना चकित केले होते. बंगळूरुच्या अधिक उंचीमुळे चेंडू हवेत वेगाने प्रवास करतो, ज्याचा दक्षिणेस्वरने चांगलाच फायदा घेतला. त्यांच्या सर्व्हिस आणि आक्रमक फोरहँडला डच खेळाडूंकडे कोणतेही उत्तर नव्हते. विजयानंतर ते म्हणाले, प्रेक्षकांनी मला वारंवार कोर्टवर उतरण्याचा आत्मविश्वास दिला. भारतासाठी तीन सामने जिंकणे हे एखाद्या स्वप्नासारखे आहे.

भारताचा अव्वल खेळाडू सुमित नागल गेल्या तीन आठवड्यांपासून रिहॅबमध्ये होता आणि पूर्णपणे तंदुरुस्त दिसला नाही. तो आपले दोन्ही एकेरी सामने हरला, त्यामुळे भारतावर पराभवाचे सावट होते. अशा स्थितीत जागतिक क्रमवारीत ४६५व्या स्थानावर असलेल्या दक्षिणेस्वर सुरेशने जबाबदारी स्वीकारण्यास सुरुवात केली. त्याने केवळ सर्व्हिसने गुण मिळवले नाहीत, तर नेटवर येऊन व्हॉली आणि दमदार ग्राउंडस्ट्रोकने विरोधी खेळाडूला सावरण्याची संधी दिली नाही.

दक्षिणेस्वर बऱ्याच काळापासून टेनिस सर्किटमध्ये आपली ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करत होते. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये त्यांनी विन्स्टन-सलेम एटीपी २५० स्पर्धेच्या मुख्य ड्रॉमध्ये स्थान मिळवून खळबळ उडवून दिली होती, जिथे त्यांनी माजी टॉप-२० खेळाडू अलेजांद्रो ताबिलोचा पराभव केला होता. बंगळूरुमधील त्यांच्या विजयादरम्यान दिग्गज टेनिसपटू रोहन बोपन्ना देखील स्टँड्समध्ये उपस्थित होते आणि संघाचा उत्साह वाढवत होते.

### सूर्यवंशी कॉम्प्लानचा ब्रँड ॲम्बेसेडर

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

भारताचा युवा फलंदाज आणि 'वंडर बॉय' म्हणून ओळखला जाणारा वैभव सूर्यवंशी याची कमाई सुरु झाली आहे. आरोग्य आणि वेलनेस कंपनी 'झायडस वेलनेस'ने आपल्या लोकप्रिय हेल्थ ड्रिंक ब्रँड 'कॉम्प्लान'साठी वैभव सूर्यवंशीची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड केली आहे.वैभव सूर्यवंशीने वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षी भारतीय अंडर-१९ संघात स्थान मिळवून सर्वात तरुण खेळाडू ठरून क्रिकेट विश्वाचे लक्ष वेधून घेतले होते. आता मैदानावरील कामगिरीसोबतच तो जाहिरात क्षेत्रातही आपली छाप पाडणार आहे. 'कॉम्प्लान'ने आजवर अनेक दिग्गजांना ब्रँड फेस म्हणून संधी दिली आहे, त्या रांगेत आता वैभवचे नाव जोडले गेले आहे.कंपनीच्या मते, वैभव सूर्यवंशी हा आजच्या पिढीतील खेळाडूंसाठी ऊर्जा, जिद्द आणि योग्य वाढीचे प्रतीक आहे. मुलांच्या शारीरिक आणि मानसिक वाढीवर लक्ष केंद्रित करणाऱ्या कॉम्प्लान ब्रँडच्या मूल्यांशी वैभवचे व्यक्तिमत्व तंतोतंत जुळते. या भागीदारीच्या माध्यमातून कंपनी आपला ब्रँड संदेश तरुण पिढीपर्यंत आणि पालकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणार आहे.

### आयुषने घेतली सचिनची भेट

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय अंडर-१९ संघाने झिम्बाब्वे आणि नामिबीयात झालेल्या अंडर-१९ वर्ल्डकप स्पर्धेत इतिहास घडवला आहे. आयसीसी अंडर-१९ वर्ल्डकप स्पर्धेतील फायनलमध्ये आयुष म्हात्रेच्या नेतृत्वात खेळणाऱ्या भारतीय संघाने बलाढ्य इंग्लंडचा एकतर्फी पराभव केला आणि भारताला सहाव्यांदा अंडर-१९ वर्ल्डकपची ट्रॉफी जिंकून दिली. संघाचा कर्णधार आयुष म्हात्रेचं देखील कौतुक होत आहे. दरम्यान आयुष म्हात्रेने भारतात परतल्यानंतर मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरची भेट घेतली. दरम्यान सचिनने त्याला खास गिफ्ट दिलं आहे.



आयुष म्हात्रेने आपल्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवरून एक व्हिडीओ शेअर केला आहे.

या व्हिडीओमध्ये भारताचा दिग्गज फलंदाज सचिन तेंडुलकर आणि आयुष म्हात्रेसह संपूर्ण कुटुंब असल्याचं दिसून येत आहे. देशासाठी वर्ल्डकप जिंकणं ही अभिमानाची बाब आहे. दरम्यान या विजयाचा आनंद आणखी वाढला आहे. कारण आयुष म्हात्रेने क्रिकेटचा देव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सचिन तेंडुलकरची भेट घेतली.

### कॅरम स्पर्धेत मिताली अन् घुफ्रान विजेते

**। मुंबई । वृतसंस्था ।**

शिवाजी पार्क जिमखाना आयोजित, सारस्वत बँक पुरस्कृत, राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत, मुंबईच्या महम्मद घुफ्रानने पुरुषांचे तर मिताली पाठकने महिलांचे विजेतेपद पटकावले.पुण्याच्या अभिजित त्रिपनकरला २५-१४, २५-० दोन सेटमध्ये हरवून घुफ्रान विजेता ठरला. महिला एकेरीच्या अंतिम लढतीत मुंबईच्या मिताली पाठकने मुंबईच्या रिंकी कुमारीला २५-१२, २१-९ असे सहज पराभूत करून विजेतेपद पटकावले. पुरुषांच्या तिसऱ्या क्रमांकासाठीच्या लढतीत ठाण्याच्या झैद अहमद फारुकीने पुण्याच्या सागर वाघमारेला २५-०, २३-७ असे हरवले.

# मोहम्मद शमीचं वादळ घोंघावलं

## चौकार-षटकार मारत ठोकलं वेगवान अर्धशतक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

रणजीट्रॉफी २०२५-२६ स्पर्धेचे उपांत्यपूर्व फेरीचे सामने सुरू आहेत. या स्पर्धेत आंध्र प्रदेश आणि बंगाल हे संघ आमनेसामने आले आहेत. या सामन्यात वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीची फलंदाजीची बाजू पाहता आली. त्याने आक्रमण करून आंध्र प्रदेशच्या गोलंदाजांना सळो की पळो करून सोडलं.

बंगालने पहिल्या डावात ६२९ धावांची खेळी केली. यात सुदिप कुमार घरामीने २९९ केल्या. त्याचं त्रिशतक फक्त एका धावेने हुकलं. तर शाकिर हबीब गांधीने ९५ धावा केल्या. तर मोहम्मद शमीच्या अर्धशतकाने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. मोहम्मद शमीने शेवटच्या



विकेटसाठी मुकेश कुमारसह ५५ धावांची भागीदारी केली.

संघाची स्थिती मजबूत असताना मोहम्मद शमी दहाव्या स्थानावर फलंदाजीला उतरला होता. मोहम्मद शमी आला आणि आक्रमण सुरू केलं. त्याने फक्त ३३ चेंडूत ५३ धाव केल्या. त्याने फक्त ३१ चेंडूत अर्धशतक पूर्ण केलं. यात त्याने ७ चौकार आणि ३ षटकार मारले. त्याचा स्ट्राईक रेट हा १६०हून अधिक होता. त्याने ४६ धावा या चौकार आणि षटकार मारून केल्या. हा सामना पाहण्यासाठी निवड समिती सदस्य आरपी सिंह उपस्थित होता. त्यामुळे निवड समितीला त्याला डावलण्याचं कारण मिळणार नाही. एक शॉट शमीने आरपी सिंहच्या दिशेने मारला. तेव्हा सीमेरेषेवर बसलेल्या आरपी सिंहला चेंडू पकडण्यासाठी धावावं लागलं. दुसरीकडे, पहिल्या डावात गोलंदाजीत शमी काही खास करू शकला नाही. त्याने १७ षटकात ३८ धावा दिल्या आणि १ विकेट काढली.

### विद्यार्थी चषक कबड्डी स्पर्धा

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

सचिन्द्र आयरे फाऊंडेशन, मुंबई शहर कबड्डी असो. च्यावतीने ९ ते १४ वर्ष वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी चषक कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. बिंदू माधव ठाकरे मनोरंजन मैदान, गॅस कंपनी लेन येथे दि. १२ व १३ फेब्रु. २०२५ या कालावधीत हे सामने खेळविण्यात येथील. या स्पर्धेत ८ शालेय संघानी आपला सहभाग नोंदविला आहे. स्पर्धेतील विजेत्या संघाला विद्यार्थी चषक व रोख रक्कम, उपविजेत्या संघास देखील चषक व रोख रक्कम प्रदान करण्यात येईल. सर्वोत्तम खेळाडू, उत्कृष्ट चढाई व पकडीच्या खेळाडूस आकर्षक भेटवस्तू देण्यात येईल.

# पाकिस्तान भारताविरुद्ध खेळणार

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषकात भारत आणि पाकिस्तान यांच्यात नियोजित सामन्याबाबतची अनिश्चितता अखेर संपुष्टात आली आहे. तसेच रविवार १५ फेब्रुवारी रोजी दोन्ही संघ एकमेकांविरुद्ध खेळण्यासाठी मैदानात उतरतील हे स्पष्ट झाले आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सुरुवात बांगलादेशच्या संघापासून झाली होती. बांगलादेशने सुरक्षेच्या कारणास्तव भारतात खेळण्यास नकार दिला होता. त्यानंतर पाकिस्ताननेही बांगलादेशची बाजू घेत या वादात उडी घेतली. मात्र आयसीसीने बांगलादेशच्या दाव्यांना केराची टोपली दाखवत बांगलादेशला स्पर्धेतून बाहेरची वाट दाखवली. त्यानंतर पाकिस्तानने आणखी एक चाल खेळली. तसेच आपण विश्वचषक स्पर्धेत खेळू मात्र बांगलादेशला पाठिंबा म्हणून भारताविरुद्ध खेळणार नाही, अशी भूमिका घेतली. तसेच बांगलादेशला या स्पर्धेसाठीचा पूर्ण निधी मिळावा, द्विपक्षीय मालिका व्हाव्यात यासह अनेक मागण्या केल्या. दरम्यान, पाकिस्तान सरकारनेही अधिकृतपणे या सामन्यातून माघार घेण्याचे जाहीर करून टाकले होते.

मात्र आयसीसीने पाकिस्तानने केलेल्या मागण्या धुडकावून लावल्या. द्विपक्षीय मालिका, तिरंगी स्पर्धा आणि भारताचा बांगलादेश दौरा या बाबी आपल्या अखत्यारित येत नसल्याचे आयसीसीने स्पष्ट केले. मात्र स्पर्धेतून माघार घेणाऱ्या बांगलादेशवर आयसीसीने कुठलीही दंडात्मक कारवाई केली नाही. तसेच बांगलादेशला १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेचं यजमानपद देण्याचा विचार सुरू असल्याचेही सांगितले. मात्र पाकिस्तानच्या उर्वरित ३ मागण्या आयसीसीने धुडकावून लावल्या.

पाकिस्तान सरकारनेही बहुपक्षीय चर्चा आणि मित्र देशांनी केलेल्या विनंतीचा मान राखून पाकिस्तानच्या क्रिकेट संघाला १५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या भारताविरुद्धच्या सामन्यात खेळण्याची परवानगी देत असल्याचे जाहीर केले. तसेच हा निर्णय क्रिकेटमधील खेळभावना जपण्यासाठी घेत असल्याचेही पाकिस्तान सरकारने सांगितले.

सुरुवातीला या स्पर्धेचे सहयजमान असलेल्या श्रीलंकेला हा सामना न झाल्यास आर्थिक नुकसान होणार असल्याची बाब आयसीसीने पटवून दिली. त्यानंतर खुद्द श्रीलंकेचे राष्ट्रपती दिसनायके यांनी पाकिस्तानच्या पंतप्रधानांना फोन करून स्पर्धेत भारताविरुद्ध खेळण्याचं आवाहन केलं. त्यानंतर यूएईनेही या सामन्यात खेळण्यासाठी पाकिस्तानवर दबाव आणला.

अखेरीस ज्या बांगलादेशसाठी सगळा आटापिटा करत असल्याचं नाटक पाकिस्तान करत होता, त्या बांगलादेशनेही क्रिकेटच्या व्यापक हितासाठी पाकिस्तानने या सामन्यात खेळावं असं आवाहन केलं. त्यानंतर पाकिस्तानकडे भारताविरुद्ध खेळण्याचा निर्णय घेण्यावाचून कुठलाही पर्याय उरला नाही.

### गौरेशचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

**। फोंडा । वृत्तसंस्था ।**

कुंडई येथील क्रिकेटवेड्या गौरेशचे क्रिकेटच्या मैदानावरच हृदयविकाराचा झटका आल्याने निधन झाले.कुंडई येथील गौरेश नाईक हा रिक्षा चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करायचा. रविवारी नेहमीप्रमाणेच सुटी असल्याने तो मित्रांबरोबर मडकई येथील शनिशनेश्वर मंदिराजवळील मैदानावर क्रिकेट खेळायला गेला होता. खेळत असतानाच तो अचानक तिथेच पडला. मित्रांनी त्याला तातडीने इस्पितळात दाखल केले. त्यापूर्वीच त्याची प्राणज्योत मालवली होती. एका क्रिकेटवेड्या खेळाडूचा मैदानावरच मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

**कॅनडाच्या नवनीतने दिली कडवी टक्कर! गुणतालिकेत मोठा बदल**

# दक्षिण आफ्रिकेचा धमाकेदार विजय

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

दक्षिण आफ्रिकेने ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेतील ड गटात कॅनडावर दणदणीत विजय मिळवला. एडन मार्करमच्या अर्धशतकी खेळीला रायन रिकेल्टन, डेव्हिड मिलर व त्रिस्तान स्तब्स यांची साथ मिळाली आणि आफ्रिकेने मोठे आव्हान उभे केले.

कॅनडाच्या नवनीत धलिवालने अर्धशतक झळकावून चांगली झुंज दिली, परंतु ती अपयशी ठरली. आफ्रिकेने ५७ धावांनी सामना जिंकला आणि २.८५० नेट रन रेटसह ड गटात अव्वल स्थान पटकावले.



न्यूझीलंड २ गुण व ११६२ नेट रन रेटसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. कॅनडाने नाणेफेक जिंकून बलाढ्य दक्षिण आफ्रिकेला प्रथम फलंदाजीला बोलावण्याचे धाडस दाखवले.

त्यांना सुरुवातीला यश मिळाले असते, परंतु क्विंटन डी कॉकचा झेल टाकला. आफ्रिकेच्या सलामीच्या जोडीने १०च्या सरासरीने धावा कुटल्या.

दिलप्रीत बाजवाने कॅनडाला पहिले यश मिळवून देताना क्विंटनचा त्रिफळा उडवला. कर्णधार एडन मार्करमने चांगली फटकेबाजी करताना धावांची गती कायम राखली. त्याने ३२ चेंडूंत १० चौकार व १ षटकारासह ५९ धावा केल्या. अंश पटेलच्या चेंडूवर मार्करमने उत्तुंग फटका मारला होता आणि डिलॉन हेयलिगरने सीमारेषेवर झेप घेत चेंडू पकडला.

हेयलिगरच्या या झेलने साऱ्यांना चकित केले. मार्करम व रायन रिकेल्टन यांची ५६ धावांची भागीदारी १२ व्या षटकात तुटली. त्यानंतर १४व्या षटकात पटेलने दुसरा सेट फलंदाज रिकेल्टनला झेलबाद केले.

त्याच षटकात डेवॉल्ड ब्रेव्हिसला गुगलीवर मोठा फटका मारण्यास भाग पाडून झेलबाद केले. कॅनडाने दोन षटकांत सामन्यात चांगले पुनरागमन केले. अंश पटेलने तीन विकेट्स घेत सामन्याला नाट्यमय वळण दिले. पण, त्रिस्तान स्तब्स व डेव्हिड मिलर यांनी आक्रमक फटकेबाजी केली.

या दोघांनी ३९ चेंडूंत ७५ धावांची भागीदारी करताना संघाला ४ बाद २१३ धावांपर्यंत पोहोचवले. स्तब्सने १९ चेंडूंत २ चौकार व २ षटकारांसह नाबाद ३४ धावा कुटल्या, तर मिलरनेही २३ चेंडूंत १ चौकार व ३ षटकारांसह ३९ धावांची नाबाद खेळी केली. अंश पटेलने ४-०-३१-३ अशी अप्रतिम स्पेल टाकली.

### रवी शास्त्रींचे बाबर आझमला ओपन चॅलेंज

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तानचा बाबर आझम फॉर्मशी झुंजत आहे. त्याला सूर गवसण्यासाठी रवी शास्त्रींनी त्याला एक चॅलेंज दिले आहे. रवी शास्त्री म्हणाले, बाबर आझम हा प्रतिभावान आहे. पण सध्या तो अपेक्षांच्या ओझ्याखाली आहे आणि त्याचा परिणाम त्याच्या कामगिरीवर होताना दिसतोय.

बाबरने डावाच्या सुरुवातीला पहिल्या पाच चेंडूत मोठे फटके खेळले पाहिजेत. तो बाद होत असेल तरीही त्याची चिंता करत बसू नये. त्याने फटकेबाजी करायला हवी. फलंदाजी करताना मोठे फटके मारण्याचा प्रयत्न केले तरच बाबर आझमची फलंदाजी बहरेल आणि त्याच्या धावा वाढतील. गोलंदाज कशी गोलंदाजी करेल, आपल्याला कुठल्या भागात धावा जमवता येतील, कुठे चौकार-षटकार मारणे जास्त सोयीचे पडेल या विचाराने फटकेबाजी केली पाहिजे. त्यामुळे कदाचित त्याच्या बॅटमधून मोठे फटके जास्त निघू शकतील. तो सामना आणि खेळपट्टीनुसार स्वत:ची फलंदाजी बदलू शकतो. पण त्याला हा बदल लवकर करावा लागेल, नाहीतर खूप उशीर होईल ७ ते १६ ही षटके महत्त्वाची असतात. या वेळेत मोठे फटके मारताना जोखीम असते, पण तरीही त्याचा अनुभव पाहता तो ही जोखीम उचलू शकतो, असे शास्त्री म्हणाले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)